सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# “ नेमबाजीमधील यशामुळे माझी उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्ती झाली ”

**- राही सरनोबत, कोल्हापूर**






राहीसारख्या शेकडो खेळाडूंना
राज्य शासनाच्या क्रीडा संकुल योजनेमुळे
आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळत आहे.
खेळाडूंनी मिळविलेल्या विविध पदकांमुळे
क्रीडा संस्कृतीच्या समृद्धीचे दर्शन घडत आहे...

## स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

**हा प्रवास सारा उज्ज्वल भवितव्याचा**

**सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा**



**पृथ्वीराज चव्हाण**
मुख्यमंत्री



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# अनुक्रम...

सप्टेंबर २०१४ । मूल्य रु.१८

**सत्याग्रही**
विचारधारा

वर्ष तेविसावे : अंक आठवा

संपादक : डॉ. कुमार सप्तर्षी
सहसंपादक : डॉ. अंजली सोमण
सहायक संपादक : सतीश देशपांडे
व्यवस्थापक : डॉ. उर्मिला सप्तर्षी

**सल्लागार मंडळ :** डॉ. द. भि. कुलकर्णी, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. छाया महाजन, प्रा. मिलिंद जोशी, अन्वर राजन, सुरेश खोपडे, अंजली कुलकर्णी

**मुखपृष्ठ :** अभय जोशी

**चित्रे :** प्रतिम काटे

**संयोजन :** विनोद शीलवंत

**जाहिरात विभाग :** दशरथ चव्हाण

**अंकमांडणी :** संतोष पाटकर

**मुखपृष्ठ छपाई :** स्टार प्रिंटर्स, पुणे

**छपाई :** गणेश मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे

**कार्यालयीन पत्ता :**

क्रांतिनिकेतन, १४६८ सदाशिव पेठ,
एस. पी. कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
फोन : ०२०-२४४६१४०९/२४४७५८६६
फॅक्स : ०२०-२४४७५८६६
E-mail : satyagrahivichar@gmail.com

**कार्यालयीन वेळ :** सकाळी ११ ते सायं. ६

वार्षिक वर्गणी : रुपये २८०/-
१०वर्षांची वर्गणी : रुपये २५००/-

**'सत्याग्रही विचारधारा' या मासिकाचा हा अंक संपादक/मालक/मुद्रक/प्रकाशक या नात्याने डॉ. कुमार सप्तर्षी यांनी गणेश मुद्रणालय, शनिवार पेठ, पुणे ३० या ठिकाणी छापून क्रांतिनिकेतन, १४६८, सदाशिव पेठ, पुणे ३० येथे प्रसिद्ध केला. या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

| | | |
|---|---|---|
| **संपादकीय** | । | ५ |
| **युक्रांद वृत्त** | । | १० |
| **पत्राचार** | । | १० |
| **सन्मान जीवनकार्याचा** । | महापालक, राष्ट्रीय सामाजिक पुरस्कार | १२ |
| **रिपोर्ताज** | । येळ्ळूर ठसठसणाऱ्या सीमाप्रश्नाची भळभळ । राजा शिरगुप्पे | १५ |
| **परखड** | । बात्रांची भगवी मात्रा । हेमंत देसाई | २२ |
| **पत्र** | । डॉ. विजय भटकर यांसी, चंद्रसेन टिळेकर | २९ |
| **विचार** | । राज्याची धर्मातीतता ही परंपरागत भारतीयताच । श्रीपाद जोशी | ३२ |
| **आजकाल** | । इतिहासाच्या भगवेकरणाचा प्रयत्न । राम पुनियानी | ३५ |
| **कथा** | । नाते मातीचे । सदानंद सिनगारे | ३८ |
| **मंथन** | । महाभारतकाळ : ऱ्हासपर्वाकडूनभक्तीयुगाकडे चंद्रकांत अडावदकर | ४४ |
| **कविता** | । स्नेहल मिरगणे । सोनाली काळे । सायमन मार्टिन । आनंद कोठडिया । गजानन प्रधान । सदानंद सिनगारे । विजय गायकवाड | ५३ |
| **ललितभाष्य** | । तिमिरभेद । माधव गवाणकर | ५७ |
| **भाष्य** | । सीमाप्रश्न आणखी किती दिवस प्रलंबित? रामचंद्र रेडकर | ५९ |
| **स्मरण** | । जेव्हा चित्रे बहिष्कृत ठरले माधव पोतदार | ६२ |
| **परिघाबाहेर** | । विशुद्ध राष्ट्रवादाचे संचित। श्रीपाल सबनीस | ६५ |

संपादकीय

# मोदीलाट ओसरली

चार राज्यांत अठरा जागांसाठी विधानसभा पोटनिवडणुका झाल्या. त्यांचे निकाल हाती आले. या निकालांनंतर काही गोष्टी स्पष्ट होत आहेत. बिहारमध्ये लालूप्रसाद यादव व नितीशकुमार यांनी युती (महागठबंधन) केली होती. राजकीयदृष्ट्या मोदी लाटेच्या विरोधात घडलेली ही महत्त्वाची गोष्ट होती. लालूप्रसाद व नितीशकुमार यांच्या महागठबंधनला भरघोस यश मिळाले. त्यांनी सहा जागांवर विजय मिळविला.

या निवडणुकीतील अठरा जागांपैकी तीन मध्यप्रदेश आणि तीन कर्नाटकमध्ये होत्या. या दोन राज्यांतील निकाल अपेक्षित होते. मध्यप्रदेशमध्ये भाजपचे आणि कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार आहे. स्थानिक नेतृत्वावर जनतेचा विश्वास कितपत आहे याची चाचपणी करणाऱ्या या निवडणुका होत्या. मध्यप्रदेशमध्ये भाजपचे मुख्यमंत्री, अधिक मोदीलाट अशी बेरीज होती. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार लोकसभेत निर्माण झालेली भाजपची लाट रोखू शकेल काय, असा तिथे प्रश्न होता. पंजाबमध्ये ज्या भागात निवडणूक झाली तिथे काही दिवसांपूर्वी आम आदमी पक्षाचा बराच प्रभाव होता; परंतु आता आम आदमी पक्षाचा पराभव नगण्य झाल्याचे दिसून आले. पंजाबमध्ये काँग्रेस विरुद्ध भाजपच्या रालोआ आघाडीतील अकाली दल असा सामना होता. मोदींची लाट अकाली दलाला तारून नेईल असा भाजपचा होरा होता. बिहारमध्ये सांप्रदायिक शक्तींच्या विरोधातील सर्व लोक भाजपच्या विरोधात एकत्र आले होते. जातिधर्मनिरपेक्षतेचा बचाव करण्यासाठी त्यांनी महागठबंधन केले होते. नितीश व लालू हे परिस्थितीच्या दबावामुळे एकत्र आले होते. बिहारमध्ये निवडणुकांचे निकाल काय लागतात यावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले होते. भाजपला बिहारमध्ये चार, मध्यप्रदेशमध्ये दोन व कर्नाटकमध्ये एक अशा एकूण अठरा पैकी सात जागा मिळाल्या. अकाली दलाची एक जागा धरून रालोआला एकूण आठ जागा मिळाल्या. उरलेल्या दहा जागा ज.द.यु., रा.ज.द. व काँग्रेस या गठबंधनने जिंकल्या. भाजपविरोधी महागठबंधनाला लोकांनी अधिक प्रतिसाद दिला आहे. यापूर्वी रामविलास पासवान हे सेक्युलर राजकीय शक्तींचे स्वाभाविक मित्र होते; पण ते यावेळी भाजपची साथ देण्यासाठी रालोआ आघाडीत गेले. त्यांचा प्रभाव असलेल्या क्षेत्रात भाजपला लाभ झाला. भाजप नेहमीच दुसऱ्याचा वापर करून स्वत:चा फायदा करून घेतो. या पोटनिवडणुकांच्या निकालानंतर देशामध्ये मोठे वैचारिक मंथन होईल. परिस्थितीच्या दबावामुळे भविष्यकाळात मुलायमसिंग यादव आणि मायावती हे देखील एकत्र येऊ शकतील. या घटनांचा अर्थ असा आहे की, मोदी लाट अजूनही अस्तित्वात आहे हे खरे असले, तरी ती झपाट्याने ओसरू लागली आहे हेही नाकारता येणार नाही. लोकसभा निवडणुकीत मोदी लाटेची कमाल मर्यादा स्पष्ट झाली. आता ही लाट आपला किनारा सोडून दूरवर पसरेल असे वाटत नाही.

बिहारमधील निवडणुकांचा आणखी काही अर्थ आहे. मंडल आयोगाने 'सामाजिक न्याय' हा प्रश्न राजकारणात अग्रक्रमाचा प्रश्न म्हणून प्रभावित केला. मंडल आयोगाचे वादळ आले. इतर मागासवर्ग म्हणून समजल्या जाणाऱ्या जातिसमुहांमध्ये चेतना निर्माण झाली. मंडल जातींचा समूह भारतीय राजकारणात आपली जागा शोधू लागला. व्यक्तीवादी नेत्यांच्या आत्मकेंद्रीत प्रवृत्तींमुळे मंडल आयोगाचा प्रभाव पाहिजे तेवढा वाढला नाही. मंडलपासून बचाव करण्यासाठी तथाकथित वरच्या जातिसमुहांमध्ये प्रतिक्रिया निर्माण झाली. मंडल विरुद्ध कमंडल अशी लढाई सुरू झाली. हिंदुत्ववादी शक्ती संघटित होऊ लागल्या. सवर्ण मंडळी मनातून मंडल जातींच्या विरोधात असली तरी धर्मांध शक्ती एकत्र करण्यासाठी त्यांनी 'मुस्लीम द्वेष' हा घटक अमर्याद वापरला. हिंदू कुणाला म्हणावे याबद्दलची त्यांची व्याख्या आधीपासूनच प्रचलित होती. जो ख्रिश्चन नाही, जो मुसलमान नाही आणि जो कम्युनिस्ट नाही तो हिंदू! अशी त्यांची हिंदूबद्दलची व्याख्या आहे. मुस्लीमद्वेष हा घटक काढला तर हिंदुत्ववादी विचारसरणी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे ढासळेल. हिंदू-मुस्लीम ऐक्य झाले तर रा.स्व. संघाची नव्वद वर्षांची मेहनत वाया जाईल. दोन समाजात दंगल झाली, हिंसाचार झाला, तर परस्परांविषयी द्वेषभावना वाढीस लागते. परधर्माचा द्वेष करणारी व्यक्ती हिंसाचारात भाग घ्यायला लगेच तयार होते. यासाठी सत्तेचा आश्रय आवश्यक असतो. स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुत्ववादी शक्तींचा ब्रिटिशांना पाठिंबा होता. १९७७ साली जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर

सत्तावाटपात काही राज्यांमध्ये भाजपला मुख्यमंत्रीपदे मिळाली. सत्ता मिळाल्यावर पैसा गोळा होऊ लागला. हिंदुत्ववादी शक्ती चौखूर उधळू लागल्या.

काँग्रेस पक्ष सत्तेत होता तोपर्यंत काही प्रमाणात समाजाचे विभाजन करणाऱ्या या शक्तींना लगाम घालू शकत होता. परंतु त्या पक्षाने स्वत:ची वैचारिक बैठक आणि विचारसरणी या दोन्हींचा त्याग करावयास सुरुवात केली. त्यामुळे त्या पक्षाच्या संघटनेत बजबजपुरी माजली. अखेरीस एकेकाळी नगण्य असलेल्या अशा भाजपने गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला नेस्तनाबूत केले. आता संसदेत काँग्रेसचे फक्त चव्वेचाळीस खासदार आहेत. हे या पक्षाच्या अफाट अप्रियतेचे लक्षण आहे.

प्राप्त परिस्थितीमध्ये आपली कात टाकून त्यांना संजीवनी मिळवावी लागेल; परंतु त्यांच्यामध्ये आत्मपरीक्षणाचा अभाव असल्यामुळे फारशा सुधारणा होण्याची शक्यता वाटत नाही. संसदेत हिंदुत्ववाद्यांनी नि:शंक विजय प्राप्त केला आहे. सध्याची राज्यघटना बदलून हिंदुराष्ट्राची राज्यघटना प्रस्थापित करणे हे भाजपचे खरे उद्दिष्ट आहे. तसे करण्यास ते लगेच धजावणार नाहीत. पण, ते अनेक तोंडाने बोलतील आणि जनतेत संभ्रम निर्माण करतील. त्याच्या अनेक संघटना आहेत. ज्या संघटनेच्या भाषेला लोकांचा प्रतिसाद मिळतो, त्यावरून त्यांना आपला विचार लोकांमध्ये किती रुजला आहे याचा अंदाज येतो. देशाच्या जीवनात आगामी दोन–तीन वर्षे फार महत्त्वाची आहेत. या काळात हिंदुत्ववाद गनिमी काव्याने पुढे सरकेल.

नरेंद्र मोदी भारतामधील हिटलर बनतील असे अनेकांचे भाकीत होते व आजही आहे. नरेंद्र मोदी आपली पावले गनिमी काव्याने व सफाईदार पद्धतीने टाकत आहेत. त्यांनी फारसा गवगवा न करता नियोजन मंडळ रद्द केले. नियोजन ही निरंतर प्रक्रिया होती. सर्व देशांत नियोजन असते. 'आम्हाला वेगाने विकास करावयाचा आहे', अशी आवई ठोकत मोदींनी नियोजन मंडळ बरखास्त केले. पर्यावरणाचा नाश होणार नाही याची खात्री करून प्रकल्पांना परवानगी दिली जाते. सद्यपरिस्थिती मात्र याविरुद्ध आहे. विकासाची गतिमानता म्हणजे पर्यावरण नष्ट करणे वा अन्य बंधने ढिली करणे होय असे चालू आहे. नरेंद्र मोदींची धडपड चालू आहे ती जगातील सगळ्या भांडवलदारांचे ते लाडके बनावे. यासाठी जगातील समस्त भांडवलदारांना त्यांनी, 'आमच्याकडे या, तुमचा प्रोडक्ट भारतात बनवा.' असे जाहीर निमंत्रण दिले आहे. त्यांचे निमंत्रण जगातील भांडवलदारांनी स्वीकारावे यासाठी त्यांना हव्या त्या सवलती द्यायला मोदी एका पायावर तयार आहेत. भारतात मोदींना १०० अत्याधुनिक शहरे निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात परकीय भांडवल हवे आहे. त्यांच्या धोरणांमधून देशात प्रचंड विषमता वाढेल. खेडी मरतील, गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळणार नाही, गुन्हेगारी वेगाने वाढेल.

'आम्ही भ्रष्टाचार नष्ट करू' असा मोदी सरकारचा व भाजपचा दावा आहे. हे अत्यंत अवघड कार्य आहे. ते कसे करणार याबद्दल भाजपकडे स्पष्ट कार्यक्रम नाही. काँग्रेसमधील भ्रष्टाचारी माणसे अव्वल संधीसाधू आहेत. त्यांचा लोंढा भाजपमध्ये जातोय. भ्रष्टाचारी लोकांना आपल्या आत्म्यामध्ये सामावून घेऊन भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याचा दावा करणे ही केवळ जादूगाराची ट्रिक आहे. भाजपच्या विचारसरणीमध्ये साध्य–साधनांच्या विवेक असला पाहिजे अशी मान्यता नाही. आपला उद्देश साध्य करण्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करणे नैतिकदृष्ट्या योग्यच ठरते अशी त्यांची धारणा आहे. या तत्त्वाचे उदात्तीकरण करण्यासाठी ते कृष्णनीती वा चाणक्यनीती असे शब्द वापरतात. आपले दोष झाकण्यासाठी वजनदार शब्द वापरणे किंवा नवे शब्द निर्माण करणे ही त्यांची विशेषता आहे. सत्ता प्राप्त करणे हेच त्यांचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी ते कोणत्याही साधनांचा वापर करण्यात नैतिक–अनैतिक असला घोळ घालत नाहीत. याउलट गांधीजी म्हणतात, 'साध्य व साधन यांत सुसंगती हवी.' अहिंसक समाज स्थापन करणे हे गांधीजींचे उद्दिष्ट होते. त्यासाठी त्यांचे सर्व लढे अहिंसक असत. सध्याचा काँग्रेस पक्ष हा मूल्यांची घसरण झालेला पक्ष आहे. या पक्षाला आपल्या मूलभूत भूमिकेचा व धारणेचा विसर पडलेला आहे. व्यक्तीला अल्झायमर–स्मृतिभ्रंश नावाचा आजार होतो. तशीच संघटनेला वा पक्षालाही स्मृतिभ्रंशाची बाधा होते. काँग्रेसची मूलभूत भूमिका महात्मा गांधीजींनी आखून दिली होती, परंतु त्या पक्षाला आपल्या मूलभूत भूमिकांचे विस्मरण झाले आहे. काँग्रेस पक्ष भरकटल्यामुळे त्यांच्यामध्ये मूल्यांची घसरण झाली. त्यामुळे अत्यंत विरोधी मूल्ये मानणारा भाजप सत्तेवर आला. स्वातंत्र्यलढ्याने निर्माण केलेली मूल्ये सामान्य जनतेला स्वीकारार्ह होती. हिंदुत्ववाद्यांचा स्वातंत्र्यलढ्याला प्रारंभापासूनच विरोध होता. स्वातंत्र्यलढ्यातील मूल्ये, काँग्रेस आणि गांधीजींचे नेतृत्व ते त्याज्य मानत. या मंडळींना लोकशाहीप्रणाली व जातिधर्मनिरपेक्षता मुळातून मान्य नाही.

या पार्श्वभूमीवर भविष्यात भारतात दोन भिन्न प्रकारच्या परिस्थिती निर्माण होऊ शकतात. एकतर, संपूर्ण भारताचे वेगळे रूप तयार होईल. त्यात वेगळी जीवनमूल्ये असतील. हिंदू समाजात त्रिवर्ण (म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य) परंपरेने आक्रमक आहेत. हे तीन वर्ण भविष्यात अत्यंत आक्रमक होतील.

लोकशाहीमुळे या त्रिवर्णांनी आपले उच्च स्थान गमावले आहे. हे त्रिवर्ण पूर्वीची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करण्यासाठी हिंदू समाजातील शूद्र म्हणून शिक्का मारलेल्या शोषित समाजात मुस्लिमद्वेष वाढवून त्यांना आपल्या अधिपत्याखाली आणतील. दुसरे चित्र असे संभवते की, उच्चवर्णीयांचा हा डाव सामान्य भारतीयांना कळेल आणि ते स्वत:चा मुक्तिलढा अधिक जोमाने चालवतील. या चित्रात मुस्लीमद्वेष असणार नाही. जातीच्या व धर्माच्या भिंतीपलीकडे सामान्य भारतीय जातील. आज भारतीयांमध्ये असेलेले अंतर कमी होईल. या प्रक्रियेला क्रांती म्हणतात. कोणत्याही समाजात माणसामाणसांमध्ये पडलेले अंतर कमी करणे म्हणजे क्रांती होय. आजवर भारतीय समाज 'जैसे थे' वादाला घट्ट पकडून होता, म्हणून तो बदलाच्या विरोधी असायचा. आता तो अहिंसक क्रांती करील किंवा हिंसक प्रतिक्रांती करील. हिंदुत्ववादी मंडळींना हिंदूंच्या अंतर्गत असणारी विषम रचना व सामाजिक उतरंड तशीच शाबूत ठेवायची आहे. म्हणून अल्पसंख्यांकांचा द्वेष शिकवून बहुसंख्यांकांना त्यांच्यापासून दूर न्यायचे आहे. मोदी सरकार आल्यापासून रोज अशा घटना घडत आहेत. सामान्य मुस्लीम भारतीय व सामान्य हिंदू भारतीय यांच्यामध्ये दरी रूंदावत आहे.

## लव जिहाद

हिंदुत्ववाद्यांनी एक जबरदस्त प्रचारमोहीम काढली आहे. मुस्लीम तरुणांना म्हणे पैसे देऊन एक आगळावेगळा जिहाद करायला लावतात. या जिहादच्या प्रचाराचे नाव 'लव जिहाद' आहे. मुस्लीम तरुणांनी हिंदू मुलींवर प्रेम करावे, त्यांना आपल्या प्रेमाने मानसिकदृष्ट्या गारद करावे, वेड लावावे, अखेर त्यांच्याबरोबर लग्न करावे. नंतर पत्नीला सांगावे की, 'मी मुस्लीम आहे. आपण हिंदू पद्धतीने सर्व विधी पार पाडले; पण मी हिंदू असल्याचे नाटक केले होते. मी कट्टर मुस्लीम आहे. आता तू माझी पत्नी आहेस. तू मुस्लीम धर्माचा स्वीकार कर. आपण पुन्हा निकाह लावू.' असेच एक प्रकरण गाजत आहे. मुलीचे नाव तारा सचदेव आहे. ती रांची (झारखंड) येथील असून नेमबाज आहे. तिचा छळ झाला अशी तक्रार पोलिसांकडे दाखल केली आहे. तिच्या नवऱ्याला अटक झाली. त्या तरुणाने निवेदन दिले आहे की, 'मी हिंदूच आहे. पत्नी मला ब्लॅकमेल करते.' २५ ऑगस्ट रोजी रांची शहर बंद ठेवावे असा पुकारा अभाविप, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व नारी सेना यांनी केला. दूरचित्रवाणीवर या बंदमध्ये काय घडले याची दृश्ये सर्व जगाला पाहायला मिळाली. विहिंप व बजरंग दलाचे ५०-६० लोक स्कूटरवर बसून जिथे पोलीस नाहीत तिथे गनिमी काव्याने पोचत. त्यांच्या हातात लाठ्याकाठ्या होत्या. ते रिक्षा, दुकाने यांची तोडफोड करीत. बंदमध्ये सहभागी न झालेल्यांना ते मारहाण करीत. त्यांना भारतामध्ये सीव्हिल वॉर घडवून आणायचे आहे. त्याचा नमुना भारतीयांना दिसला. या घटनेचा परिणाम असा होईल की हिंदू समाजात मुलींवर अनेक नियंत्रणे येतील. त्यांचे स्वातंत्र्य काढून घेण्यात येईल. शिवाय हिंदू आणि मुस्लीम समाजात दरी रुंदावेल. जेव्हा हिंदू धर्माचे रक्षक तोडफोड करीत होते, त्यावेळी त्यांच्या मुखात 'जय श्रीराम' ही घोषणा होती. त्यांची ही जहाल रामभक्ती बघून कुणालाही भोवळ येईल. हिंदुत्ववादी मंडळींच्या कैदेतून प्रभुरामचंद्र कधी सुटणार हे कळत नाही. मुसलमानांना दूर ढकलत-ढकलत हिंदू राष्ट्र निर्माण करायचे हा त्यांचा डाव आहे.

## धर्मसंसदेचा आखाडा

संन्यास म्हणजे संसारापासून मुक्ती, अहंकारातून मुक्ती, राग-द्वेष-क्रोध यातून मुक्ती ! यांना आपण साधूसंत म्हणायचे. त्यांचे आखाडे असतात. संसारातून मुक्त झालेल्या लोकांचे मनुष्यबळ या आखाड्यांमधून संघटित केले जाते. धर्म नावापुरता असतो. बहुतांश अधर्मच चालू असतो. मोदीराज्य स्थिरावले तर आपल्या लोकसभेपेक्षा या साधूबैराग्यांच्या धर्मसंसदेचे व शंकराचार्यांचे महत्त्व विनाकारण वाढेल. शंकराचार्यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच कवर्धा (छत्तीसगड) येथे धर्मसंसद भरली होती. त्यात त्यांनी ठराव पास केला की, 'साईबाबा ईश्वर आणि संत किंवा गुरूही नाहीत. त्यांचे मंदिर बांधणे हिंदू धर्मविरोधी आहे.' यावेळी काही साईभक्त व्यासपीठावर आले. आपली बाजू मांडू द्यावी अशी त्यांनी मागणी केली. त्यांना धक्काबुक्की करून व्यासपीठावरून हाकलून देण्यात आले. हे संत वा महापुरुष गुंडगिरी करीत होते. त्यांची वेषभूषा, त्यांची लठ्ठ शरीरे, सुटलेली पोटे व त्यांच्या तोंडातील आक्रमक भाषा पाहून आपण यांना संत का म्हणायचे हा प्रश्न पडला. जे ईश्वर मानतात त्यांनी ईश्वराला साकडे घातले पाहिजे, आणि अशी प्रार्थना केली पाहिजे की, 'हे ईश्वरा, आमचा सनातन हिंदू धर्म धोक्यात आहे. धर्मसंसदेच्या आक्रमणापासून सनातन धर्माचे रक्षण कर.' गुंडागर्दी करणाऱ्याला साधू म्हणा ही जबरदस्ती आहे. खरेतर धर्मसंसदेला 'आखाडा' म्हणावे. संसद शब्द वापरणे हे लोकशाहीचे विडंबन आहे. आद्य शंकराचार्यांचे नाव घेऊन विद्यमान शंकराचार्य जगतात. चार दिशेची चार पिठे व त्यांची उपपिठे, मठ यांच्यात सातत्याने भांडणे चालू असतात. कोणत्याही दोन शंकराचार्यांचे धार्मिक मुद्द्यावर एकमत नसते. मात्र साईबाबांच्या मूर्ती मंदिरातून उखडून टाकण्याच्या बाबतीत

तथाकथित धार्मिक आचार्य एक झाले आहेत. त्यांच्या बोलण्या–वागण्याकडे पूर्वी शासनासहित सर्वांनी दुर्लक्ष केले, त्यातून बाबरी मशीद पाडण्याचे षड्यंत्र रचण्यात आले. प्रत्यक्षात वास्तवात नसलेली गोष्ट केवळ हवा देऊन कशी निर्माण करता येते याचा नमुना म्हणजे बाबरी मशिद व राममंदिर हा वाद होय. यावेळी धर्मसंसद एवढी सक्रीय का झाली? पूर्वानुभवामुळे काही शंका मनात येतात. हिंदूराष्ट्राच्या निर्मितीकडे वाटचाल करण्यासाठी भारतीय संस्कृतीच्या पोटात असलेले भिन्न भिन्न संस्कृतीचे संगम त्यांना तोडून टाकायचे असावेत. भगवा रंग हा त्यागाचे प्रतीक आहे. भगवे कपडे घालून तथाकथित संतमंडळी हिंसाचाराला जन्म देऊ पाहात आहेत. आग पेटवत आहेत. मोदी सरकार आल्यापासून संघ परिवार बेताल वागू लागला. त्याचाच हा भाग असावा. साईबाबा 'ना भगवान, ना संत, ना गुरु' असा नारा देऊन ते धर्माच्या नावाखाली गुंडगिरीला प्रोत्साहन देत आहेत. कायद्याचे उल्लंघन करून गुंड हिंदू मंदिरांत घुसणार आणि साईबाबांची मूर्ती फेकून देणार आहेत. एकदा धर्माच्या नावाखाली गुंडगिरीला 'धर्मकृत्य' म्हणण्याची प्रथा पडली तर अनेक अनर्थ घडू लागतील. आज गुंडांच्या ज्या टोळ्या आहेत, त्या स्वत:ला कोणत्यातरी धर्माचे नाव देतील. एकदा धर्माचा टिळा लावला की समाज त्याच्याकडे गुंड म्हणून पाहण्याऐवजी धर्मयुद्धाच्या रणांगणातील सैनिक मानू लागतो. गुंडाची प्रतिष्ठा वाढते. संघपरिवाराने सर्व क्षेत्रातील भगवेकरण चालू केले आहे. गुंडांच्या टोळ्यांचेही भगवेकरण चालू झाले आहे. भूमिगत गुन्हेगारी जगताचा काळा पाठिंबा हिंदुराष्ट्राला हवा आहे. कोणताही धर्म दुकाने लुटायला आणि वाहने फोडायला सांगत नाही. पण रांची येथे हिंदू धर्माच्या नावाखाली गुंड मंडळी वाहने व दुकाने फोडत होती. त्यांना पोलिसांनी निवडून निवडून बदडले. ते योग्यच झाले; पण यावर असाही ओरड करण्यात येईल की, पोलीस हिंदूंच्या विरोधात आहेत.

### राज्यपालांच्या बदल्या

गव्हर्नर किंवा राज्यपाल ही संकल्पना प्रथम औरंगजेब बादशहाने भारतात लागू केली. जेव्हा राज्याचा विस्तार होतो आणि राज्यांतर्गत भौगोलिक अंतर वाढत जाते. तेव्हा राजा आपल्या एजंटमार्फत राज्यावर नियंत्रण ठेवतो. कारण भाऊ वा मुलगा प्रश्न सोडविण्यासाठी दूर अंतरावर पाठविला तर तो तिकडे स्वत:च राजा बनतो. तिथून राजाला आव्हान देतो. मोगल बादशहांना असे बरेच अनुभव आले. औरंगजेबाने जो गादीचा वारसा होऊ शकणार नाही अशा कर्मचाऱ्याला रिमोट कंट्रोलच्या रुपात गव्हर्नर नेमले. इंग्रजांनीही गव्हर्नरमार्फत राज्यावर रिमोट कंट्रोल ठेवण्याची औरंगजेबाची परंपरा चालू ठेवली. देश स्वतंत्र झाल्यानंतरही राज्यपालाची नेमणूक चालू आहे. राज्यपालाचे राज्यसरकारवर थेट नियंत्रण नसते. फक्त राज्यातील राजकीय घडामोडींवर राज्यपालाने बारकाईने लक्ष ठेवायचे असते. त्याला केंद्र सरकारला रिपोर्ट पाठवायचे असतात. राज्यपाल हा केंद्र सरकारचा प्रतिनिधी असतो. राज्यपाल हे संविधानात्मक पद आहे, या म्हणण्याला फारसा अर्थ उरत नाही. राज्यपाल पदाची प्रतिष्ठा वाढविण्याचे काम ना काँग्रेसने, ना जनता पक्षाने, ना भाजपने केले. अपेक्षा एवढीच आहे की आपल्याच पक्षाचे राज्यपाल नेमण्याच्या नादात केंद्र सरकारने या पदाचा कचरा करू नये. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर काँग्रेसच्या राजवटीने नेमलेले राज्यपाल बदलले जाणार हे उघड होते. काँग्रेसमुक्त भारत करण्याच्या नादात मोदींनी राज्यपालांना अवमानकारक वागणूक दिली यात शंका नाही. महाराष्ट्राचे राज्यपाल तडकाफडकी बदलण्यात आले. त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली. वास्तविक राज्यपाल नेमण्याची प्रक्रिया अधिक ग्रेसफुली पार पाडता आली असती. मोदी सरकार आले म्हणजे संपूर्ण भारत देश भाजपच्या विचारांचा झाला असे मानणे आत्मघातकी आहे. अटलबिहारी वाजपेयी सरकारने राम कापसे यांना अंदमानचे गव्हर्नर म्हणून नेमले होते. नंतर सत्तेत आलेल्या काँग्रेसप्रणित संपुआ सरकारला त्यांचे काम आक्षेपार्ह वाटले नाही. ते भाजपचे होते; तरीही राज्यपाल या नात्याने केंद्र सरकारच्या आदेशांचे ते इमानेइतबारे पालन करीत. संपुआ सरकारने त्यांना बदलले नाही. उलट अंदमानमध्ये त्सुनामीने हाहाकार माजविल्यानंतर त्यांच्यावर संपूर्ण विश्वास टाकून त्यांना त्यांच्या मागणीनुसार मदत पाठविली.

अर्थात वर नमूद केलेला तर्क फार लांबविता येत नाही. राज्यपाल हा केंद्र सरकारला निष्ठावंत असला पाहिजे याबद्दल शंका नाही. भारत हे संघराज्य आहे. एखादा वाद चिघळून राज्य व केंद्र सरकार यांत समर प्रसंग उद्भवू शकतो. अशावेळी राज्याचे पोलीस विरुद्ध केंद्राचे राखीव दल असा रक्तरंजित संघर्ष घडू शकतो. असा संभाव्य संघर्ष निर्माण होण्यापूर्वीच राज्यसरकार बरखास्त करून केंद्र सरकार त्या राज्याचा ताबा घेऊन पुढील अनर्थ टाळू शकते. अशाच एका प्रसंगाची आठवण येथे नमूद करणे अप्रस्तुत ठरणार नाही. तामिळनाडूत करुणानिधींचे द्रमुक सरकार होते. दिल्लीत केंद्र सरकार पं. चंद्रशेखरजींचे होते. द्रमुक सरकारने श्रीलंकेतील तामीळ टायगर्सना तामिळनाडूचा समुद्रकिनारा आंदण देऊन टाकला होता. तामीळ टायगर्सचे नौदल या किनारपट्टीचा उपयोग करून नशिल्या ड्रग्सची आयात–निर्यात करीत. चंद्रशेखरजींना ही बातमी समजल्यावर तामिळनाडूचे मुख्यमंत्री करुणानिधी यांना जाब

विचारला. द्रमुकने सुधारणा करण्याऐवजी अतिरेक्यांच्या तोंडून चंद्रशेखरजींना आव्हान दिले. द्रमुकच्या मेळाव्यातील अतिरेकी म्हणाले, ''पंजाबच्या अतिरेक्यांनी पं. इंदिरा गांधींची हत्या केली. ती त्यांच्या घरात केली. त्यांना प्राण सोडताना किमान घोटभर पाणी मिळू दिले. चंद्रेशखरना मात्र आम्ही रस्त्यात मारू. प्राण सोडताना त्यांना पाणीदेखील आम्ही मिळू देणार नाही.'' तेव्हा चंद्रशेखरजींनी तत्कालीन राज्यपाल सुरजितसिंग बर्नाला यांच्यामार्फत तामिळनाडूचे सरकार बरखास्त केले. देशाची किनारपट्टी कुणा परकीयाला देण्याचे थांबविणे हे केंद्र सरकारचे कर्तव्यच आहे. नरेंद्र मोदी यांच्यावर पंतप्रधानदाची कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांना आपल्या मर्जीतले राज्यपाल नेमण्याची मुभा आहे.

**महाराष्ट्राचे राजकारण**

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत. प्रत्यक्ष निवडणुकीत कोणत्या राजकीय शक्ती यशस्वी होतील हे आज सांगता येत नाही. काही दिवसांपूर्वी महायुतीचे वारे जोरदार वाहत होते. परंतु नुकत्याच झालेल्या चार राज्यांतील पोटनिवडणुकांच्या निकालामुळे मोदी लाटेची मर्यादा निश्चित झालेली आहे. महायुतीचे राज्य येणारच नाही असे छातीठोकपणे आज सांगता येणार नाही. काँग्रेसच्या आघाडीचे आमदारही संख्येने नगण्य नसतील. आगामी दोन–तीन महिन्यांत परिस्थिती कोणता आकार घेते यावर बरेचसे अवलंबून आहे. एक मात्र नक्की आहे. काँग्रेसमधील संधिसाधू प्रवृत्तींना महाराष्ट्रात सेना–भाजप युतीचे सरकार येणार असे वाटते. नव्या सरकारने आपला भ्रष्टाचार खणून काढू नये, तसेच केंद्र सरकारने आपल्यावर प्राप्तीकर विभागाच्या धाडी टाकू नयेत असे वाटत असल्यामुळे त्यांना भाजपला शरण जायचे आहे. १९७७ साली जनता पक्षाचे सरकार केंद्रात आले होते. तेव्हा काँग्रेसमधली अनेक संधिसाधू मंडळी जनता पक्षात शिरली होती. सर्वात मोठे उदाहरण शरद पवारांचे! त्यांना इंदिरा गांधींची घराणेशाही पसंत नव्हती, आणीबाणी तर बिलकूल मंजूर नव्हती. आणीबाणी लागू असताना त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला नाही. जेव्हा काँग्रेस पक्ष वनवासात गेला, तेव्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन घेऊन त्यांनी पुलोद सरकार स्थापन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमधील अनेक संधिसाधू लोक जनता पक्षाचे मित्र बनले. काँग्रेस पक्षात असताना जे पक्षाचे अध्यक्ष झाले, ज्यांनी मंत्री होऊन सात पिढ्या पुरेल एवढी माया गोळा केली. तेच लोक शरद पवार यांना शिव्याशाप देऊन भाजपमध्ये प्रवेश करायला निघाले आहेत.

काँग्रेस व राष्ट्रवादी एका आघाडीत नाममात्र राहिले आहेत. 'म्हसोबाला नाही बायको अन सटवाईला नाही नवरा' अशी त्यांच्या आघाडीची गत आहे. राष्ट्रवादी अन काँग्रेस दोघेही जनतेपासून दूर फेकले गेलेले आहेत. पण त्यांची मस्ती काही संपत नाही. त्यांची घटलेली लोकप्रियता आणखी घटत आहे. भाजप शिवसेनेच्या खांद्यावर बसून ग्रामीण भागात गेला. मोदी लाटेने भाजपला मुख्यमंत्री पदाचे स्वप्न पडू लागले आहे. त्यासाठी ते गनिमी काव्याने जिवापाड प्रयत्न करीत आहेत. त्यांना शिवसेनेच्या संमतीने मुख्यमंत्रीपद हवे आहे. ज्यांच्यावर अन्याय करायचा त्यांची त्यांना पूर्वसंमती हवी आहे. त्यासाठी ते उलटसुलट बोलून धमाल करीत आहेत. भाजपचा मुख्यमंत्री भाजपचे आमदार निवडणार नसून नरेंद्र मोदी यांच्या आदेशाने तो ठरेल, अशी महाराष्ट्रातील भाजपचे पुढारी जाहीरपणे सांगू लागले आहेत. जुनी समीकरणे मोदी लाटेनंतर आता बदलली आहेत असाही त्यांचा दावा आहे. शिवसेना व भाजप यांच्यामध्ये वितुष्ट आहे; पण साथ सोडण्याची कुणाचीही तयारी नाही. तुलनात्मकदृष्ट्या राष्ट्रवादी काँग्रेसची परिस्थिती अतिशय विकलांग आहे. शरद पवारांची राष्ट्रीय पातळीवर चमक उरलेली नाही. राष्ट्रवादीत अजित पवार यांचा प्रभाव वाढलेला आहे. चुलत्या–पुतण्याच्या दृष्टिकोनांत अंतर आहे. संयम न बाळगता राजकारण केल्यामुळे हा पक्ष मराठा समाजाचा प्रतिनिधी बनला. तो समस्तांचे प्रतिनिधीत्व करीत नाही. होताहोता तो मराठा जातीचाही प्रतिनिधीत्व करेनासा झाला. तो फक्त श्रीमंत भ्रष्ट मराठा घराण्यांचा पक्ष बनला आहे. काँग्रेस पक्षात सगळ्यांना बांधून ठेवणारा नेता नाही. एकूण परिस्थिती पाहता महायुतीकडे पारडे झुकलेले दिसते. तथापि युतीला मोदी लाटेवर बसून त्यांना महाराष्ट्र पादाक्रांत करायचा आहे. केवळ मोदी लाटेच्या जीवावर महाराष्ट्र राज्य जिंकता येईल इतका महाराष्ट्र खुळा नाही. समजा मोदी लाट ओसरली तर काय? महाराष्ट्रात पुरोगामी कार्यकर्त्यांची परंपरा आहे. काँग्रेस संपल्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे पुरोगामीपण टिकविण्याचे कार्य करावे लागेल. आपले ऐतिहासिक कर्तव्य उमगण्याइतके महाराष्ट्रातील पुरोगामी कार्यकर्ते प्रगल्भ आहेत. त्यांचा काँग्रेस व भाजपा या दोहोंनाही विरोध असेल. ते समाजात फूट पाडणाऱ्या हिंदुत्ववादी प्रवृत्तींच्या विरोधात असतील. याचा अर्थ ते काँग्रेस पक्षाला पाठिंबा देतात असा होत नाही. हिंदू–मुस्लिम दंगली घडवून आणल्याशिवाय भाजप–सेनेला महाराष्ट्रात भक्कमपणे पाय रोवता येणार नाहीत. याउलट मुस्लिमांचे रक्षण करण्यासाठी अनेक उदारमतवादी हिंदू हिंदुत्ववाद्यांच्या विरोधात सक्रीय होतील. म्हणजे बेरजेबरोबर वजाबाकी देखील होणार आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

युक्रांद
वृत्त

## डॉ. एकनाथ ठाकूर यांना आदरांजली !

सारस्वत बँकेचे अध्यक्ष डॉ. एकनाथ ठाकूर यांचे गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी निधन झाले. सामाजिक कार्याविषयी आस्था असणारे ते कृतिशील व्यक्तीमत्व होते. डॉ. ठाकूर यांचा प्रवास अत्यंत खडतर होता. स्टेट बँक ऑफ इंडियातील छोट्या नोकरीपासून त्यांनी बँकिंग व्यवसायात प्रवेश केला. ज्या काळात बँकांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत होता आणि बेरोजगारांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर होते त्यावेळी या दोन्हीतील विसंवाद ओळखून त्यांनी कार्य केले. मराठी माणसाच्या व्यवसाय उत्कर्षासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबविले आणि ते यशस्वी करून दाखविले. त्यांचे कार्य लोकाभिमुख होते. बँकिंग व्यवसायातील त्यांच्या कार्याला विसरता येणार नाही.

सामाजिक कार्यातही त्यांचा मोलाचा वाटा होता. २०११ सालच्या 'सत्याग्रही विचारधारा' मासिकाच्या वर्षारंभ विशेषांक प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्यावेळी त्यांची प्रकृती बरी नव्हती, तरीही 'सत्याग्रही' आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांच्यावरील प्रेमापोटी ते उपस्थित होते. चळवळींबद्दल मनात असलेला आदर त्यांच्या भाषणातून जाणवत होता. महाराष्ट्रात डॉ.सप्तर्षी यांना मानणारे अनेक लोक आहेत. या सर्वांचे डॉक्युमेंटेशन झाले पाहिजे आणि त्यासाठी मी सहकार्य करीन असे त्यांनी जाहीर केले. युक्रांदच्या वतीने कार्यकर्त्यांनी डॉक्युमेंटेशनसाठी राज्यभर दौरा केला. त्यावेळी कार्यकर्ते ठाकूर सरांना मुंबईतील कार्यालयात भेटले. त्याक्षणी कार्यकर्त्यांचे स्वागत करत ठाकूर सर म्हणाले, ''अरे वा, माझे नातेवाईक आले.'' ठाकूर सर हे सामाजिक कार्यकर्त्यांना अत्यंत आपुलकीने मदत करीत होते.

अखंड कार्यक्षमता, साधेपणा, समरस होण्याची हातोटी आणि अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन कार्य करणाऱ्या ठाकूर सरांचे व्यक्तिमत्व प्रभावी होते.

त्यांच्या जाण्याने सामाजिक कार्यकर्त्यांना सहकार्य करणारा एक आधारस्तंभ आपल्यातून गेला आहे. ठाकूर सरांना युवक क्रांती दलाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या वतीने विनम्र आदरांजली.

---

## सप्रेम नमस्ते !

पत्राचार

■ पुरोगामी विचारांची पाठराखण

'सत्याग्रही विचारधारा' पुरोगामी विचारांची चांगली पाठराखण करीत आहे. तुमचे संपादकीय तर निर्भय सत्याग्रहीचे बिनतोड विचार वाचायला माझ्यासारखे अनेक वाचक उत्सुक असतात. उत्तम चालले आहे. सत्याग्रही विचारधारेला माझ्या हार्दिकशुभेच्छा आणि तुम्हाला उत्तम आरोग्य, उदंड आयुष्य आणि उत्कट आध्यात्मिक आनंद लाभो, ही निर्मिक चरणी प्रार्थना !

लोभ आहेच, तो वृद्धींगत व्हावा.

**– व. न. इंगळे**

तपस्या, कर्मवीरनगर, बार्शी, ४१३४११ जि. सोलापूर
मोबा. ९९२३३४७२८७

■ नवोदित लेखकांना प्रोत्साहन

'सत्याग्रही विचारधारा' हे मासिक सामाजिक–राजकीय व साहित्यिक क्षेत्रातील दर्जेदार मासिक आहे. समीक्षक विश्वास वसेकर यांनी लिहिलेले परीक्षण आवडले. त्यांनी नवोदित लेखक म्हणून मला प्रोत्साहन दिले आहे. त्यांचेही आणि सत्याग्रहीचेही आभार.

**– सावन धर्मपुरीवार**

मु.पो.ता. पारशिवणी, जि. नागपूर

सहकाररत्न, माजी मंत्री शंकररावजी कोल्हे साहेब यांच्या अर्हनिष प्रयत्नांतून साकारलेला

# दि संजीवनी (टाकळी) सहकारी साखर कारखाना लि.


सहजानंदनगर, पो.शिंगणापूर, ता.कोपरगाव, जि.अ.नगर. फोन (०२४२३)२२४१२० ते २२४१२५
दूरमुद्रण : (०२४२३) २२४१३० E-mail: ssskltd@vsnl.com ग्राम : 'संजिवनी' शिंगणापूर

**आमची दर्जेदार उत्पादने :** पांढरी शुभ्र गोड साखर, अल्कोहोल व त्यावर आधारित उत्पादने – इथाईल अल्कोहोल, एक्ट्रान्युट्रल अल्कोहोल, ॲसिटिक ॲसिड, इथाईल ॲसिटेट, ॲसिटिक अनहैड्राईड


**गोदावरी नदीवर मौजे हिंगणी, मंजुर आणि सडे (संयुक्त) येथे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे तसेच कार्यक्षेत्रात मातीचे, दगडी साठवण बंधारे बांधून त्याद्वारे सुमारे १० कोटी रुपये कृषी उत्पादन वाढीसाठी संजीवन जलसंवर्धन मोहिम कार्यान्वीत...**

**ग्रामीण भागातील जनतेच्या व सभासद शेतकऱ्यांच्या विकासासाठी संजीवनी समूहाच्या माध्यमांतून विविध समाजोपयोगी उपक्रमांची यशस्वी उभारणी.**

१) शेतकऱ्यांना दुग्धव्यवसायासाठी जोडधंदा म्हणून गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना तसेच कुक्कुट उद्योग, शेतीविषयक अन्य जोडधंद्याबाबत संपूर्ण मार्गदर्शन. २) संजीवनी पतसंस्थेच्या माध्यमातून लघु उद्योग व ग्रामीण दुर्बल घटकांना कर्ज पुरवठा. ३) देवयानी सहकारी बँकेच्या माध्यमातून विविध उद्योगांसाठी कर्जपुरवठा. ४) ऊस वाहतुकीसाठी अमृत–संजीवनी व सुवर्ण–संजीवनी केन ट्रान्सपोर्ट कंपनी लि. ५) संजीवनी मत्स्य विकास संस्थेद्वारे सभासद शेतकऱ्यांना मत्स्यशेतीविषयक मार्गदर्शन. ६) कोपरगांव तालुक्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी, बी.फार्मसी, डी.फार्मसी, डी.एड./बी.एड., इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, एम.बी.ए., संजीवनी इंग्लीश मिडियम स्कूल, संजीवनी सैनिकी स्कूल द्वारा परिसरातील मुला–मुलींना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध. ७) संजीवनी प्री कॅडेट ट्रेनिंग सेंटरच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगार मुलांना सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षणाची सोय व मार्गदर्शन ८) संजीवनी उद्योग समूहाच्या माध्यमांतून व सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने कोपरगांव तालुक्यात सुमारे १ लाख झाडांचे वृक्षारोपण–संगोपन व पर्यावरण संतुलनासाठी दरवर्षी तालुका व कारखाना कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावात वृक्षारोप. ९) उच्चतम साखर उतारा, तांत्रिक कार्यक्षमतेचा देशपातळीवरील द्वितीय क्रमांकाच्या पुरस्कारासह आजवर १९ पारितोषिके मिळविणारा संजीवनी साखर कारखाना. १०) हृदयशस्त्रक्रिया, किडनी, कर्करोग, ब्रेन ट्युमर असाध्य आजारांच्या उपचारासाठी हजारो रुग्णांना लाखो रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदतमिळवून देण्यासाठी संजीवनी मदत केंद्रामार्फत संपूर्ण मार्गदर्शन. ११) कोपरगाव तालुक्यातील पश्चिम व पूर्व भागातील १८ दुष्काळी गावातील १५ हजार जनावरांसाठी संजीवनी कारखान्यांतर्फे एप्रिल व मे २०१२ मध्ये मोफत दुबार चाऱ्याचे वाटप व पिण्याचे पाण्यासाठी २४ गावातील वाड्यावस्त्यांना दररोज सहा टँकरद्वारे पाणीपुरवठा, कोपरगाव शहरात ५० टँकरद्वारे पिण्याचे पाण्याचा पुरवठा तसेच विंधनविहिरींवर २० सबमर्सिबल पंप बसवून पाण्याचा नित्य पुरवठा. १२) नवरात्र २०१२ मध्ये कोपरगाव शहरात संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने संपूर्ण डास निर्मलनासाठी किटकनाशक फवारणी व प्रत्येक प्रभागात शहर स्वच्छता अभियान.



**मा. बिपीनराव कोल्हे**
(B.Sc., Agri)
चेअरमन



**मा. शंकरराव कोल्हे**
(B.Sc., Agri) संस्थापक,
मार्गदर्शक संचालक

**ॲड.बाळासाहेब शिंदे**
M.B.A.LLB.
(कार्यकारी संचालक)

**श्री. साईनाथ रोहमारे**
(व्हाईस चेअरमन)

## संलग्न संस्था

१) देवयानी सहकारी बँक २) संजीवनी सहकारी पतसंस्था ३) संजीवनी एज्युकेशन सोसायटी ४) संजीवनी कामगार पतपेढी ५) संजीवनी सैनिकी शाळा ६) संजीवनी इंग्लिश मिडियम स्कूल ७) संजीवनी शैक्षणिक ग्रामीण विकास विश्वस्त संस्था ८) संजीवनी मिल्क लि. ९) अमृत संजीवनी,सुवर्ण संजीवनी शुगरकेन ट्रान्सपोर्ट कं. लि. १०) संजीवनी मत्स्य संस्था ११) शेतकरी सहकारी संघ १२) यशवंत कुक्कुट पालन संस्था १३) संजीवनी मदत केंद्र १४) संजीवनी तालीम संघ १५) संजीवनी ॲडव्हेंचर स्पोर्टस क्लब १६) महाराष्ट्र राज्य शुटींग बॉल असोसिएशन १७) संजीवनी उद्योग समूह

**विश्वास, जिव्हाळा आणि आनंदाचा सुगंध सर्वांना देणारी संजीवनी.**

## संचालक मंडळ

| | |
|---|---|
| श्री. शिवाजीराव बारहाते | श्री. बाळासाहेब वक्ते |
| श्री. साहेबराव कदम | श्री. पोपटराव पगारे |
| श्री. आप्पासाहेब दवंगे | श्री. विश्वासराव महाले |
| श्री. विलासराव वाबळे | श्री. राजेंद्र नरोडे |
| श्री. संजयराव होन | सौ. विठाबाई शिंदे |
| श्री. कैलासराव माळी | श्री. संदीपराव चव्हाण |
| श्री. रघुनाथ सांगळे | श्री. अरुणराव येवले |
| सौ. राहिबाई जाधव | श्री. सोपानराव पानगव्हाणे |
| श्री. राजेंद्र भाकरे | श्री. भास्करराव तिरसे |
| श्री. पथाजी देवकर | श्री. निवृत्ती बनकर |
| श्री. रामनाथ चिने | सौ. शोभाताई औताडे |

श्री. शिवाजीराव दिवटे *(जनरल मॅनेजर, शुगर)*
श्री. निवृत्ती कोळपे श्री. त्र्यंबकराव सरोदे *(स्विकृत संचालक)*
श्री. शिवाजीराव कोकाटे *(कामगार संचालक)*
श्री. अण्णासाहेब देवकर *(कामगार संचालक)*
मा. प्रादेशिक सह. संचालक साखर *(अहमदनगर)*
श्री. टी.आर. कानवडे *(सेक्रेटरी) व सर्व खातेप्रमुख*

# महापालक सन्मान

**पुणे :** सामाजिक कार्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल युक्रांदचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी आणि संस्थापक सदस्य डॉ. उर्मिला सप्तर्षी यांना २७ जुलै रोजी 'महापालक सन्मान' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हा पुरस्कार 'सर फाउंडेशन' आणि 'डीपर' संस्थेतर्फे देण्यात आला. पुण्यातील गणेश कला-क्रीडा मंच येथील सभागृहात झालेल्या या सोहळ्यात राज्याचे वनमंत्री आणि भारती विद्यापीठाचे कुलपती ना. डॉ. पतंगराव कदम आणि अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले.

'सर फाउंडेशन' आणि 'डीपर' संस्था ही शैक्षणिक क्षेत्रात कार्य करत आहे. आपल्या मुलांचे परिपूर्ण पालकत्व आणि सामजिक कार्यातून प्रेरणादायी ठसा उमटवणाऱ्या जोडप्याला हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार सोहळ्याचे यंदाचे दुसरे वर्ष होतं. पहिला महापालक सन्मान पुरस्कार डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे यांना देण्यात आला होता. २०१४ या वर्षासाठी डॉ. कुमार सप्तर्षी व डॉ. उर्मिला सप्तर्षी यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सर फाउंडेशनचे संस्थापक-सचिव हरीश बुटले यांनी केले. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ आणि एक लाख रुपयांचा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या प्रसंगी बोलताना डॉ. पतंगराव कदम यांनी सप्तर्षी दांपत्याच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, ''संघर्ष, कठोर परिश्रम आणि समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या डॉ. कुमार सप्तर्षींचे कार्य मी अनेक वर्षांपासून पाहात आहे. अशा व्यक्तीची जीवनसाथी म्हणून डॉ. उर्मिला सप्तर्षी यांच्या कार्याचे मोल अधिक आहे. महापालक सन्मानासाठी केलेली निवड योग्य आहे. मला त्यासाठी निमंत्रित केले, त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. बाळासाहेब भारदे हे आम्हा दोघांचे गुरू. तरुणपणापासून डॉ. सप्तर्षींचे कार्य मी बघत आहे. संघर्ष हा आम्हा दोघांच्या आयुष्याचा समान धागा आहे. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी या संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. सप्तर्षी हे कार्य करत आहेत. त्यांचे कार्य समाजाला दिशा देणारे आहे.''

भारती विद्यापीठातर्फे देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्कार डॉ. कुमार सप्तर्षी यांना देणार असल्याचेही ना. कदम यांनी या वेळी जाहीर केले. ''आज 'युक्रांद'च्या माध्यमातून अनेक तरुणांना त्यांचे मार्गदर्शन लाभते. त्यामुळे भरकटलेले तरुण योग्य दिशेने वाटचाल करतात. मी या कार्याला शुभेच्छा देतो आणि तरुणांना हे मार्गदर्शन असेच मिळत राहो, अशी अपेक्षा व्यक्त करतो,'' असे डॉ. कदम म्हणाले.

डॉ. नागनाथ कोत्तापले म्हणाले, ''१९६७ साली बाबा आमटे यांच्या सोमनाथ प्रकल्पात झालेल्या श्रमसंस्कार शिबिरात मी डॉ. सप्तर्षी यांचे नेतृत्वकौशल्य बघितले. बीड येथील बलभीम महाविद्यालयात कार्यरत असताना निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक डॉ. सप्तर्षींनी सत्याग्रही पद्धतीने केली, त्याचा मी साक्षीदार आहे. सत्याग्रही पद्धतीने कॅपिटेशन फी, दलित शिष्यवृत्ती आणि अनेक सामाजिक विषयांवरची डॉ. सप्तर्षींच्या आंदोलने समाजासाठी महत्त्वपूर्ण ठरली. त्या काळात त्यांनी सोडवलेले प्रश्न आज चौपट गंभीर बनत असताना कुणीही भूमिका घेताना दिसत नाही. म्हणून या परिस्थितीत डॉ. सप्तर्षींना मार्गदर्शनाची अधिक गरज आहे. या महापालक पुरस्काराचे यादृष्टीने अधिक महत्त्व आहे.''

डॉ. उर्मिला सप्तर्षी यांनी आपल्या मनोगतातून सहजीवनाच्या प्रवासातील आठवणी उलगडल्या. त्या म्हणाल्या, ''लग्नाचा निर्णय घेण्याआधी झालेल्या चर्चेत माझे पालकत्व घेशील का? असा प्रश्न विचारणाऱ्या डॉ. कुमार सप्तर्षी या तरुणाचे पालकत्व मी स्वीकारले. आजवरची वाटचाल संघर्षमय होती. अडचणी आल्या; पण मार्ग निघत गेला. शिपायापासून ते पंतप्रधानांपर्यंत प्रत्येकाशी समरस होऊन संवाद साधण्याची कुमारांची हातोटी विलक्षण असून, आजही संघर्षाचे आव्हान पेलण्याचे कार्य अखंड चालू आहे. कबीर या आमच्या मुलाला कुमारांनी 'क्वालिटी टाइम' दिला. सतत सकारात्मक विचाराने काम करणाऱ्या या माणसाच्या ध्येयवादीपणाचा मला आदर वाटत आला आहे. काम करताना सुरुवात केली, तेव्हा भेडसावणारे प्रश्न आज अधिक भीषण आहेत. मिशन अजून पूर्ण झालेले नाही. खूप काम बाकी आहे. कुमारांनी कायम प्रस्थापित व्यवस्थेच्या अन्यायाविरोधात बंडखोरी

केली. साधारणपणे अशी माणसे समाजाला आवडत नसतात. सर फाउंडेशनने तरीही हा पुरस्कार दिला, याचा मी विशेष उल्लेख करते.''

डॉ. कुमार सप्तर्षी म्हणाले, ''सामाजिक कार्य हे अगदी सहज भावनेने होत असते. त्याग केल्याच्या भावनेपेक्षा आनंद आणि समाधान महत्त्वाचे आहे. लोकनायक जयप्रकाश नारायण, साथी डॉ. राममनोहर लोहिया, एस. एम. जोशी, बाबा आमटे, आचार्य दादा धर्माधिकारी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बाळासाहेब भारदे असे गुरु मला मिळाले. बिहारमध्ये जयप्रकाश नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली दुष्काळात काम करताना सामाजिक कार्याचा खरा अर्थ कळाला. समाजातील वेदनेशी नाते जोडणे म्हणजेच सामाजिक कार्य, याची जाणीव झाली. विविध धर्मांमध्येही अशी तत्त्वे आहेत.''

डॉ. सप्तर्षी यांच्या भाषणाला श्रोत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला युक्रांदचे कार्यकर्ते, पदाधिकारी, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, भारतीय समाज विकास व संशोधन संस्थेचे विश्वस्त व कर्मचारी, भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, सप्तषी दांपत्यावर प्रेम करणारे मित्र, नातेवाईक आणि अनेक हितचिंतक उपस्थित होते. मुक्ता गरसोळे-कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# राष्ट्रीय सामाजिक पुरस्कार

नागपूर : ''नागपूरशी माझा ऋणानुबंध फार जुना आहे. मी काम करत असताना मला पुरस्कार विदर्भाने दिला. पुण्यात मात्र रिटायर्ड होण्याची खात्री झाल्याशिवाय कुणी पुरस्कार देत नाही. कमलाताई होस्पेट, भाऊ समर्थ, जांबुवंतराव धोटे, राम शेवाळकर, दिनकर मेघे यांच्यासारख्यांनी मला इथे खूप प्रेम दिले आहे. नाते जपणारा आणि नात्यांवर प्रेम करणारा हा प्रदेश आहे. इथले आदरातिथ्य आणि आग्रह मी अनुभवला आहे. असे नमुने इतरत्र कुठेही मिळतच नाहीत. विदर्भातल्या माणसांसारखे लोक दुसरीकडे नाहीत'', असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणेचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांनी रविवारी व्यक्त केले.

सी. मो. झाडे फाउंडेशनतर्फे संचालित सत्यनारायण नुवाल गुरुकुल व्यसनमुक्ती केंद्रातर्फे डॉ. गिरीश गांधी राष्ट्रीय सामाजिक कार्य पुरस्काराने डॉ. कुमार सप्तर्षी यांना गौरवान्वित करण्यात आले. या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. एक लाख रुपयांचा धनादेश, शाल-श्रीफळ, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम साई सभागृह, शंकरनगर येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकमत मीडिया प्रायव्हेट लिमिटेडचे चेअरमन आणि खा. विजय दर्डा तर प्रमुख अतिथी म्हणून न्या. व्ही. एस. सिरपूरकर, ज्येष्ठ गांधीवादी अँड. मा. म. गडकरी, सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे चेअरमन सत्यनारायण नुवाल, सी. मो. झाडे फाउंडेशनचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार विकास झाडे, उर्मिला सप्तर्षी, सी. मो. झाडे फाउंडेशनच्या सचिव भारती झाडे, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गिरीश गांधी प्रामुख्याने उपस्थित होते. सप्तर्षी म्हणाले, ''कार्यकर्त्यांची बूज राखण्याचे आणि त्याला प्रोत्साहन देण्याचे काम महाराष्ट्रातच होते. त्यामुळेच म. गांधी गुजरात सोडून येथे आले. या पुरस्काराने कार्यात सातत्य राखण्याची प्रेरणा मिळाली.'' या प्रसंगी केंद्राला सहकार्य करणाऱ्या नयना धवड, ज्ञानेश्वर रक्षक, सुधाकर त्रिफळे, डॉ. अशोक दाबेकर, राजाभाऊ चिटणीस, रवींद्र सातपुते, दीपक रंगारी यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी नितीन गडकरी म्हणाले, ''आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांची बूज राखण्यासाठी डॉ. सप्तर्षी यांनी प्रवाहाविरोधात काम केले. जयप्रकाश नारायण यांनीही समाजपरिवर्तनासाठी मोठे काम केले. आजही सप्तर्षी यांचे कार्य सुरू आहे. त्यांना हा पुरस्कार देताना समाधान वाटते.''

खा. विजय दर्डा यांनी सप्तर्षी यांच्या कार्याची प्रशंसा करून त्यांनी महाराष्ट्राचे नाव देशात उंचावले, असे सांगितले. सातत्याने चळवळीत काम करून नवा महाराष्ट्र घडवला. गडकरींमध्ये विचार करण्याची चांगली क्षमता आहे. गडकरींकडून विदर्भ, महाराष्ट्राला खूप अपेक्षा आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, युवकांना रोजगार देण्यासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा. आयकर बंद करण्याची संकल्पना गडकरींनी प्रत्यक्षात आणावी, असे आवाहन विजय दर्डा यांनी यावेळी केले. सिरपूरकर यांनी सप्तर्षींचा गौरव केला. नागपूर दिलदार माणसांचे शहर आहे; त्यामुळेच येथे सर्व पक्षांचे लोक एकमेकांचे मित्र आहेत, असे ते म्हणाले. प्रास्ताविक विकास झाडे यांनी केले. अखेर सावनेरच्या मूक-बधिर विद्यार्थ्यांनी वंदेमातरम गीतावर नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय तांबेकर यांनी केले, आभार बळवंत मोरघडे यांनी मानले. (फोटो : मलपृष्ठ क्र. ३ वर)






## रिपोर्ताज

*नागालँडचा इतिहास वाचताना आपल्या 'स्वातंत्र्या'साठी इंग्रजांबरोबर कट्टर लढलेल्या गावाची गोष्ट वाचनात आली होती. मोठं अद्‌भुत वाटलं होतं त्या गावाबद्दल. असं गाव अस्तित्त्वात असू शकतं हेच मुळात अगदी कालपर्यंत– म्हणजे येळ्ळूरला भेट देईपर्यंत मला अविश्वसनीय वाटत होतं. पण आता भेटीनंतर अविश्वसनीय वाटतंय ते स्वतंत्र भारताच्या सन्माननीय नागरिक असलेल्या आपल्याच गावावर स्वतंत्र भारतात आपला हक्क मागताना अमानुष दडपशाही सहन करावी लागते. फक्त मनुष्य प्राण्यांनाच नाही तर अगदी गोठ्यात मुकपणे गवत चघळणाऱ्या निष्पाप जित्राबांनाही ! सीमाप्रश्नाचा मुद्दा घेऊन लढणाऱ्या बेळगांवच्या दै. तरुण भारतमध्ये रविवार, दि. २७ जुलै २०१४ रोजी घडलेल्या घटनेचा दुसऱ्या दिवशीच्या अंकात आलेला क्रम असा दिलेला आहे.*

घटनाक्रम –

- पहाटे ५ : बेळगाव ग्रामीण पोलीस स्थानकाजवळ फौजफाटा व साहित्याची जमवाजमव.
- पहाटे ५ ते सकाळी ६ : वडगाव ते येळ्ळूर मार्गावरील झाडांच्या फांद्यांचे अडथळे हटवत येळ्ळूरच्या वेशीकडे मार्गक्रमण.
- सकाळी ६.१५ : येळ्ळूरच्या वेशीतील पुनर्निर्मित 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' फलक हटवला.
- सकाळी ७ ते १० : येळ्ळूर पाठोपाठ राजहंसगड, देसूर येथील फलक हटावची मोहीम.
- सकाळी १० ते ११ : पोलिसांची गावात घुसून दंडुकेशाही, महिलांना मारहाण, निष्पापांना अटक.
- सकाळी ११ : रणरागिणी उतरल्या रस्त्यावर.
- सकाळी ११.१५ : संतप्त येळ्ळूरवासीय तानाजी गल्ली परिसरात दाखल, याचवेळी पोलीस व माध्यमप्रतिनिधींवर दगडफेक. पोलिसांची लाठीमारीची तयारी.
- सकाळी ११.१५ ते ११.४५ : पोलिसांचा अमानुष लाठीमार, नंगानाच.
- दुपारी १२ : आमदार संभाजी पाटील यांची येळ्ळूरला भेट.

# येळ्ळूर : ठसठसणाऱ्या सीमाप्रश्नाची भळभळ...

– राजा शिरगुप्पे

(१)

आता सर्वच वाहिन्यांवर या पोलिसांच्या अमानुष लाठीमाराची अथक 'ब्रेकिंग न्यूज' चालू आहे. कर्नाटक शासनाच्या पोलिसांच्या क्रौर्याच्या विरोधात सामान्यांकडून, राजकारण्यांकडून, कार्यकर्त्यांकडून निषेधाच्या बातम्याही आणि 'बाईटस्'ही झळकताहेत. सीमाभागात १४४ कलमाची स्मशानशांतता पसरली असून एक प्रकारचा अस्वस्थ स्फोटक तणाव तयार झाला आहे. सीमावासियांच्या मनात आणि जनातही.

मीना शेषू – सामाजिक कार्यकर्ती मैत्रीण तिला मातृशोक झाला आहे म्हणून भेटायला गेलो. तिच्या चेहऱ्यावर प्रचंड वेदना दाटून आलेली. पण ती आईच्या वियोगाची नव्हती. ती त्वेषाने सांगत राहिली, याविरूद्ध आपण मानवाधिकार आयोगाकडे दाद मागितली पाहिजे. हा राज्यसंस्थेचाच मानवाधिकारांना कुचलण्याचा घृणास्पद डाव आहे. केवळ सीमावादाचा प्रश्न म्हणून याकडे पाहून चालणार नाही.

मी म्हणालो, बरोबर आहे बाई तुझं. सीमेबाहेरच्या सर्व जगासाठी हा मानवी स्वातंत्र्याच्या अधिकारांचा प्रश्न आहेच. पण आम्ही सीमावासियांसाठी पण काल घडलेला आणि वर वर्तमानपत्री भाषेत दिलेला घटनाक्रमच केवळ तो नाही तर गेली ५८ वर्षे आम्ही आमच्या अस्तित्त्वाच्या हुंकारासाठी दाद मागतोयं, त्याचं काय?

येळ्ळूर हे त्या लढ्याची सतत धगधगणारी ठिणगी आहे. याक्षणी फक्त मनात एवढंच घोळतंय, पत्रकार म्हणूनच नव्हे तर एका सीमावासिय म्हणून येळ्ळूरच्या आपल्य बांधवांना भेटायलाच हवं.

मीनानं आपल्या बेंगळूरच्या–कर्नाटकच्या राजधानीत राहणाऱ्या कार्यकर्त्या मित्राला फोन लावला होता, तिकडे या घटनेची प्रतिक्रिया काय उठलीय हे विचारण्यासाठी. तिकडून त्याचं आलेलं उत्तर तर आणखीच गरगरवणारं आणि चीड निर्माण करणारं होतं. तो सांगत होता,' इकडच्या माध्यमांतून असं दाखवलं जातयं की मराठी गुंडांनी पोलिसांवर बेछुट दगडफेक केली.'

मोबाईल वाजला. सत्याग्रही विचारधाराचा सहसंपादक सतीशचा फोन. ''सर, येळ्ळूरचा वृत्तांत कोण कळवू शकेल तिकडून?'' मी चटकन् उत्तरलो, ''मीच.'' मग तर छानच ! तो खुशी दाखवत म्हणाला.

येळ्ळूरला जायची इच्छा तयार होतीच. आता कर्तव्य झालं!

(२)

घटनास्थळी जाण्यापूर्वी थोडी इतिहासाची उजळणी करायला हवी. स्वतंत्र भारतात राज्यांच्या रचना भाषावर करायचे धोरण ठरल्यानंतर फाझल अली आयोगाने जो १९५६ साली नेमण्यात आला, भाषावार प्रांतरचनेचा आराखडा तयार केला. त्यात बेळगांव, कारवार, बिदर, भालकी हा मुळात मराठी बहुभाषिक असलेला प्रदेश कन्नड भाषिक प्रांतात घुसडला आणि या प्रश्नाची पायाभरणी झाली. ही अन्याय वाटणारी विभागणी होण्यात अर्थात तत्कालीन राजकीय स्वार्थ आणि हितसंबंधही गुंतलेले होते. उदा. अशी एक वदंता आहे की कर्नाटकसिंह नावाने ओळखले जाणारे स्वातंत्र्य चळवळीतील जमीनदार गांधीवादी कार्यकर्ते गंगाधर देशपांडे यांनी आपली जमीन कुळकायद्यातून वाचवण्यासाठी (त्यावेळी महाराष्ट्रात हा कायदा झाला होता, कर्नाटकात म्हणजे त्यावेळच्या म्हैसूर राज्यात नव्हता.)आपलं बरचंसं राजकीय वजन कन्नड प्रांतासाठी खर्च केलं होतं. अर्थात लोकांच्या चर्चेत असलेलं हे एक कारण अशी अनेक कारणं आहेत. मग स्वतंत्र भारतातील भाषिक हक्कासाठीचे पहिली मोठी चळवळ संयुक्त महाराष्ट्रासाठी सुरू झाली. त्यामुळे मूळचे काश्मिरी पंडित असलेले आणि मुळात भाषावर प्रांत रचनेला ज्यांची मानसिकता अनुकूलच नसावी असे ज्यांच्या वर्तनावरून अनुमानास जागा आहे, त्या महाजन यांच्या एकसदस्यीय आयोगाची निर्मिती झाली. त्याला दोन्हीही म्हणजे म्हैसूर (आजच्या कर्नाटक) आणि महाराष्ट्राच्या कारभाऱ्यांनी मान्यता दिली. मग तो 'वादग्रस्त' महाजन आयोग अस्तित्त्वात आला. त्या एकूण अभ्यासाअंती महाजन साहेबांनी बेळगांव वगळता ८७३ मराठी भाषिक गावे महाराष्ट्राला बहाल केली. कर्नाटक विधानसभेने आत्यंतिक आनंदाने याला मान्यता दिली. महाराष्ट्र विधान सभेने नकार आणि बेळगाव व परिसरातील सीमावासीय दुःखसागरात 'जाऊ तर बेळगांवसहच महाराष्ट्रात' या त्वेषाने

महाराष्ट्र एकीकरण समिती सीमाभागात जनसामान्यांना एकवटून उभी राहिली. बहाल केलेल्या गावांनीही स्वतःचा स्वार्थ नाकारला. त्यासाठी 'कुद्रेमनी' व 'धामणी' सारखी छोटी गावे महाराष्ट्रात कर्नाटकी शासनाखालची अनाथ बेटे म्हणून उभी राहिली. महाराष्ट्राला आधीच बहाल असूनही आपल्या इतर कर्नाटक प्रांत बंदिस्त झालेल्या मराठी भावंडासाठी काही मराठी गावे अखंडत धगधगत राहिली. त्यातील एक बिनीचं गाव 'येळ्ळूर' लढ्यातील कर्नाटक शासनाला सर्वात जास्त उपद्रवी वाटणारं आणि म्हणून अगदी मनापासून नको असणारं गावं. या गावानं कर्नाटकात असूनही आपल्या सीमेवर 'येळ्ळूर महाराष्ट्र राज्य' असा फलक वीस पंचवीस वर्षांपूर्वीच स्वाभिमानाने उभारलेला.

एकाचा स्वाभिमान हा दुसऱ्याला आपला अपमान वाटतो.

सत्ताधाऱ्यांना तर फारच.

मराठीवाद्यांना शह म्हणून उर्वरित कर्नाटकात कन्नड अभिमान सांगणाऱ्या संघटना –पक्ष उभे राहिले आहेत. स्वातंत्र्य चळवळीतले ज्येष्ठ गांधीवादी नेते अण्णू गुरुजींपासून नाठाळपणे आक्रमक आंदोलने करणाऱ्या वाठाळ नागराज आणि त्यातही सवतासुभा मांडणाऱ्या नारायण गौडांपर्यंत त्यांचे नेते एवढेच नव्हे तर दोन्ही बाजूच्या संघर्षात त्या त्या बाजूच्या नेत्यांनी शिवाजी महाराज आणि राणी चन्नमाला आपले आदर्श म्हणून खेचले. भाषिक अस्मितांना अशी इतिहास अस्मिता बनवण्यात आली. अशाच एका कन्नड दुराभिमान्याने, बेळगाव जिल्ह्यातल्याच गोकाक या तालुक्याच्या शहरातील (आता गोकाक स्वतंत्र जिल्हा होऊ घातला आहे.) रहिवाशी भीमाप्पा गडद याने या फलकाविरूद्ध याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांकडे अहवाल फलकाबद्दल मागितला, का हटवू नये याच्या कारणांसहीत. सुनावणी आणि निर्णय ठेवला ४ ऑगस्ट २०१४ रोजी. जिल्हाधिकाऱ्यांनी कारणं देत बसण्यापेक्षा फलकच उखडून टाकणं सोयीचं म्हणून दिनांक २५ रोजी पोलीस बंदोबस्तात फलकच काढून टाकला. सगळं गाव अवाक् होऊन दुरून हा उच्छेद पाहत होतं. आपल्या विद्यमान आमदार संभाजी पाटील यांच्या साक्षीनं. गावाची इच्छा होती, आमदारांनी हस्तक्षेप करून शासनाच्या या कृतीला अडवावं.

आमदारांना पोलिसांनी ही न्यायालयीन कृती म्हणून थोपवलं. लेखी आदेश मागायचं बहुधा आमदारांना सुचलं नसावं. आमदार म.ए. समितीचे मागील भाजप आमदाराचा पराभव करून निवडून आलेले.

आमदारांनी लोकांना थोपवलं.

पण फलक पाडणं हा येळ्ळूरवासियांच्या जिव्हारी लागलं. कारण ती त्यांची मानखंडना होती. रात्री गावच्या तरुणाईची गंभीर बैठक झाली. मर्द मराठ्यांचा गाव असा मूग गिळून कसा बसेल? ज्येष्ठ पुढाऱ्यांना आणि भागाच्या नेत्यांना त्यांनी सुनावलं, तुम्ही आता आम्हाला आडवं येऊ नका. आम्ही करू काय करायचं ते.

दुसऱ्या दिवशी सकाळीच तासाभरात त्यांनी पुन्हा फलक बांधला. 'महाराष्ट्र राज्य' या भगव्या शब्दांत रंगवला.

हा तर राजद्रोहच! शासन व्यवस्था पिसाळली. केवळ फलक हटवायचा नाही, तर आता येळ्ळूरलाच दहशत बसावयची याची गुप्त आखणी करून परराष्ट्रावर आक्रमण केल्यासारखे २८ तारखेच्या भल्या सकाळी कर्नाटक शासनाचे पोलीस दल सुसज्जतेने येळ्ळूरवर चालून गेले.

## (३)

३१ तारखेला दुपारी निपाणीतून बेळगांवमध्ये पोहोचलो. साऱ्या सीमा परिसरातच बेळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी १४४ कलम लावलेलं. दोन्ही राज्यांच्या एसट्या परस्परांच्या सीमेत व्यवहार करत होत्या. आपसूकच सामान्य प्रवाशांचे हाल वगैरे. बेळगावात वळणी पडलेल्या सवयीने लोकांचे रोजचे व्यवहार चाललेले. सचिन या व्हीडीओग्राफर मित्राला घेऊन बेळगावच्या काही लोकांना भेटून परिस्थितीचा अंदाज घ्यायचं ठरवलं. त्यानं थेट कन्नड भाषिक मित्रांकडेच नेलं. अथणीहून बेळगावात व्यवसायाठी स्थायिक झालेले मुधू कल्लोळी आणि त्यांचा भाऊ रमेश कल्लोळी *'बा री'* असं कन्नड तोंडभरून त्यानं स्वागत केलं आणि लगेच दुकानातल्या पोऱ्याला चहा आणण्यासाठी पिटाळलं. चर्चेची नांदी वगैरे आळवत त्याला थेट मुद्द्यावर आणलं. त्याला पोलिसांचा खूपच कळवळा वाटत होता म्हणाला, '' मी पण फक्त टि.व्ही.वरच पाहिलंय. पण पोलिसांनाही मुलंबाळं बायका असतात. त्यांचीही अडचण समजून घ्यायला हवीच ना? आणि गप्प केंद्रशासित करून टाकला हा भाग तर *वड्डात प्रॉब्लेम इल्ला."* लाठीमाराबद्दल काहीच बोलायला तयार झाला नाही हा कानडी गडी.

सचिननं तिथून चव्हाटा गल्लीत नेलं. बेळगावच्या सीमालढ्यांपासून ते अलीकडे बेळगावात होत असलेल्या हिंदू–मुस्लीम दंगलीचं उर्जा केंद्र. एका सराफी दुकानात गेलो. दागिन्यांनी भरलेल्या काउंटरच्या मागे एक लठ्ठ पण तरतरीत ओझे बसलेले. सचिननं ओळख करून दिली, 'पिंटू' त्या वजनदार देहाकडं पाहत मनात उठलेला पिंटूचा आकार मोजू लागतो.

पिंटू सांगतोय, ''म. ए. समितीतल्या स्वार्थी नेत्यांमुळे या प्रश्नाची वाट लागलीयं. म्हणूनच आम्ही तरुणांनी 'राजकारणविरहित अशी सीमाप्रश्नासाठी स्वराज्य संघटना'

काढली होती.''

''राजकारणविरहित म्हणजे?'' मला नेहमीच 'राजकारणविरहित' हा शब्द एक कार्यकर्ता म्हणून बुचकळ्यातच टाकतो. कारण राजकारण म्हणजे न पटणाऱ्या प्रस्थापिताविरोधात उभं राहणं अशी माझी आपली समजूत आहे.

''म्हणजे फक्त कायदेशीर मार्गानं न्यायालयातून. रस्त्यावर यायचं नाही. निवडणूकीत पडायचं नाही. पण आमच्यातल्याच काहीजणांनी तिचा 'गँग'सारखा उपयोग सुरू केला. मग विसर्जित करून टाकली. आता हे येळ्ळूर प्रकरण कर्नाटक शासनाने का घडवलं माहिती आहे? हा प्रश्न आता सुप्रिम कोर्टात आहे आणि दोन महिन्यात त्याची सुनावणी आहे. त्यातून कदाचित बेळगावसह सर्व प्रदेश महाराष्ट्राला द्यायला लागण्याची साधार भिती कर्नाटकाला आहे. त्या आधीच असं वातावरण तयार करून तडजोडीच्या नावाखाली महाजन अहवालात अनुकूल प्रदेश महाराष्ट्राच्या माथी मारता येईल असा यामागचा कावा आहे सर. शिवाय आता म.ए. समितीचा आमदार आहे. मागच्या आमदार बी.जे. पी. चा होता. तो स्वतःला कन्नडवादी म्हणवत नाही. पण आहे कट्टर कन्नडीगच. कारण तो जैन आहे. लिंगायत, जैन हे मुळात कन्नड भाषिकच. मुसलमान, दलीत हे अल्पसंख्यांक. त्यांना मराठी –कन्नड भाषेशी काय देणं–घेणं? पण लढायला उरलो फक्त आम्ही मराठा आणि ब्राह्मण. पण इथंही बा. र. सुंठणकर जोवर म.ए. च्या नेतृत्वस्थानी होते, तोवर म.ए. समिती एकसंध होती. पण जेव्हा ते नेतृत्व मराठ्यांच्या हाती गेलं. तेव्हा समितीत फाटाफूट सुरू झाली.''

''आणि किरण ठाकूरांचं काय?''

''त्यांनी आपल्या दैनिकांतून प्रश्न जिवंत ठेवला हे सत्यच आहे. शिवाय आपल्या दैनिकासाठी त्यांना सर्वांनाच सांभाळावं लागतं.''

म्हणजे कुणाकुणाला हा प्रश्न विचारावासा वाटूनही मी गप्प राहिलो. पिंटूंचं व्यापार राजकारण पांडीत्य समजून घेत होतो. ''पण त्या बी.जे.पी. आमदाराचं काय?'' माझा पिंटूला रूळावर आणण्याचा प्रयत्न.

''त्यानंच तर आपल्या तरुण कार्यकर्त्यांना उठवून बसवलं. ज्येष्ठ नेत्यांचा सबुरीचा सल्ला असताना पुन्हा तो फलक उभा रायला लावला. आणि पोलिसांना चेतावणी देण्यासाठी त्यांच्यावर दगडफेकीची सुरुवात करून मग गावकऱ्यांना दावणीला देऊन गायब झाले.''

''पण पोलिसांनी अमानुष वर्तन केलं हे.'' मी.

''त्याचं समर्थन होऊच शकत नाही.'' पिंटूचं आपलं लंबोदर कुरवाळत उत्तर.

बेळगाव जिल्ह्याचा झी वाहिनीचा प्रतिनिधी राजू भोसले या मित्राकडे गेलो. पोलिसी अत्याचाराचं थेट चित्रण त्यानं आपल्या



*केवळ येळ्ळूरच नव्हे; तर कर्नाटकात समाविष्ट असणाऱ्या मराठी प्रदेशांबाबत सतत मोर्चे, आंदोलने होत आहेत. बेळगावात महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने बेळगाव शहराचे नामांतर करण्याच्या विरोधात काढलेल्या विराट मोर्चात एकत्र आलेले हजारो मराठी कार्यकर्ते.*

कॅमेऱ्यातनं पोलिसांबरोबरच राहून चांगलं पकडलंय. त्याचं मत, ''बीजेपी आमदाराच्या कार्यकर्त्या मुलांनीच केलंय हे खरंय. पण त्यानं ते सत्ताधारी काँग्रेसच्या विरोधासाठीच केलयं. पण नंतरच्या घटनांमुळे येळ्ळूरचे पाचशे तरुण सर्व सीमानेत्यांवर नाराज आहेत. ते सर्व आता नव्या नेतृत्वाच्या शोधात थेट माझ्याशी (म्हणजे राजूशी) संपर्कात आहेत.''

''पण त्या हेमंत निंबाळकरनी, बेळगावचे माजी एस.पी., आता म्हैसूरचे आहेत, जे स्वतः मराठी आहेत, ज्यांना प्रकरण हाताळण्यासाठी कर्नाटक सरकारने इथं पाठवलं होतं, ते म्हणताहेत की येळ्ळूरच्या आंदोलकांनी एका पत्रकाराला घरात कोंडलं होतं. त्यातून पोलिसांना हे घरात घुसणं, दरवाजे फोडणं वगैरे करावं लागलं.'' मी.

राजू उसळलाच. ''मराठी माणूसच मराठी माणसाचा घात करतो बघा सर.'' शेजारी बसलेल्या सहकाऱ्यांकडं बोट करून सांगतो की त्यालाच विचारा. उलट गावकऱ्यांनीच याला पोलिसांच्या लाठीमारापासून वाचवण्यासाठी घरात लपवलं. तो तरुण सहकारीही होकारार्थी मान डोलावतो. अजूनही दोनशे तरुण मुलं भीतीनं गावाकडं परतलेली नाहीत. जवळपास १७ मुलं आज पोलिसांच्या अटकेत आहेत.

''मला येळ्ळूरला जायचयं.'' मी राजूला माझा मुख्य हेतू सांगितला.

''अवघड आहे. गावाला जेवढे रस्ते मिळतात तेवढे सारे पोलिसांनी ठाणबंद केलेत. कुणाही बाहेरच्याला सोडत नाहीयंत. काहीवेळा प्रत्यक्ष गावकऱ्यांनाही. तरीही उद्या प्रयत्न करू.'' राजू आश्वासन देत म्हणतो. मी या लोकशाही देशाचा स्वतंत्र नागरिक, जागृत पत्रकार माझ्याच देशातल्या एका गावात प्रवेश कसा करायच्या चिंतेने वेढलोयं.

(४)

राजू म्हणाला, ''आता शिवसेनेच्या दिवाकर रावतेंची पत्रकार परिषद आहे, येळ्ळूर संदर्भाने. ती करून आपण येळ्ळूरमध्ये प्रवेश मिळवायचा प्रयत्न करूया.''

राजूच्या गाडीतूनच खानापूर रोडवरच्या पंचमुखी हॉटेलमध्ये पोचलो. सोबत कोल्हापूरचा झी वाहिनी प्रतिनिधी प्रताप नाईकही होता. आणखीही दोघे. त्यातला एकजण हसत हसत म्हणाला, ''शिवसेनेने सीमाप्रश्नाला खाजगी मालमत्ता केलीयं.'' दुसरा म्हणाला,''मराठी माणसाची वाली हे ब्रीद राखायचंय ना तिला!''

''कुठल्या? हिंदू मराठी की मुस्लीम?'' आणखी एक कॉमेंट. मग हशा. हॉटेलमध्ये पोचलो तेव्हा वर्तमानपत्र आणि वाहिन्यांच्या प्रतिनिधींची हिंदी-मराठी-कन्नड गर्दी.

अर्ध्या एक तासानंतर अर्ध्या वाटेवर आलेत, शहरात पोचलेत, आलेत वगैरे घोषणांनंतर गळ्यात शिवसेनेचं रेशमी केशरी उपरणं घातलेले आमदार दिवाकर रावते, आमदार सुजित मिणचेकर आणि शिवसेनेचे कोल्हापुरातले डाव्या संघटनांत सतत आंदोलन करत लाल म्हणून वाढलेले आणि आता शिवसेनेत भगवे झालेले विजय देवणे आले. मग अर्धा तास खालच्या मजल्यावरून वर, वरून-खाली अशी पत्रकार परिषदेसाठी जागा शोधण्यासाठी पळापळ, एका खोलीत राजू आमदारांना सुचवतो, ''साहेब, तुम्ही येळ्ळूरला जाण्यासाठी आला आहात. पण पोलीस तुम्हांला नक्कीच जाऊ देणार नाहीत. अटक करणारच. त्यापेक्षा तुम्ही आधी पत्रकार परिषद घेऊन टाका.'' आमदार तावातावात उत्तरतात, ''मी कुठलाही कायदा मोडायला आलेलो नाही. मी माझ्या सीमा बांधवांचे अश्रू पुसायला आलेलो आहे. असा आणखी एक अर्धा तास जातो. मग एकदम एका छोट्याशा हॉलमध्ये पत्रकार परिषदेसाठी खुर्च्या मांडल्या जातात. नेतेमंडळी घाईघाईने खुर्च्यांवर स्थानापन्न. आणि अचानक एक पोलीस अधिकारी आत येतो. नेत्यासमोर उभा राहून पत्रकार परिषदेला मनाई करतो. रावतेंना गुरकावतो.'' ''कौन हो तुम? कहाँ से आये हो? जो कुछ करना है वो तुम्हारे महाराष्ट्र मे जाकर करो.'' वगैरे सुनावतोय. रावतेही उभे राहून, ''ऑफिसर, मी या स्वतंत्र देशाचा नागरिक आहे. माझं अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य, विचार, विहार स्वातंत्र्य अबाधित आहे. मी आय.जी.ची परवानगी घेतलीयं. पत्रकार परिषदेनंतर चर्चेला या असं त्यांनीच सांगितलंय.'' आमदार साहेबांचा हिंदी-इंग्रजी-मराठीत प्रतिवाद. कारण तिनही वाहिन्यांचे प्रतिनिधी तिथं आहेत, यावर त्यांचं बारीक लक्ष असावं.

पोलीस ऑफिसर तरीही ऐकत नाहीयं. झालेल्या गदारोळावर झपाझप फोटो फ्लॅश पडताहेत. काही ऑनलाईन प्रक्षेपणही चालूयं.

माध्यमांना जबरदस्त ब्रेकिंग न्यूज.

नेतेमंडळी आयजींना भेटायला बाहेर पडतात. पाठोपाठ पोलिसांच्या गाड्या. आमदारांच्या गाडीला आडवं होण्यासाठी एक पोलीस गाडी ओव्हरटेक करत सरळ गटाराच्या दरीत. तेवढ्यात आमदार जवळच्या रस्त्याने महाराष्ट्राच्या हद्दीत शिनोळीत जाण्यासाठी सुसाट. मराठी माध्यमांचा मथळा, 'आमदारांचा पोलिसांना गनिमा कावा !' कन्नड माध्यमांचा ठणाणा, 'आमदारांचे पोलिसांना भिऊन पलायन !'

मीही राजूच्या गाडीतून शिनोळीकडे निघालो. वाटेत कळालं, सांबरा-बेळगावच्या विमानतळावर वाठाळ नागराजला अडवून त्याच विमानाने त्याची हुबळीला रवानगी. त्याला म्हणे इथे येऊन

फलक काढल्याचा विजयोत्सव साजरा करायचा होता.

बरोब्बर वर्षांपूर्वी याच्याच अनुयायांनी त्या फलकाला रात्रीच्या अंधारात काळं फासलं होतं म्हणे.

शिनोळीच्या थोडंसं पुढं एका बंद दुकानाच्या मंडपात आमदार साहेब वाहिन्यांना निवेदन करतात, ''कर्नाटकात विधानसभेत सगळे भाजप आमदार कन्नडिगांची बाजू उचलून धरतात. पण महाराष्ट्रात आणि संसदेत मराठी भाजप आमदार –खासदार, आमचे युती बांधव असूनही सीमावासियांच्या बाजूने उभे राहत नाही. कर्नाटक शासनाने कशी दडपशाही चालवली आहे ते पाहा. त्यांनी आज मला पत्रकार परिषदही घेऊ दिली नाही. जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाहीयं, तोपर्यंत तो कें द्रशासित करावा.''

''पण साहेब, उद्धव ठाकरेंची भूमिका या प्रश्नी वेगळी आहे.'' माझा आपला सहज शहाणपणा दाखवण्याचा यत्न.

रावतेंनी माझ्याकडे तीक्ष्णपणे पाहत म्हटलं, ''ते पक्षप्रमुख आहेत. पक्षाची भूमिका त्यांना घ्यावी लागते. मी केवळ एक नेता आहे.'' आपल्या गळ्यातलं उपरणं काढीत ते गाडीत बसले.

दुपारी बोगारवेस जवळच्या म.ए.स.कार्यालयात 'झी' नं म.ए. नेत्यांच्या एका गटाच्या बाईटस् घेतल्या. माजी आमदार मनोहर किणेकर, दीपक दळवी वगैरे हजर. सुप्रिम कोर्टाने येळ्ळूर प्रकरणाची दखल घेऊन याचिका सादर करण्याबद्दल केलेल्या सूचनेमुळं सारे आनंद व्यक्त करत होते. प्रतापनं 'देर है लेकीन अंधेर नही' अशी शेरेबाजी करत ब्रेकिंग न्यूज आटोपती घेतली.

किणेकरांना विचारलं, ''या एवढ्या महत्त्वाच्या वेळी म.ए.स. नेतृत्वास्थानी का नाही?'' किणेकरांनी अंतराळात नजर लावत उत्तर दिलं, ''ज्यांनी गेल्या सात–आठ वर्षांत संघटनेची शकलं उडवली त्यांनाच हा प्रश्न विचारा.''

'' म्हणजे कुणाला?''

''मी कशाला नावं घेऊ कुणाची?''

सगळी मंडळी पुण्याला शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली रवाना झाली नंतर.

संध्याकाळी कॉम्रेड मित्र प्राचार्य आनंद सेणसेकडे गेलो. गेली सत्तर वर्षे बेळगाव परिसरात लाल झेंडा फडकत राहण्यासाठी जीवनदान केलेले कॉ. कृष्णा मेणसे या ऋषितुल्य डाव्या विचारवंत कार्यकर्त्या लेखकाचा हा बापाचाच वारसा पुढे चालवणारा सुपुत्र. ज्येष्ठ कॉम्रेडही घरी होते. वय वर्षे ८६. पण अजूनही पंचविशीतला उत्साह. सीमाप्रश्नांसाठी त्यांनीही खस्ता खाल्यात. तुरूंगवास भोगलायं. येळ्ळूरच्या भीषण प्रसंगानंतर पहिल्यांदा येळ्ळूरवासियांना धीर द्यायला धावणारे तेच. कॉम्रेड सांगत होते, ''महाजन आयोगाचा धोका ओळखून त्याला नकार देणारे पहिले कम्युनिस्टच. सुंठणकरांनी, नाथ पैनी प्रथम त्याला मान्यता दिली. पण नंतर नाथ पै यांचा पश्चात्ताप झाला आणि त्याची त्यांनी जाहीर कबूलीही दिली. त्याच ताणाने त्यांना हार्ट अॅटॅक आला असावा. इंदिराबाईंनी ही चुक सुधारण्याची संधी दिली होती. कम्युनिस्टांची सीट निवडून आणण्यासाठी कॉंग्रेसने पाठिंबाही दिला होता यासाठी. पण इथल्या लाथाळीत ते झालं नाही. मग बाईंनीही लक्ष काढून घेतलं. शरद पवारांनीही नवं बेळगाव बसवायची एक योजना मांडली होती. त्यावर समितचे काही नेते म्हणाले, 'यावेळी एवढी  निवडणूक पदरात पाडू नंतर या प्रस्तावाचा पाठपुरावा करू.' पवारांनी हाकलूनच लावलं त्यांना.

मी म्हटलं, आज काही मंडळी सल्ला मसलतीसाठी पुण्यात गेलीयत साहेबांकडं.''

कॉम्रेड हसतात, फक्त हसतात.

(५)

बेळगावात येऊन आज चौथा दिवस. अखेर दै. पुढारीच्या एका तरुण पत्रकार मित्रानं सांगितलं की आम्ही आज येळ्ळूरला जाणार आहोत. आमच्या सोबत या. म्हणजे तुम्हालाही सहज प्रवेश मिळू शकेल. खूप आशेने त्याच्या गाडीत बसलो. येळ्ळूरच्या सीमेवर एक किलोमीटर आधी ५० पोलिसांचा एक नाका. गाडी अडवली. सगळ्यांची तपासणी झाली. गाडीत एक क्राईम रिपोर्टरही होता. त्यानं सगळ्या पोलीस अधिकाऱ्यांची ओळख काढत पहिल्या तपासणी नाक्यावरुन माझी सुटका केली. क्राईम रिपोर्टरचं हे असलं 'वजन' यापूर्वी कधीच माझ्या लक्षात आलं नव्हतं. पन्नास मीटरवरती आणखी शंभर पोलिसांचा दुसरा नाका. इथं मात्र पोलिसांनी माझ्याकडं कार्ड नसल्यामुळं मला नाहीच सोडलं. बिचारे पुढारीकार मित्र माझ्याबद्दल आणि स्वतःबद्दल हळहळ व्यक्त करत सात दिवसांनंतरचं येळ्ळूर कव्हर करायला येळ्ळूरात गेले. मी एकटाच मागे वळून पहिल्या नाक्याच्या अलीकडे एका बांधकाम चालू असलेल्या इमारतीच्या चौथऱ्यावर गेलेल्या मित्रांची वाट पाहत उदास वगैरे बसून राहिलो. बेळगावच्या दिशेने अनेक गाड्या येत होत्या. मोटार सायकली येत होत्या. आणि तेवढ्याच तत्परतेने पोलीस त्यांना माघारी परतवत होते. येळ्ळूरच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूची शेते पुरामुळे पूर्ण पाण्यात बुडालेली होती. ती कुठली नदी असावी याचा अंदाज करत मी समोरच आलेल्या एका गृहस्थाला विचारलं, 'कुठली नदी आहे ही?' तो माझ्याकडे दयार्द्र बघत म्हणाला, '' अहो, नदी नाही नाला आहे तो. पावसाळ्यात खूप पाणी येते आणि ही सगळी शेती नष्ट होते. खरंतर शासनानं वरच्या बाजूला बंधारा घातला तर खूप नुकसानी टळेल आणि शेतकऱ्यांचाही फायदा होईल. पण आम्ही सीमावादात अडकलेले मराठी ना ! आमच्यासाठी

कर्नाटक शासन कशाला पैसे खर्च करेल? कारण महाजन अहवालाप्रमाणे आम्ही कधीच त्यांच्या दृष्टीने महाराष्ट्रात गेलोयं. आई खाऊ घालेना आणि बाप भीक मागू देईना !'' एवढ्यात बालवाडी पहिली वगैरे मुले नेणारी रिक्षा येळ्ळूरच्या दिशेने आली. पोलिसांनी त्यांनाही ठामपणे अडवले. जाऊ दिले नाहीच. रिक्षावाल्याला मी विचारलं, 'आता या बाळांना घरी कसं पोहचवणार?' रिक्षावाला रागारागानेच म्हणाला, '' बघा ना !, भडवे मराठी माणसांच्यावर कसा अत्याचार करतात. आता ह्या मुलांना चालवत शेताच्या बांधावरून या भरगच्च पाण्यातून सुरक्षितपणे गावात पोहचवावे लागणार. '' मी त्या चिमण्या पाखरांकडे हेव्याने आणि दयेनेही पाहतो. मलाही त्यांच्याबरोबर जायचे असते. पण रिक्षावाला अडवतो. ''साहेब, तुम्हाला बघून पोलीस या पोरांनाही अडवतील.''

वाट बघून कंटाळून गेल्यावर बेळगावातील लेखक मित्र गुणवंत पाटलांना फोन केला. त्यांनी आपल्या दुकानातला एक कामगार मला परत आणण्यासाठी मोटर सायकल घेऊन पाठवला. बेळगावात सीमा प्रश्नातले शिक्षक कार्यकर्ते मित्र दिलीप चव्हाणना भेटलो. म्हणालो, ' काही करा पण मला एकदा येळ्ळूर भेटवा.' दिलीप चव्हाण हा तसा सर्पमित्र. क्रियाशील कार्यकर्ता. म्हणाले, ''उद्या सकाळी लवकर तयार व्हा. पोलिसांचा नाष्टापाणी आवरेपर्यंत आपण येळ्ळूरात घुसू. मी माझ्या एस.पी. मित्रालाही गरज पडली तर बोलून ठेवतो.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच दिलीप चव्हाणांच्या मोटर सायलवरून येळ्ळूरकडे निघालो. आज महाराष्ट्रातून आर.आर.पाटील बेळगावला या प्रश्नी भेट देणार आहेत अशी बातमी ऐकून होतो. त्यामुळे नाकेबंदी अधिकच कडक झाली असेल आणि आपल्याला येळ्ळूरात पोहचणे जवळपास अशक्य आहे असच वाटत होतं. पण बेळगावचा एस.पी. असल्यासारखं दिलीप चव्हाणांनी या दोन्हीही नाक्यांवरून पोलिसांना नमस्कार करत सहजच मला आत नेलं. दिलीपरावांच्या या प्रभावाला पाहून मी थक्कच झालो. येळ्ळूरच्या सीमेवरच उखडलेल्या फलकाची जागा बोटानी दाखवित दिलीपरावांनी गावातल्या पहिल्या चौकात आपली मोटरसायकल थांबवली आणि आपल्या काही मित्रांना फोन केला. गावचा डेप्युटी सरपंच असलेला एक तरुण मुलगा समोर आला. म.ए. समितीचाच कार्यकर्ता. मला म्हणाला, ''तुम्ही आमच्याबरोबर हिंडण्यापेक्षा बिगर राजकीय कार्यकर्त्यांबरोबरच हिंडा. शिवाय सुप्रिम कोर्टात याचिका दाखल करण्यासाठी पुरावे गोळा करून ते उद्यापर्यंत पाठवायचे आहेत. त्यातही मी व्यस्त आहे.'' मी 'ठीक.' म्हणून दिलीपरावांनी बोलवलेल्या मधु कुगजी या कॉंग्रेस कार्यकर्त्यांबरोबर मारुती गल्लीतील एका घराकडे वळलो. घराच्या खिडकीच्या काचा जवळपास ठिकऱ्या ठिकऱ्या झालेल्या होत्या. दरवाजावरही ठोकल्याच्या खुणा होत्या. घरमालक शिवाजी पाटील पुढं आले. त्यांनी आपल्या २०-२२ वर्षांच्या मुलाला नितीनलाही बोलावलं. पोलिसांनी त्याला वरच्या मजल्यावरच्या खोलीत लॅपटॉपवर अभ्यास करत बसला असताना गाठला होता. त्याच्या लॅपटॉपच्या चिरफाळ्या करून जिन्यावरून त्याला खाली झोडपत आणलं होतं. त्यांनी आपला शर्ट काढून आपली पाठ दाखवली. सहाव्या-सातव्या दिवशीही त्याच्या पाठीवर निळे-काळे वळ स्पष्ट दिसत होते. घरातल्या आजीबाई संतापानं धुसफुसतच पुढे आल्या. ''मोगलाईबी इतकी वंगाळ नसल बाबा. माझ्या दीड महिन्याच्या नातवालाबी गालावर काच लागलीया. कसला काळ आलाय म्हणायचा ह्यो. आमची भाषा बोलायलाबी आमाला चोरी.'' बाई म.ए. समितीच्या कट्टर कार्यकर्त्या. मी फक्त तिचा आक्रोश ऐकण्यापलीकडे काय करणार?

गल्लीत आलो मारुती, मोटर सायकल यांची मोडतोड तर गल्लीभर पसरलेलीच. पण गोठ्यातली जनावरेही लंगडलेली. त्यांना तर मराठी आणि कन्नड कुठलीच भाषा येत नाही, आणि बहुधा लाठीला कशाचही वावडं नसावं. टीव्हीवर आणि वर्तमानपत्रातून पोलिसांनी केलेल्या मारझोडीची दृश्य पाहिली होती. उड्या टाकून तोडली जाणारी कुलूपे आणि दरवाजे, मोठमोठे दगड, दरवाजावर टाकून दरवाजे फोडण्याचा प्रयत्न. महिला-तरुणांची पळपळ आणि त्यांच्यावर वर्मी होणारा लाठीमार सारेच भयानक आणि थरकापून सोडणारे. विराट गल्ली, मारुती गल्ली, बसवान गल्ली सगळीकडेच एक भयाकुल अशी स्मशान शांतता. तरीही या सगळ्या वातावरणात ' बचेंगे तो और मी लढेंगे ।' असा एक अद्‌भुत मंद स्वर जाणवतोय. चौकातल्या बसवंत नागोजी धामणेकर या ८१ वर्षांच्या किराणा व्यापाऱ्याच्या घरी गेलो. म्हातारा सीमा लढ्यातला बिनीचा कार्यकर्ता. अजूनही ताठ. सीमाप्रश्नासाठी १९६० साली झालेल्या साराबंदीच्या लढ्यात पोलिसांची गोळी पायातून आरपार झालेला. आपली जखम त्यांनी एखाद्या शौर्यपदकासारखी मला दाखवली. येळ्ळूर गावाने त्या लढ्यात लावलेली जिवाची बाजी ऐकवली. एकूण पाच जणांना त्यावेळी गोळी लागली. अश्रूधूर, गोळीबार, लाठीमार हे काही या गावाला नवीन नाही. सीमाप्रश्नासाठी इथला प्रत्येक मनुष्य प्राण त्यागासाठी तयारच आहे. काही लोकांनी प्रश्न सुटेपर्यंत पायात चप्पल घालणार नाही, कुणी दाढी केलेली नाही. काहीजण एकभुक्त आहेत. तर काहीजण केवळ कांबळीवर निजतात. एक वृद्ध गृहस्थ त्याचा श्वास अडला होता. जेव्हा त्याला सांगितलं की, बेळगाव महाराष्ट्रात गेले आहे. तेव्हाच

त्याने प्राण सोडला. अशा इथेच नव्हे तर सारे सीमा परिसरातच दंतकथा भासणाऱ्या सत्यकथा आहेत. मग या सीमालढ्यातले आणखी एक वयोवृद्ध कार्यकर्ते केदारी नागोजी गोरल, वय वर्षे ९०. यांच्या घरी गेलो. त्यांचे धाकटे भाऊ अर्जुन गोरल ज्यांना पोलिसांचा प्रचंड मार खावा लागला. खरंतर ते लोकांना शांत करण्यासाठी धडपडत होते. पण पोलिसांनी 'इसको ही पहला सबक सिखाएंगे' म्हणत लाठीमार सुरू केला. ते आता दिल्लीत पोलिसांच्या या अमानुषतेबद्दल सुप्रीम कोर्टाला माहिती देण्यासाठी पोहचले आहेत. केदारी गोरलनी आपल्याला झालेली जखम अभिमानाने दाखवले. आणि गेली ६० वर्षे मी कसा या लढ्यात सक्रीय आहे याचे एक-एक जीवघेणे किस्से ऐकवू लागले. समोरच भिंतीवर चंद्रशेखर आझादांसारखा दिसणारा; पण भरगच्च दाढीतला त्यांची क्रांतिकारी आवेश दाखवणारा तरुणपणीचा फोटोही त्यांच्या कट्टरतेची साक्ष पुरवत होता. गप्पा चालू होत्या. तेवढ्या त्यांचा तरुण पुतण्या संजय गोरल तिथे आला. आणि जणू मी न्यायाधीश असल्यासारखा माझ्यासमोर गाऱ्हाणं जोराजोरात मांडू लागला. ''म. ए.समितीच्या स्वार्थी पुढाऱ्यांना वैतागून या कट्टर मराठीच्या गावात मी बी.जी.पी.ला आणलं. मनोहर कडोलकरना आम्ही त्यावेळी निवडून दिलं होतं. ते सुद्धा केवळ हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतील या एकाच भावनेनं. मध्ये पी.डब्ल्यू.डी. च्या रस्ता रुंदीकरण योजनेत हा फलक नष्ट होण्याची शक्यता तयार झाली होती. पण आमच्या आमदारांनीच त्यातनं खुबीनं मार्ग काढून हा रस्ता वाचवला होता. पण आम्ही आधी मराठी आहोत. मग बी.जी.पी.चे आणि साहेब तुम्हाल सांगतो, शिवाजी महाराजांचे मावळे फक्त येळ्ळूरातच जन्माला आले. म्हणून आम्ही एवढे लढाऊ आहोत.''

मी फक्त कॉम्रेडसारखा हसलो. गावात फेरी मारताना कार्यकर्ते सांगत होते की त्या दिवशी पोलिसांनी विशाल आणि दीपक या गावच्या दोन तरुण मुलांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं. त्यावेळी गावातल्या सगळ्या महिला रस्त्यावर उतरून मोर्चाने पोलिसांकडे गेल्या. त्यांच्या दबावामुळे त्यांना सोडावं लागलं. पोलीस दगडफेक केली असं म्हणतात. पण एका छोट्या मुलाच्या हातून मधाच्या पोळ्यावर दगड बसला. त्यातून माशा उठल्या. आणि म्हणून बायकांच्यात पळापळ सुरू झाली, त्याचा फायदा पोलिसांनी घेतला. बायकांनाही पोलिसांनी लाठीमार केला. इंदुबाई कुगजी या ७५ वर्षांच्या म्हातारीला एस.पी.नं थोबाडीत मारलं. पोलिसांनी सारा ताळतंत्रच सोडला होता. कारण येळ्ळूरवर त्यांचा फार पूर्वीपासून राग आहे.

गावात फिरताना जाणवत होतं की गाव शांत आहे. चहोबाजूंनी घेरलेल्या पोलिसांच्या दबावामुळे असेल पण गाव आतून स्फोटक मनोवस्थेत आहे. इतकं लढाऊ गाव असतानाही आपल्या न्याय्य हक्कासाठी आणि बांधवांसाठी इतक्या कायदेशीर आणि सनदशीर मार्गाने लढते आहे. ही तर खूपच कौतुकाची गोष्ट. पण त्याचबरोबर ज्यांच्या खांद्यावर विश्वासानं त्यांनी आपली मान ठेवली होती त्या नेत्यांच्यावरचाही आता त्यांचा विश्वास उडालेला आहे. एका अधांतरी अवस्थेत निर्नायकी अवस्थेला या सीमा परिसरातील सारीच जनता आलेली आहे. हे निःसंशय ! गावची देवी चांगळेश्वरी. तिच्याबद्दल गावच्या लोकांत अशी श्रद्धा आहे. गावाच्या ऐन संकटात ती गावचे रक्षण करते. मल्ल सर्जा या राजानं या गावावर हल्ला केला तेव्हा तिने भुंग्यांच्या रूपाने आपले सैन्य पाठवून त्या राजाची दाणादाण केली. हे मधमाशांचं पोळसुद्धा तिनचं उठवलं असावं. अशी एक गमतीदार श्रद्धा त्यांच्यात आता पसरली आहे. येळ्ळूर गाव हे बहुतांश नव्हे तर १००% मराठी भाषिक पस्तीस हजार वस्तीचं, पाच हायस्कूल्स्, आणि बऱ्याच प्राथमिक शाळा. 'जय महाराष्ट्र' नावाचं एक हायस्कूल आहे. जे 'त्या' फलकाजवळच आहे. पोलिसांनी जेव्हा गावावर कब्जा केला. तेव्हा याच हायस्कूलचा आश्रय घेतला. आत फळ्यांच्या वरती म्हणे त्यांनी 'जय कर्नाटक माते' लिहून टाकलं. मुलं शाळेत आल्याबरोबर त्यांनी ते पुसून 'जय महाराष्ट्र' लिहिलं. प्रश्न सुटेपर्यंत अशी प्रत्येक पिढी 'जय महाराष्ट्र' गर्जतच येणार असाच जणू काही याचा अर्थ असावा.

लेखक मित्र गुणवंतराव पाटील मला सांगत होते. '' सीमा प्रश्नाबद्दल इथल्या प्रत्येक सीमावासियांकडून स्वतःची एक सोडवणूक आहे. आणि आपल्या प्रत्येक प्रश्नाबद्दल सीमाप्रश्न सुटणे हे उत्तर आहे.'' येळ्ळूरहून बाहेर पडून रिक्षाने बेळगावच्या मुख्य एस.टी. स्टॅण्डकडे येत होतो. रिक्षावाला तणतणून सांगत होता. ''पुढाऱ्यांनाच प्रश्न सोडवायचा नाहीयं. आमच्या मनाशी खेळून त्यांचा धंदा चाललाय. मी आंदोलनात गेलो. दगडं मारली. तुरुंगात गेलो. मग कोर्टात उभं केल्यावर आमदार भेटायला येतात. म्हणतात, 'तुम्हाला कुणी सांगितलं होतं हा उद्योग करायला? आंदोलनात जायला?' सामान्य माणसाचं असं नीट चाललंय. तसंही नीट चाललयं. पुढाऱ्यांचं काय? ''

अण्णाभाऊंची मैना गावाकडं राह्यलीयं. हे खरंच आहे. पण जीवाची काहिली ही फक्त तिचीच होते आहे, हे ही तितकंच दारूण सत्य आहे, माझ्या महाराष्ट्रवासीय बंधू-भगिनींनो.

**- राजा शिरगुप्पे**
'मीरालय' शिव कॉलनी, आजरा , ता. आजरा,
जि. कोल्हापूर ४१६५०५ मोबा. ९४२३२८७३२०





परखड

# बात्रांची भगवी मात्रा!

*नव्या सरकारला हिंदुत्ववादी आणि भांडवलधार्जिणे म्हटले जाते. सध्या भांडवलधार्जिणेपणा थोडा कमी दिसतो; पण हिंदुत्ववादी अजेंडा स्पष्टपणे दिसायला लागलेला आहे. गुजरातेत शालेय शिक्षणात सनातनी पाठ्यपुस्तकांचा समावेश, इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिक रिसर्चवर सुदर्शन राव यांची झालेली नेमणूक हे याचेच द्योतक आहे. ब्रिक्स परिषदेनंतर मोदींची भलामण केली जात आहे. पण ब्रिक्स बँकेच्या जडणघडणीत मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांचे प्रयत्न मोलाचे आहेत.*

– हेमंत देसाई

*‘विमानाचा शोध राइट बंधूंनी नव्हे, तर भारताने लावला. देवादिकांची विमाने होतीच.’, ‘वाढदिवसाला मेणबत्त्या लावणे नि केक कापणं चुकीचे आहे’* ही मते आहेत रा. स्व. संघाच्या शिक्षणभारतीचे राष्ट्रीय कार्यवाह दीनानाथ बात्र यांची. गुजरातमध्ये गेली कित्येक वर्षे भाजपची सत्ता आहे. केंद्रात नरेंद्र मोदी सरकार आले आहे. नमो गुजरातचे मुख्यमंत्री असताना मार्च २०१४मध्येच तेथील पाठ्यपुस्तक मंडळाकडून सरकारने नऊ पुस्तकांचा एक संच करून घेतला. त्याची संकल्पना बात्रा यांची होती. राज्यातील ४२ हजार सरकारी शाळांतून ही पुस्तके फुकटात वाटली जात आहेत. रालोआ सरकारच्या राज्यात काय वाढून ठेवले आहे याची पूर्वकल्पना देणाऱ्या घटना सातत्याने घडत आहेत. गोव्याच्या मनोहर पर्रीकर सरकारमधील मंत्र्यांनी भारत हिंदू राष्ट्र असल्याचे विधान केले. *विधानसभा निवडणुकीत ख्रिश्चनांनी आम्हाला कशी मदत दिली, म्हणजे आम्ही धर्मनिरपेक्ष कसे आहोत* हे मुख्यमंत्री पर्रीकर प्रसारमाध्यमांना बोलावून बोलावून सांगत होते. नमोंना मते न देणाऱ्यांनी पाकला चालते व्हावे, अशी धमकी लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान दिली गेली होती. संसदेत ओवैसींच्या अंगावर धावून जात काही मावळ्यांनी पाकिस्तानचा रस्ता धरा असे त्यांना सांगितले. अशी उदाहरणे तरी किती द्यायची?

सनातन हिंदू धर्माचे समर्थक सुदर्शन राव यांची इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिकल रिसर्च (आयसीएचआर) वर नेमणूक

झाली आहे. त्यांची प्राचीन ग्रंथांवरच सारी भिस्त आहे. *'भारतात पूर्वी जातिव्यवस्था उत्तम काम करत होती, म्हणूनच तिचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे'*, असे अकलेचे तारे या राव यांनी तोडले आहेत. अर्थात केंद्रात भाजपची नव्हे, तर काँग्रेसची सत्ता असतानादेखील सांस्कृतिक संघटनांत भाजपची माणसे घुसली होती. राजीव गांधी पंतप्रधान असताना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य इरफान हबीब आयसीएचआरचे अध्यक्ष होते. तेव्हा इतिहासकार व पुरातत्त्व संशोधक एस.पी. गुप्ता यांना वरिष्ठ सन्मानवृत्ती देण्यात आली होती. ते संघवालेच ! तेव्हाचे जे सरकारी प्रकल्प संचालक म्हणून नेमण्यात आले होते, ते गृहस्थ अयोध्या आंदोलनाच्या वेळी विश्व हिंदू परिषदेची बाजू लावून धरत होते. आयसीएचआरचे अध्यक्ष म्हणून १९८२ ते ८६ या काळात बौद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक लोकेशचंद्र काम करत होते. ते जनसंघाचे नेते व संस्कृत भाषेचे पंडित रघुवीर यांचे पुत्र. ते हिंदुत्ववादी होते. लोकेश चंद्रांच्या काळात अलीकडे वादाच्या भोवऱ्यात सापडलेले वेदप्रताप वेदिक यांना सन्मानवृत्ती देण्यात आली. केंद्रात संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार असताना प्राचीन भारतीय इतिहासाचे तज्ज्ञ डी.एम.त्रिपाठी अध्यक्ष होते. ते मार्क्सवादी नव्हते. नमोंची पाठराखण करणारे ओ.पी. केजरीवाल यांना जेव्हा संपुआ–२ चे सरकार होते, तेव्हा सन्मानवृत्ती मिळाली. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना राज्यसभेतील भाजपचे खासदार आणि वाजपेयींचे मित्र एम.एल. सोंधी यांना या संस्थेच्या प्रमुखपदी नेमण्यात आले. संस्थेच्या संशोधन प्रकल्पामधून हिंदूंच्या विरुद्ध कोणतेही ऐतिहासिक सत्य बाहेर आलेले खपवून घेतले जाणार नाही आणि सरकारविरोधी कोणाकडून टीकाही होता कामा नये, असा मेसेज त्यांना देण्यात आला. त्यास सोंधींनी भीक घातली नाही. 'पांचजन्य' चे माजी संपादक देवेंद्र स्वरूप संस्थेत होते. त्यांचा गट सोंधींच्या विरोधात काम करीत होता. शेवटी संघाकडून दडपण आल्यामळे सोंधींना जावे लागले. वाजपेयी काही करू शकले नाहीत. वाजपेयी–मुशर्रफ यांच्या आग्रा शिखर परिषदेपूर्वी भारत–पाकिस्तान येथील समाजशास्त्रज्ञांची परिषद घेण्याची कल्पना होती. कट्टर हिंदुत्ववाद्यांनी तो प्रयत्न उधळून लावला.

त्याच सुमारास सिमल्याच्या इंडियन इस्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्सड स्टडीजच्या अध्यक्षपदी संस्कृत पंडित व प्राचीन इतिहासाचे अभ्यासक जी.सी.पांडे यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे नेतृत्व डॉ. हरी गौतम यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांनी ज्योतिर्विज्ञान, वैदिक ज्योतिर्विद्या व हिंदू कर्मकांडविषयक अभ्यासक्रम सुरू केले. एनसीआरटीमध्ये भगवा हस्तक्षेप वाढू लागला. तेव्हा केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री मुरली मनोहर जोशी होते. त्यामुळे 'बनारस हिंदू विद्यापीठा'चा सरकारच्या धोरणावर मोठा प्रभाव होता.

फॅसिस्टांचा नेहमीच इतिहासाच्या विकृतीकरणावर भर असतो. जहाल हिंदुत्ववाद्यांची त्रिसूत्री म्हणजे अल्पसंख्याकांना खलनायक ठरवणे, पितृसत्ताक पद्धतीचे उदात्तीकरण करणे आणि हिंदू वेद–पुराणे हाच इतिहास मानणे.

आयसीएचआरचे अध्यक्ष होण्याची सुदर्शन राव यांची पात्रता आहे काय? असा रोखठोक सवाल नामवंत इतिहासकार रोमिला थापर यांनी केला आहे. आयसीएचआरमधील संशोधनावर पाश्चात्त्य प्रभाव राव यांना पुसून टाकायचा आहे. महाभारत कधी घडले याची तारीखही त्यांना नक्की करायची आहे. १९९९ साली रालोआ राजवटीत एनसीइआरटीने 'टोवर्ड्'स फ्रीडम या प्रकल्पाअंतर्गत के. एन. पणीकर व सुमित सरकार यांनी लिहिलेली दोन पुस्तके बदलली. का तर, मार्क्सवादी प्रभाव कमी करण्यासाठी.

आपल्या काही मार्क्सवादी विद्वानांनीही संशोधन संस्थांत व इतिहासात ढवळाढवळ केली होती. तीदेखील चूकच आहे. परंतु खोटारडेपणा, एकांगीपणा हे दोष संघ–भाजपवाल्यांनी जेवढे अंगात बाणवले आहेत, तेवढे कोणीही नाही.

गुजरातमध्ये पाठ्यपुस्तकांतून 'आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमात्यकरण नव्हे.', 'भारतीयकरण, संस्कृती ही कधीच गटातटात विभागलेली नसते, भारतीय संस्कृती मिश्र संस्कृती नाही.' 'प्रोफेसर हा फक्त शिकवतो, तर आचार्य ही शिकवण आचरणात आणतो. म्हणून प्राध्यापक असा ढोंगी शब्द वापरू नका', असा उपदेश बात्राकृत 'प्रेरणादीप'चा गुजरातमध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या पाठ्यपुस्तकात आहे.

स्टेम सेल्सच्या संशोधनाचे श्रेय अमेरिकेचे नसून, भारताचे आहे असा दावा केला जात आहे. डॉ. बाळकृष्ण मातापूरकर यांनी 'रिजनरेटिंग बॉडी पार्टस्' संशोधनाचे पेटंट घेतले आहे. त्यांना म्हणे महाभारतातून प्रेरणा मिळाली. महाभारतकाळात टेलिव्हिजन होता म्हणे– म्हणजे काय, तर 'संजय'ला जे दिसायचे तो टेलिव्हिजनच ! ऋग्वेदात अश्वरथाचा उल्लेख आहे. तो यंत्ररथ म्हणजे मोटारच. हे असे विद्वान मोदींच्या महाभारतात जागोजागी दिसू लागले आहेत. नॅशनल बुक ट्रस्ट, ललित व संगीत नाटक अकादमी, इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस्, सेन्सॉर बोर्ड, चित्रपट विकास महामंडळ अशा सरकारच्या सांस्कृतिक; संस्थांचे छुप्या पद्धतीने भगवेकरण होण्याची भीती

आहे. सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील राजकीय विचारसरणीयुक्त घुसखोरी धोकादायक ठरू शकते.

**वन नटवर इज इनफ !**

पक्षातील लोकांनी मोकळेपणाने आपली मते व्यक्त करण्यास काँग्रेसचे एक दरबारी नेते जनार्दन द्विवेदी यांची काहीही हरकत नाही. मागच्या पाच वर्षांत जयराम रमेश यांच्यापासून ते दिग्विजयसिंग यांच्यापर्यंत अनेक नेत्यांनी पक्षाच्या धोरणापेक्षा वेगळी लाइन घेताच, त्यांचे जाहीरपणे कान उपटणारे द्विवेदी, आज मात्र स्वत:च बंडखोरी करू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी जातआधारित आरक्षण रद्द करावे अशी मागणी केली. त्यामुळे पक्षश्रेष्ठींची खुलासा करताना धावपळ झाली. आज द्विवेदी म्हणतात की पक्षाने अलीकडे 'तांत्रिक नेतृत्वावर' भर दिला आहे; त्यापेक्षा राज्याराज्यांतील समाजात रुजलेल्या नेतृत्वास वाव दिला पाहिजे. इंदिरा, राजीव, सोनिया गांधींनी जनाधार असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांचे खच्चीकरण केले, तेव्हापासून आजतागायत द्विवेदी महाशय नेहरू–गांधी घराण्याची महाआरती करत होते. तरीदेखील उशिरा का होईना, त्यांना हा साक्षात्कार झाल्याचे दिसते. मात्र आरक्षणाच्या धोरणास विरोध असल्यास त्यांनी आपली भूमिका तपशिलात मांडायला हवी. द्विवेदी यांचा रोख उपाध्यक्ष राहुल गांधींविरुद्ध आहे. राहुल ब्रिगेडमुळे त्यांच्यासारखे जुने तथाकथीत नेते– कम –मुनीम मागे पडत चालले आहेत. त्यामुळे ते चिडचिड करत आहेत. राहुलने जवळ केले असते, तर ते असे बोलले नसते. त्यांच्यासारख्यांना वाटते की प्रियांका वडेराने राजकारणात यावे.

या मंडळींच्या हे लक्षात येत नाही की, नेहरू–गांधी घराण्याचा करिश्मा संपत चालला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावर फ्रँचाइझी सुरू करण्याचा रिपब्लिकन गटातटांचा उपक्रमही फ्लॉप ठरत चालला आहे. देशातील थोर नेत्यांनी भूतकाळात जे केले, जो त्याग केला, त्याबद्दल सलाम; पण आज तुम्ही काय करणार ते सांगा, असे सामान्यजन विचारत आहेत. इंदिरा, सोनिया गांधी आणि डॉ. मनमोहन सिंग यांची २४बाय७ भाटगिरी करून थकलेल्या प्रचारवंतांचेही लोक आता काही ऐकून घ्यायला तयार नाहीत. त्यांनाही श्रोते पकडून पकडून आणावे लागतात. तरीदेखील काँग्रेस व त्यांच्या भाटांच्या वर्तनात तिळमात्र फरक पडलेला नाही.

माजी परराष्ट्रमंत्री नटवरसिंह यांनी वन लाइफ इज नॉट इनफ हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात सोनिया गांधींनी २००४ मध्ये पंतप्रधानपद न स्वीकारणे योग्य नव्हते, अशी टीका केली आहे. २००५ साली युपीए सरकारमधून नटवरजींना राजीनामा द्यावा लागला. इराक सरकारने चालवलेल्या 'अन्नासाठी तेल' या योजनेत हात मारल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. तेव्हा नटवरसिंह खुर्ची सोडता सोडत नव्हते. तत्कालीन अहवालात त्यांना दोषी ठरवले होतेच. आत्मचरित्रात ते म्हणतात की; या अहवालाने काँग्रेस पक्षावरच ठपका ठेवला होता. मग फक्त मलाच तेवढी शिक्षा का? म्हणजे सोनियाजींनीच अध्यक्षपद सोडायला हवे होते, असे त्यांना सुचवायचे असावे.

नटवरसिंह यांनी म्हटले आहे, की डॉ. मनमोहन सिंग यांच्याऐवजी सोनियाजींनीच पंतप्रधान व्हायला हवे होते. वास्तविक त्यावेळी शरद पवार, सुषमा स्वराज, अडवाणी, उमा भारती यांच्या मानगुटीवर 'विदेशी बहू'चे भूत बसले होते. त्यामुळे संसदेत एकतर्फी हल्ल्याला तोंड द्यावे लागेल. जिथे जाऊ तिथे निदर्शने होतील, अशी भीती सोनियाजींना वाटली असावी.

नटवरजींच्या मते, आजी व पित्याप्रमाणे आपल्या आईचीही अतिरेक्यांकडून हत्या होईल अशी भीती राहुलला वाटत होती. म्हणून सोनियाजींनी पंतप्रधानपद घेतले नाही. आतला आवाज वगैरे सर्व झूठ! हे खरेच असावे. पण नटवर व समस्त काँग्रेस नेते तेव्हा या तथाकथित आतील आवाजाचा प्रचार बाहेरचा आवाज करून करत होते त्याचे काय? नटवरजी यांचा आतला आवाज आता कुठे बाहेर ऐकू आला. नटवरजींचे जाऊ द्या. आसाम, महाराष्ट्र व हरयाणा काँग्रेसमध्ये सोनिया–राहुल यांच्याविरुद्ध नाराजीचे स्वर प्रकट होऊ लागले आहेत.

नटवर यांनी आत्मचरित्रात बऱ्याच गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. १९८६ मध्ये ते राजीव गांधी सरकारात परराष्ट्र राज्यमंत्री होते. तेव्हा भारत–पाकिस्तान सीमेपाशी भारताकडून लष्करी हालचाली सुरू असल्याचे अमेरिका व सोव्हिएत रशियाच्या उपग्रहांनी टिपले. पाककडून कुरापत निघाली नसताना भारताने असे करण्याचे कारण काय? याबद्दलचा जाब संरक्षण राज्यमंत्र्यांना विचारल्यावर त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. एकप्रकारे पंतप्रधानांची दिशाभूल करण्याचा हा प्रकार होता. त्या वेळी अरुण सिंगना (तत्कालीन संरक्षण राज्यमंत्री) बडतर्फ करण्याचा सल्ला पंतप्रधानांनी दिला होता, असे त्यांनी म्हटले आहे. परंतु प्रत्यक्षात ते धैर्य राजीवने दाखवले नाही.

चंद्रशेखर सरकारच्या काळात अमेरिकी विमानांना भारतातून इंधन घेण्याची परवानगी देण्यात आली. त्या वेळी इराकने कुवेतवर आक्रमण केले होते. राजीव गांधींनी याबद्दल आक्षेप घेतला. तेव्हा राजीवने अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांना फोन करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्यांनी तो घेतला नाही; अशी माहितीही नटवर यांनी उघड केली आहे. यामुळे

राजीव गांधींची बदनामी झाली. त्यांचे महात्म्य कमी होईल ही राजीव–सोनिया निष्ठांची भीती. त्यामुळे नटवर भाजपमध्ये जाणार, ते संघवाले आहेत असेही आरोप  त्यांच्यावर झाले. मात्र या आत्मचरित्रामुळे राजकीय अभ्यासकांना नवी माहिती मिळाली आहे हे नाकारता येणार नाही. काँग्रेस पक्षाचा दुबळेपणा या निमित्ताने आणखी पुढे आला, ते वेगळेच.

**ब्रिक्स : विकासाची वीट**

विकसनशील अशा पाच देशांच्या, ब्रिक्सच्या फोर्टेलेझा, ब्राझील इथे झालेल्या परिषदेत एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. ब्राझील, भारत, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पंचकाचा हा गट असून त्यात सामील झालेल्या भारताची अर्थव्यवस्था आशियातील तिसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थप्रणाली आहे. *न्यू डेव्हलपमेंट बँक* या ब्रिक्सच्या प्रस्तावित बँकेचे अध्यक्षपद भारताकडे आले ही आनंदाची बाब असली तरी लगेच हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच कसे यश आहे, अशा गाथा स्तुत्य रचण्याचे कारण नाही. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी ब्रिक्समध्ये महत्त्वाची भूमिका वठवली होती. ब्रिक्सची विटेवर वीट रचण्याची प्रक्रिया गेली काही वर्षे चालू आहे.

ब्रिक्सच्या निमित्ताने मोदी यांची चीनचे अध्यक्ष झी झिनपिंग यांच्याशी भेट झाली. दोन्ही देशांनी सीमाप्रश्न सोडवण्यासाठी आपापसात विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यावर भर दिला. परंतु सीमाभागात चीनची घूसखोरी व गोळीबार सुरू असतो आणि अरुणाचलचा २००० कि.मी.चा भाग हा दक्षिण तिबेटचा भाग असल्याचा चीनचा दावा आहे. सीमा प्रश्नाची उकल करण्याबद्दल एकमत; पण ती कशी करायची याबाबत प्रगती मात्र नाही हे सध्याचे वास्तव आहे.

आता ब्रिक्स बँकेचे अध्यक्षपद सलग सहा वर्षे भारताकडे राहील. त्यानंतर ब्राझील व रशियाचा नंबर लागेल. आळीपाळीने अध्यक्षपद मिळणार आहे. त्यात फुशारक्या मारण्यासारखे काही नाही. बँकेचे प्राथमिक भागभांडवल १०० अब्ज डॉलरचे असेल आणि पहिल्या टप्प्यात चलनाची राखीव तरतूद म्हणून ४१ अब्ज डॉलर चीन देईल. भारत, रशिया व ब्राझील प्रत्येकी १८ अब्ज डॉलर आणि दक्षिण आफ्रिका ५ अब्ज डॉलरचे भांडवल पुरवतील. बँकेचे मुख्यालय शांघायला असेल. नव्या बँकेमुळे ब्रिक्समधील आर्थिक सहकार्य वाढेल. पायाभूत सुविधा प्रकल्पांना हातभार लागेल. संकटांचा सामूहिकरीत्या मुकाबला करता येईल.

ब्रिक्सचे पाच पांडव हे जगातील उदयोन्मुख देश आहेत. त्यापैकी चीनची ताकद तर सिद्धच झाली आहे. जगातील २०% उत्पादन तिथे होते. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्यासाठी १९४७सालीच अमेरिकेत ब्रेटनवूड्स, न्यू हॅपशायर तेथे युनोच्या विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिषद झाली होती. तिथेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट –जी आज जागतिक बँकेचा हिस्सा आहे– यांची स्थापना करण्याचा निर्णय झाला. सदस्य–देशांनी समाधानकारक संख्या झाल्यावर १९४५ साली या संस्था सुरू झाल्या. या देशांनी आपली चलने अमेरिकी डॉलरशी बांधून विनिमयदर कायम राखावा व विदेशी व्यापाराच्या देवघेवीत तात्पुरते असंतुलन निर्माण झाल्यास नाणेनिधीने मदत करावी, असे गृहीत होते. चलनाचे अवमूल्यन करण्याची स्पर्धा थांबवणे व इतर देशांशी सहकार्य वाढवावे हेही उद्देश होते. १५ ऑगस्ट १९७१ रोजी अमेरिकेने एकतर्फी अमेरिकन डॉलरची सोन्यातील परिवर्तनीयता रद्द केली. त्यामुळे ब्रॅटनवूडस पद्धत मोडीत निघाली. डॉलरचे रुपांतर समान चलनात झाले. हा निक्सन शॉप म्हणून रिझर्व्ह करन्सी होऊन अनेक देश त्याचा वापर करू लागले. त्याच वेळी पौंड स्टर्लिंगसारखी अनेक स्थिर चलने फ्री फ्लोटिंग झाली.

पूर्वीचे जग अमेरिका–रशिया असे द्विध्रुवीय होते, ते १९९० नंतर एकध्रुवीय झाले. परंतु अफगाणिस्तान–इराक युद्धे, व जागतिक मंदी यामुळे अमेरिकेची शक्तीदेखील मर्यादित झाली आहे; परंतु तरीही अजून जागतिक बँक व नाणेनिधी, एवढेच काय, युनोमध्येही अमेरिकेचीच दादागिरी चालते.

या पार्श्वभूमीवर या दादागिरीला वेसण घातलीच पाहिजे. प्रस्तावित बँकेस भारत, ब्राझील, द.आफ्रिका, वगैरे इमर्जिंग किंवा उद्योगाभिमुख बाजारपेठांबद्दल अधिक आस्था असेल. नाणेनिधी व जागतिक बँकेवर कब्जा मिळविणे वा त्यात परिवर्तन आणणे शक्य होणार नाही. भविष्यात ब्रिक्स बँक उदयोन्मुख बाजारांतील बचत उदयोन्मुख देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये गुंतवील. थोडक्यात या पाच पांडवांचा निधी न्यूयॉर्क–लंडनला जाणारच नाही. यापूर्वी ब्रिक्स देशांनी भांडवलाचे निर्गमन अनुभवले आहे. भारताचा जपानशी करन्सी स्वॅपबद्दलचा करार झाला आहे. त्याखेरीज उद्या काही आपत्ती आली व इथली शेअरमधली वा थेट गुंतवणूक बाहेरचे लोक काढून घेऊ लागले, तर बफर म्हणून ब्रिक्स बँकेचा उपयोग होईल. किंवा भारताला निधीची चणचण जाणवली, तर बाजारातून निधी उभारणी करणे वा नाणेनिधीकडे कटोरा घेऊन जाणे याची गरजच पडणार नाही. ब्रिक्स बँक पाठीशी उभी असेल. अल्पकालीन गरजा ती भागवरणार असल्याने रुपयावर ताण येणार नाही, म्हणजे रुपये देऊन डॉलर खरीदणे आणि बाजारही सुस्थितीत राहील.

सामान्यत: प्रतिकूल काळात आयातीवर निर्बंध घातले जातात वा भांडवलाच्या आयातनिर्यातीवर बंधने घालावी लागतात. नव्या बँकेमुळे हे मार्ग अवलंबावे लागणार नाहीत. शिवाय मध्यम मुदतीत ब्रिक्स देशांच्या चलनांना नागरी स्वीकारार्हता लाभेल. कारण ब्रिक्समधील आर्थिक संबंध दृढ झाल्याने व्यापार व उत्पादन वाढेल.

प्रश्न असेल ब्रिक्स बँकेच्या व्याजदराचा. नाणेनिधी वा जागतिक बँकेच्या तुलनेत तो किती असेल? कारण या संस्था अधिक प्रबळ आहेत. त्यामुळे त्या कमी दरात पतपुरवठा करू शकतात. मागच्या काही वर्षांत जागतिक बँकने भारतातल्या अनेक सामाजिक कार्यांसाठी निधी दिला आहे. कदाचित ब्रिक्सपैकी चीन अशा कामांना भरपूर निधी देऊ शकेल. कारण चीनकडे विदेशी चलनसाठा मोठा आहे. पुन्हा ब्रिक्सकडून कर्ज घेण्याची त्याला फारशी गरज भासणार नाही.

नाणेनिधी व जागतिक बँकेचा पतदर्जा चांगला असून, बाजारात त्यांचा लौकिक आहे. त्यामुळे त्यांना अल्पदरात निधी मिळतो. ब्रिक्सचे व्याजदर म्हणूनच कदाचित जास्त असतील. या जागतिक अर्थसंस्था कर्जे देताना, त्या त्या देशांकडून अटी मान्य करून घेतात. भारताने १९८० व ९० च्या दशकात तो अनुभव घेतला आहे. या अर्थसंस्था समुचित दर्जा बघतात, तर ब्रिक्स सार्वभौम दर्जा बघेल. परंतु व्याजदर काहीही असो; कुणालाही कर्ज देताना काही अटी ब्रिक्सलाही घालाव्या लागतील. कारण आपल्या भांडवलाचे, हितसंबंधांचे रक्षण तर त्या बँकेला करावेच लागेल. नाहीतर बँकेचा मोरया होऊ शकतो.

चीनच्या चलनाचे आंतरराष्ट्रीयकरण झाले आहे. म्हणजे २४ देशांच्या चलनात त्याची स्वॅप ॲरेंजमेंट आहे. त्यामुळे ब्रिक्सने व्यवहार पाहावा याबद्दल चीन आग्रही असेल. सहा दशकांपूर्वी जुलै १९४४मध्ये झालेल्या ब्रेटनवूड्स परिषदेनंतर निर्माण झालेल्या जागतिक संस्थांचा भारत संस्थापक सदस्य आहे.

१९८० व ९०च्या दशकांमध्ये अमेरिका भारताला नडला होता. तेव्हा खास करून जागतिक बँक मात्र आपल्याशी चांगली वागली. म्हणजे ही बँक म्हणजे फक्त साम्राज्यवाद्यांचीच गुलाम आहे, असे सरसकटपणे म्हणता येणार नाही. ब्रिक्स बँकेने पश्चिम आशियातील तेलसंपन्न देशांकडून भांडवल घेतल्यास बँक सुस्थिर होईल. कोणाच्याही पतपुरवठा गरजा मान्य करताना फक्त विचारसरणीचे ढोल न वाजवता तिने नफा–नुकसानीचाही विचार केला पाहिजे.

जागतिक भांडवली व्यवस्थेला ठोस पर्याय उभा करण्याचे काम सोपे नाही. कारण ब्रिक्स बँकेचे मुख्यालय कुठे असावे यावरूनच भारत व चीनमध्ये वाद झाला. इतरांपेक्षा आपला हिस्सा जास्त असावा यासाठी गेली दोन वर्षे चीन अडून बसला होता आणि ब्राझील व भारत त्याविरुद्ध झगडत होते. तेव्हा आपल्याकडे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार होते. त्या वेळी त्यांनी काही एक केले नाही, असे म्हणणे भंपकपणाचे होईल.

नूतन बँकेने समाजाच्या मध्यम वर्गाच्या, विशेषत: अन्नसुरक्षेच्या गरजा भागवाव्यात, असे आवाहन नरेंद्र मोदींनी केले. हे पं. नेहरूंचेच धोरण असून त्यांचा वारसा वा त्यांचे ऋण मान्य करण्याचे सौजन्य भाजपप्रणीत रालोआ सरकारकडे नाही. दहशतवादाबद्दल झिरो टॉलरन्सची मागणी मोदींनी केली. परंतु हिंदुत्ववादी कळपातील वेदिक यांनी हाफिज सईद या दहशतवाद्याची मुलाखत घेतली, त्याबद्दल मोदी सरकारने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली हाती.

आज नाणेनिधी व जागतिक बँक या संस्थांचा कारभार अगदी शुद्ध लोकशाही पद्धतीने चालला आहे, असे नव्हे. आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजाराचे त्यांना धड नियमन करता येत नाही. जगावर वित्तसंकट आल्यास मदतीला धावून जाण्याइतके पुरेसे अर्थबळ त्यांच्याकडे नाही. २००८ नंतर जागतिक अर्थव्यवस्था सावरण्यात जी–२० गटाचे सदस्य असलेल्या ब्रिक्स देशांनी महत्त्वाची भूमिका वठवली. त्यांनी आपल्या विकासाची गती टिकवली आणि जादा साधनसंपत्ती उभारण्यासाठी जी–२० वर दडपण आणले. या साधनसंपत्तीचा मोठा वाटा ब्रिक्स देशांना मिळाला. या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय

“
*जागतिक भांडवली व्यवस्थेला ठोस पर्याय उभा करण्याचे काम सोपे नाही. कारण ब्रिक्स बँकेचे मुख्यालय कुठे असावे यावरूनच भारत व चीनमध्ये वाद झाला. इतरांपेक्षा आपला हिस्सा जास्त असावा यासाठी गेली दोन वर्षे चीन अडून बसला होता आणि ब्राझील व भारत त्याविरुद्ध झगडत होते. तेव्हा आपल्याकडे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार होते. त्यावेळी त्यांनी काही एक केले नाही, असे म्हणणे भंपकपणाचे होईल.*
”

नाणेनिधीचे भागभांडवल २५० अब्ज डॉलर्सवरून ७५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवले गेले. ४० वर्षांत प्रथमच पुरवणी उचल (स्पेशल ड्रॉईंग राईट्स) हक्कांचे वाटप करण्यात आले.

२००९ साली नाणेनिधीची फेररचना करण्याबद्दलचा करार झाला. अल्प प्रतिनिधित्व असलेल्या देशांचा कोटा ४८% पर्यंत वाढवण्यात आला. अर्थात या करारावर शिक्कामोर्तब करण्यास अमेरिकन काँग्रेसला पाच वर्षांत वेळ मिळालेला नाही. प्रत्येक देशाला निधीचा जो कोटा ठरवून दिलेला असतो, त्याच्या फेरआढाव्याचे कामही लांबणीवर पडले आहे.

आता ब्रिक्स बँक रस्ते, धरणे, बंदरे, विमानतळ वगैरेंना तसेच शाश्वत विकासाच्या प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य करील. आज या देशांना या कामांसाठी १ लक्ष कोटी डॉलर्सची चणचण जाणवत आहे. ब्रिक्स बँकेमुळे ती दूर होईल. त्यामुळे ब्रिक्सचे संघटित बळ व सौदाशक्ती वाढेल. अन्य विकसनशील देशांतील पायाभूत सुविधाही वाढतील व त्यांच्यातील व्यापार वाढेल.

सहा वर्षांत ब्रिक्स देशांचा विदेशी चलनसाठा वाढला आहे. हा निधी अन्य विकसनशील देशांना अल्प-दीर्घ मुदतीच्या कर्जांसाठी देता येईल. म्हणजे पैशाचा विनियोग नीट होईल.

याचा अर्थ ब्रिक्स बँक नाणेनिधी वा जागतिक बँकेची जागा घेईल, असे नव्हे. परंतु जागतिक अर्थसंस्था, विभागीय विकास बँका, आपत्कालीन मदतयोजना या सगळ्यांच्या प्रयत्नांना पूरक जोड देण्याचे काम ती करू शकेल. जगाच्या आर्थिक रिंगणात विकसनशील देशांचा आवाज बुलंद होऊ शकतो. ब्रिक्स डेव्हलपमेंट बँक (बीडीबी) व कटिंजन्सी रिझर्व्ह ॲरेंजमेंट (सीआरए)ची कामगिरी कशी होते, यावर सर्व काही अवलंबून असेल.

'सबसे बडा' असे ज्याचे वर्णन केले जाते, त्या रुपयाने ७ जून २०१३ रोजी डॉलरला ५७ रुपये ६ पैसे अशी पातळी गाठली होती. तेव्हा तीन दिवसांत डॉलर ६२ पैशांनी मजबूत झाला. २७ जून २०१२ला रुपयाने ५७.३३ अशी सार्वकालिक नीचांक पातळी गाठली होती. त्यानंतर युपीएच्या काळात डॉलरचा दर ६० रु.च्या आसपास आला. आता ब्रिक्स बँक स्थापून डॉलरलाच पर्याय निर्माण करण्याच्या गोष्टी केल्या जात आहेत. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार रोखे व समभाग खरेदी वाढवत होते. परंतु मग त्यांनी पाच कोटी डॉलर्स मूल्याचे समभाग विकून टाकले. कारण रुपयाच्या घसरगुंडीमुळे त्यांचे डॉलरमधील उत्पन्न कमी झाले.

भारताच्या आयातीत इंधन आयातीचा हिस्सा ७०% आहे. कमजोर रुपयामुळे हा खर्च वाढला होता. परिणामी मालवाहतुकीचा खर्च फुगला. त्यामुळे महागाई तीव्र झाली. दुसरीकडे विकासदर ५% च्या खाली आला. तो ७% वर जरी न्यायचा असेल, तर बँकांचे व्याजदर कमी करा असा धोशा उद्योगपतींनी लावला आहे. परंतु व्याजदर घटवले तर कर्जे जास्त उचलली जातील आणि अर्थव्यवस्थेतील पैसा वाढेल व चलनवृद्धी होईल. त्यामुळे इतक्यात व्याजदर घटवण्याचे पाऊल उचलता येणे कठीण आहे. रिझर्व्ह बँकेच्या ऑगस्ट २०१४च्या पतधोरणात हेच दिसून आले.

रुपयाच्या घसरगुंडीचे ठळक कारण काय होते? भारताच्या आयातनिर्यातीतील संतुलन हरवले. त्यामुळे २०१२-१३ च्या अखेरच्या तिमाहीत चालू खात्यातील तूट राष्ट्रीय ठोक उत्पादनाच्या ६.७%वर जाऊन पोहोचली. सोप्या शब्दांत सांगायचे तर निर्यातीपेक्षा प्रचंड आयात वाढली. कच्चे तेल आयात करावेच लागते. पण सोन्याच्या विक्रमी आयातीमुळे डॉलर्सचा साठा कमी होऊ लागला. सोन्यावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने व्यापारी बँकांवर घातलेले निर्बंध सहकारी बँकांसाठीही लागू केले. परंतु आयात कमी व्हायला तयार नव्हती. भविष्यात विदेशी भांडवलाचा ओघ वाढण्याऐवजी ते काढून घेतले जाईल. विशेष म्हणजे, फक्त रुपयाच नव्हे, तर ब्राझीलचे 'रिअल', तुर्कस्तानचे 'लिरा' आणि दक्षिण आफ्रिकेचे 'रँड' ही चलनेही आपद्ग्रस्त होती. तुर्कस्तानवर तर राजकीय संकट कोसळले. एकूणच उदयोन्मुख देशांच्या अर्थव्यवस्था भोवऱ्यात सापडल्या. रुपयाच्या घसरणीचे इतरही परिणाम होतात. अनेक भारतीय कंपन्यांनी डॉलरमधील कर्जे घेतलेली आहेत. त्यातली बव्हंशी असुरक्षित आहेत. त्यांच्या कर्जातील रुपयाच्या मूल्यावरही परिणाम झाला.

देशांतर्गत चलनफुगवट्यामुळे भारतातील औद्योगिक मालाच्या किमती चढ्या झालेल्या आहेत. कारखानदारांची उत्पादकता कमी झाली आहे. ती या अर्थाने की कच्चा माल, भांडवल, श्रम या घटकांचा वापर कार्यक्षमतेने होत नाही. पायाभूत सुविधांचा अभाव हेदेखील यामागचे एक कारण आहे. त्यामुळे देशी मालापेक्षा आयात परवडली, असे इथल्या व्यापारी व उद्योजकांना वाटू लागले आहे. ज्या देशाची स्पर्धाशीलता कमी होते, तो देश विनिमयदर 'ॲडजेस्ट' करून त्या परिस्थितीस तोंड देत असतो.

रुपयाने आपटी खाल्ल्यास अनावश्यक मालाच्या आयातीवरचा खर्चही फुगतो. परंतु त्याच वेळी आयातीतील स्पर्धात्मकता वाढते. याचा लाभ उठवून निर्यातदारांनी आफ्रिकेसारख्या फोफावलेल्या बाजारपेठेत मुसंडी मारायला हवी. रालोआ सरकारने लोंबकळत असलेले प्रकल्प तातडीने मंजूर

केले पाहिजेत. रेल्वेच्या प्रकल्पांना वेग द्यायला हवा. एकीकडे युरोप गलितगात्र आहे. जपानमधील येनचा दिमाख राहिलेला नाही. भारताचा औद्योगिक उत्पादन दर घसरत चालला आहे. युपीए सरकार अल्पमतात होते. मुदतपूर्व निवडणुका कोणालाच नको असल्यामळे ते टिकून राहिले, इतकेच ! परंतु त्याने निर्णय तरी पटापट घेतले पाहिजेत, ही अपेक्षा फोल ठरली.

इंदिरा गांधींनी ५ जून १९६६ रोजी रुपयाचे अवमूल्यन करण्याचा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय घेतला होता. त्या वेळी ३६.५%नी अवमूल्यन करण्यात आले होते. तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात ७४५ कोटी रु.ची निर्यात होत असताना तब्बल १२२४ कोटी रु.ची आयात होत होती. त्यातून आंतरराष्ट्रीय व्यवहारातील चालू खात्यावर मोठी तूट निर्माण झाली. १९५१ पासूनच दरसाल ही तूट वाढत असल्याने विदेशी गंगाजळी आपल्याकडे फारशी नव्हतीच. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाचा प्रश्न सोडवण्यासाठी हे पाऊल उचलले गेले. आंतरराष्ट्रीय व्यवहारातील चालू खात्यावरची तूट भरून काढण्याकरिता भांडवली खात्यावर डॉलर्समध्ये कर्ज घेतले जाते. पण भारताने जागतिक बँक, नाणेनिधी वगैरेंकडून अगोदरच भरपूर कर्ज घेतले होते. मग अवमूल्यनाचा मार्ग पत्करण्यात आला. त्यामुळे भारताची निर्यात वाढली परंतु दुष्काळामुळे अन्नधान्य प्रचंड प्रमाणात आयात करावे लागले. त्यामुळे चालू खात्यावरची तूट फुगतच गेली.

१९९१मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी रुपयाचे अवमूल्यन केले. तेव्हा भारताचा विनिमयदर स्थिर होता. आज जागतिकीकरणानंतरच्या पर्वात सर्व चित्र बदलले. मात्र ब्रिक्सच्या बँकेमुळे पुढचे पाऊल पडले असले तरी भारतासारख्या विकसनशील देशांना वित्तीय शिस्त अंगी बाणवावी लागेल.

केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी अर्थसंकल्पात ४.१% वित्तीय तुटीचे लक्ष्य ठेवले आहे. ते साध्य होणे तसे कठीणच आहे. शिवाय सरकारने प्रत्यक्ष करसंहिता लागू करण्याचे वेळापत्रक ठरवले नाहीच; उलट त्या संहितेच्या ढाच्यावरही विचार केलेला नाही. करांचे सुसूत्रीकरण करणारी ही संहिता यायची तेव्हा येवो; परंतु प्राप्तिकर नोंदणी, कराची पेमेंट्स, छाननी, टीडीएस, करपरतावा यांत किरकोळ बदल करून, सोपेपणा आणण्यास या वेळी हरकत नव्हती. दुसरा मुद्दा आहे सरकारच्या नि:पक्षपातीपणाचा.

मोदी सरकार उद्योगपतींची गुलामी करणारे आहे असा आरोप सरसकटपणे केला जातो. प्रत्यक्षात अजूनपर्यंत तरी तसे दिसत नाही. उदा. सेसा गोवा व स्टर्लाइट या कंपन्यांच्या विलीनीकरणास युपीए सरकारने व न्यायालयानेही गतवर्षी मंजुरी दिली होती. पण एनडीए सरकारने ती नाकारली आहे. ८४५ कोटी रुपयांचा कर वाचवण्यासाठी ही चाल खेळण्यात आली आहे, असा सरकारचा आरोप आहे. आयात कोळशावर स्वच्छ ऊर्जा कर लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याचा फटका अदानी पॉवर या मोदींच्या जवळच्या कंपनीलाच बसणार आहे.

नैसर्गिक वायूच्या केजी–डी६ या क्षेत्रामधून निर्धारित करून दिलेल्या मर्यादेपेक्षा कमी उत्पादन घेणाऱ्या रिलायन्स इंडस्ट्रीज लि. ला मोदी सरकारने चपराक लगावली आहे. ५८ कोटी डॉलर्सचा दंड ठोठावला आहे. शिवाय नैसर्गिक वायूच्या दरवाढीचा निर्णय तत्काळ घेण्यास नकार देण्यात आला आहे. उलट सरकार कंपनीविरुद्ध न्यायालयात गेले असून हे प्रकरण ते लावून धरणार असल्याचे दिसते. माजी पेट्रोलियम मंत्री वीरप्पा मोईली हे दरवाढीची रिलायन्सची मागणी मान्य करण्याबाबत आग्रही होते. मधुमेहविरोधी तसेच कार्डिओ व्हॅस्क्युलर वगैरे ५ औषधांच्या किंमतींवर निर्बंध आणण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. ही औषधे आवश्यक औषधयादीत नसतानाही मोदी सरकारने हा लोकहिताच्या दृष्टीने निर्णय घेतला आहे.

अर्थसंकल्पात लघु–मध्यम उद्योगांना झुकते माप देण्यात आले आहे. त्यांच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी नवे धोरण ठरवण्याकरिता एक समिती नेमण्यात आली आहे. या क्षेत्रात दलित, मागासवर्गीय, आदिवासी उद्योजक मोठ्या संख्येने असल्याने त्यांना प्रस्तावित धोरणाचा लाभ होऊ शकेल.

याला अपवाद आहे भूसंपादन कायद्याचा. या कायद्यामुळे उद्योगांसाठी जमीन घेणे व्यवहार्य ठरत नव्हते, हे खरे आहे; पण म्हणून या कायद्यात दुरुस्त्या करून फक्त उद्योगांचे भले साधण्याचे धोरणही गैर आहे. अशामुळे शेतकऱ्यांत असंतोष निर्माण होईल. यातूनच नक्षलवाद वाढतो. तो केवळ पोलीस मार्गाने चिरडण्याचे केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंग यांचे धोरणही चुकीचे आहे. ब्रिक्स बँकेचे अध्यक्षपद भारतास मिळाले आहे. आता भारताने विकसनशील देशांचे नेतृत्व करताना विकासाची प्रगल्भ दृष्टी दाखवली पाहिजे.

**श्री. हेमंत देसाई**

सी–३, गुलमोहोर, महापालिका वसाहत, फातिमा चर्चजवळ,
शिवडी (प.) मुंबई ४०० ०१५.
ई–मेल : hemant.desai001@gmail.com

पत्र



# डॉ. विजय भटकर यांसी, दोन्ही हात जोडोन-

- चंद्रसेन टिळेकर

भटकर साहेब, नम्रपणे तरीही काहीशा उद्वेगाने हे नाराजीचे जाहीर पत्र आपणास लिहावे लागत आहे, याचा माझ्यासारख्या शास्त्र-शाखेचा अभ्यास केलेल्या सामान्य माणसाला अतिशय खेद होत आहे. डॉक्टरसाहेब, आपण आमच्या देशातील संगणक-शास्त्रातील एक अग्रगण्य शास्त्रज्ञ आहात. अमेरिकेने भारताला महा-संगणक द्यायचे नाकारल्यावर आपण स्वत: पुढाकार घेऊन तो बनवण्यात यश मिळवले. त्याबद्दल आम्हाला आपला अभिमानच वाटतो. परंतु गेली काही वर्षे आपण जी वक्तव्ये-विशेषत: परंपरावाद्यांच्या व्यासपीठावरून करत आला आहात, ती वाचून आपल्याविषयीच्या आदराला मोठा धक्का बसतो हेही इथे सांगितलेच पाहिजे.

भटकर साहेब, अनेक वेळा आपल्याला ज्योतिष विषयाची भलावण करताना पाहून आम्ही आमच्या कपाळावर हात मारून घेतला आहे. मागे एकदा आपण ज्यो. म. दा. भट यांच्या सत्कारप्रसंगी काय म्हणावे, तर 'ज्योतिष आपल्याजागी श्रेष्ठ आहे.' हसावे का रडावे आपल्या या उक्तीला? दुसरे तिसरे कोणी असते तर उक्तीच्या ऐवजी 'मुक्ताफळे' असा शब्द वापरला असता. ज्योतिष या अर्धवट कु-शास्त्रात, डॉ. भटकर, तुम्हाला कोणते श्रेष्ठत्व सापडले? ज्या कु-शास्त्राने या देशात घातकी दैववाद पसरवून देशाला 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' या विनाशकारी भ्रमात गुंगवून ठेवून शेवटी गुलामगिरीत ढकलले, त्याची भलावण तुम्ही कोणत्या आधारे करता? मागे युतीचे राज्य आले असता मुरली मनोहर जोशी यांनी त्यांच्या पक्षाच्या विचारसरणीला जागून सर्व विद्यापीठांतून ज्योतिष विषय शिकवण्याचा घाट घालून समाजाचा घात करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी तो हाणून पाडला. त्यांनी आपल्या पुस्तकात एक संपूर्ण प्रकरण लिहून या शास्त्राला अगदी उघडे-नागडे करून चक्क घोंगडीवर ठेवले आहे. ते आपण वाचले नाही का? ते जाऊ द्या. जगातल्या नामवंत शास्त्रज्ञांनी पत्रक काढून ज्योतिष हे फसवे शास्त्र आहे असे जाहीर केले आहे. ते पत्रक 'नेचर' या प्रतिष्ठित मासिकातून प्रसिद्धही झालेले आहे, तेही वाचले नाही का? तेच पत्रक आपल्या मराठी विज्ञान परिषदेने आपल्या मासिकातून पुनर्मुद्रित केले आहे. ते तर तुम्ही नक्कीच

वाचले असेल. मग असे असूनही या विषयाला शास्त्र म्हणून मिरवण्याचा आपला अट्टहास कशासाठी? समाजातली मोठी माणसे जशी वागतात–बोलतात, विचार करतात त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सामान्य माणसे करतात. आपल्या असल्या वक्तव्यामुळे समाजाची दिशाभूल होते हे आपल्याला समजत नाही का?

भटकर साहेब, स्वामी विवेकानंद म्हणतात, 'माझ्या आयुष्यातील जीवनक्रम आकाशताले ग्रह–तारे ठरवीत असतील तर धिक्कार असो माझ्या जीवनाचा'! ('शोध विवेकानंदांचा' ले. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर). म. फुले म्हणतात, 'विश्वातील इतर प्राणिमात्रांना सोडून, ग्रह–उपग्रह फक्त मानव प्राण्याला पीडा करतात असे समजणे हास्यास्पद आहे.' (गुलामगिरी/ ब्राम्हणाचे कसब, ले. म. फुले). आगरकर म्हणतात, 'युरोपने आपल्या ग्रह–ताऱ्याविषयीच्या अज्ञानाला तिलांजली दिली, तेव्हाच युरोपला आधुनिक ज्ञानाचा प्रकाश दिसला.' स्वा. सावरकर म्हणतात, 'ग्रह–ताऱ्यांना न पुजणाऱ्या युरोपची भरभराट पण त्यांची शांती–पूजा करणाऱ्या आमच्या छातीवर मात्र त्यांची टाच तेव्हा नवग्रहादिकांची भीती बाळगून त्यांची प्रार्थना करणे निव्वळ मूर्खपणाचे नव्हे काय?' ('क्ष किरणे' ले. सावरकर). प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, 'ज्या देशात ज्योतिषाची चलती–तो देश गुलाम राहणारच' (प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय). तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात, 'भविष्य म्हणजे नुसते शब्दच्छल !' (भारतीय संस्कृतीचा इतिहास). डॉ. जयंत नारळीकर म्हणतात, 'ज्योतिष हे बिन–बुडाचे निरर्थक शास्त्र आहे.' (विज्ञान गंगेची अवखळ वळणे, ले. डॉ. जयंत नारळीकर). भटकर साहेब, ही सगळी मंडळी वेडी आहेत काय?

आता पुन्हा एकदा कपाळावर हात मारून घ्यावा अशी एक सोडून दोन वक्तव्ये तुम्ही केलीत. पहिले वक्तव्य केलेत ते गोव्यात. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज महायोग ट्रस्ट, गोवाच्या वतीने पर्वरी येथे महायोग आणि विज्ञान या विषयावर बोलताना. आपण काय म्हणालात, 'परमोच्च विज्ञानाकडे, म्हणजेच अध्यात्माकडे माणूस वळल्यानंतर भारत पुन्हा विश्वगुरुपदी विराजमान होईल!' वा क्या बात है ! पण साहेब, तुम्ही म्हणता तसा भारत विश्वगुरुपदी होता तरी केव्हा? असे कुठे आणि कुणी नमूद केलेय हो? का उगाच आपले आपल्यालाच बरे वाटावे म्हणून म्हणायचं? जसं आमच्याकडे पूर्वी विमान होते, जहाज, पाणबुडी, अणुबाम्ब. कॉम्प्युटर सगळे काही आज प्रगत देशात आहे ते होते आहे म्हणण्यासारखे? असे आपलीच आपण बडवली म्हणजे विश्वात श्रेष्ठ ठरतो काय? किंवा अशी साधनं–यंत्र आमच्या पूर्वजांनी निर्माण केली होती, अशी फुशारकी मारून स्वत:चं समाधान करून घ्यायचे? अशा टाळ्या पिटणाऱ्या मंडळीच्या साठी समर्थ रामदासांचं एक प्रसिध्द वचन आहे, 'वडिलांची कीर्ती सांगे तो एक मूर्ख.' भटकर साहेब, भारत सर्व विश्वात प्रसिद्ध आहे तो एक गोसाव्यांचा अन सापांचा देश म्हणून ! त्याच्या जोडीला अडाणी, अंधश्रद्धाळू, दरिद्री, अन अस्वच्छ देश म्हणून. आजही तो लौकिक आहे आणि आम्ही भारतीय तो प्राणपणाने जपायचा प्रयत्न करतोय.

दुसरे असे की 'विज्ञान उच्च पातळीवर पोचले की, ते अध्यात्म बनते' हा काय प्रकार आहे हो? हा शोध तुम्ही कुठल्या प्रयोग शाळेत लावला अन कशाच्या आधारावर? विज्ञान अन अध्यात्म या दोन विरुद्ध टोकाच्या दोन गोष्टी ! एकाचा भर प्रत्यक्ष प्रमाणावर तर दुसऱ्याचा सांगी–वांगी ऐकिवावर नाही तर गुरूच्या शब्द–प्रमाणावर. इतका की गुरू जर म्हणाला की बैल दूध देतो तर शिष्याने नंदीबैलासारखी मान हलवून तो उपदेश मानला पाहिजे. व्यासंगी व्यक्तिमत्व असलेले विवेकवादी लेखक प्रा. य. ना. वालावलकर म्हणतात,'अध्यात्माला जे गेल्या तीन हजार वर्षे करता आले नाही ते विज्ञानाने केवळ तीनशे वर्षात करून दाखवले. इतकेच काय पण मनुष्याचे आयुर्मान वाढवले अन रोगराईच्या कचाट्यातून मानवजातीला वाचवले ते विज्ञानाने. अध्यात्माने नव्हे. (देव, धर्म, श्रद्धा आणि विवेक विचार – ले. प्रा. य. ना. वालावलकर)

आता 'प्लांचेट'बद्दलचे तुमचे वक्तव्य !. मुळात हा घोळ घातला पुण्याचे पोलिस कमिशनर गुलाबराव पोळ यांनी. डॉ दाभोलकरांच्या खुन्याचा सुगावा लागावा म्हणून त्यांनी तसा प्रयत्न केला अशी बातमी बाहेर आली आणि हाहाकार माजला. पोळ साहेबांनी या गोष्टीचा इन्कार केला आहे,तेव्हा त्यांच्या पुरता हा विषय खरं तर इथेच संपावयास हवा. पण त्या बाबतीतही तुम्ही घोळ केलाच. मेधा खाजगीवाले यांच्या पुस्तक प्रकाशन समयी प्लांचेट या तकलादू गोष्टीचे समर्थन करताना तुम्ही म्हणालात, ''परदेशात गुन्हेगार पकडण्यासाठी या प्रकाराचा आधार घेतला जातो, तसेच मृत्युनंतर जीवन शक्य आहे असं वाटावं अशा प्रकारचे संशोधन तेथे चालू आहे.'' ही गोष्ट *प्यारा नॉर्मल*मध्ये मोडते असेही उद्गार काढलेत. मुळात आत्मा नावाची काही वस्तू नसते हे समजायला फार मोठ्या बुद्धिमत्तेची गरज असते असं नाही. परंतु, आत्मा असतो आणि तो बोलावल्यावर एखाद्या भांड्यात नाहीतर लोट्यात येतो अशी अंधश्रद्धा बाळगून जो खेळ केला जातो त्यावर तुम्ही विश्वास ठेवावा याला काय म्हणावे?

आता परदेशातील निरनिराळ्या विषयांच्या संशोधनाबद्दल आणि ते विश्वासार्ह मानण्याबद्दल! भटकर साहेब, भोंदुगिरीचा अन अंधश्रद्धेचा मक्ता काय आपल्याच देशाने घेतलाय असे मानायचं काही कारण नाही. तिथेही असल्या प्रकारचा आचरटपणा या ना त्या स्वरूपात चालूच असतो. अनेकदा तो त्यांना मिळालेल्या समृद्धीच्या नशेचाच एक भाग असतो. काही वेळा एक विरंगुळा म्हणूनही तेथे अंधश्रद्धा साजऱ्या केल्या जातात. ते आपल्यासारख्या गरीब देशाला परवडण्यासारखे आहे काय? दुसरं अत्यंत महत्त्वाचे म्हणजे असले आचरटी विचार अन वर्तन त्यांच्या देशाच्या विकासाच्या आड येत नाही कारण त्या देशातील विचारवंत केवळ बघ्याची भूमिका न घेता त्याचा प्रतिकार करतात. आपल्याकडे तसे फारसे घडत नाही, कारण पदरी कडवटपणा घेऊन प्रबोधन करण्याची आपली फारशी तयारी नाही. अन्यथा युरोपप्रमाणे आपल्या देशातही रेनेसॉन्स केव्हाच झाला असता.!

सामान्य माणसांना नेहमी असा प्रश्न पडतो, की ही मोठी माणसे; त्यातून शास्त्रज्ञ; असे अंधश्रद्धाळू सारखी का वागतात? त्याचे उत्तर हेच आहे, की आपल्या देशातील बालमनावर संस्कार म्हणून आम्ही जे काही बिंबवतो तेच मोठेपणी उफाळून येते. म्हणूनच काही शास्त्रज्ञ उपग्रह सोडण्यापूर्वी आणि यशस्वीरीत्या सोडून झाल्यावर तिरुपतीला बालाजीच्या दर्शनासाठी धावतात. काही नामवंत डॉक्टर्स अमावस्या–पौर्णिमेला शस्त्रक्रिया करण्याचे टाळताना आपण पाहतो. आपल्या महाराष्ट्रातील एक जागतिक कीर्तीचे प्रसूती–तज्ज्ञ, शस्त्रक्रिया करणे भाग पडत असेल तर बाळाच्या आई–वडिलांची पत्रिका पाहून तसे करण्याचा प्रयत्न करत.

डॉ. वाय. नायडूम्मा यांच्या बंगलोर विद्यापीठात विज्ञान व लोकभ्रम या विषयावरच्या भाषणाचा सारांश, 'बहुसंख्य भारतीय वैज्ञानिकांचे व्यक्तिमत्त्व दोन स्तरांवर वावरत असते. ते प्रयोग–शाळेत वैज्ञानिक असतात; पण खाजगी जीवनात लोकभ्रम म्हणजेच अंधश्रद्धा उराशी कवटाळून असतात. या देशात डॉक्टरांच्या गळ्यात स्टेथोस्कोप असतात अन प्रयोग यशस्वी व्हावा म्हणून ते नारळ फोडतात.'

डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाल्यावर त्यांनी हाती घेतलेल्या प्रबोधनाचे काम मागे पडेल अशी भीती वाटत असताना समाजाच्या विविध स्तरातून हे काम करण्यासाठी माणसे पुढे येत आहेत. तेव्हा भटकर साहेब, त्यांचा बुद्धिभेद होईल असे वक्तव्य यापुढे तरी तुम्ही करू नये हीच आपल्याला विनंती

आपला,

**– एक विज्ञानप्रेमी सामान्य माणूस**


# 'सत्याग्रही' दिवाळी २०१४

'सत्याग्रही विचारधारा'चा दर्जेदार दिवाळी अंक ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध होत आहे.

यंदाच्या दिवाळी अंकात...

**परिसंवाद :–'जनादेशाचा अर्थ-अनर्थ'**
विजय नाईक, प्रकाश अकोलकर, जयदेव डोळे, प्रकाश बाळ–जोशी, सुरेश द्वादशीवार, अब्दुलकादर मुकादम, प्रा. विश्राम ढोले

**'पं. जवाहरलाल नेहरू : आजच्या संदर्भात'**
न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. न.गो. राजूरकर, डॉ. अशोक चौसाळकर, हेमंत देसाई, डॉ. शैलेंद्र देवळाणकर

**'सोशल नेटवर्किंग मीडिया आणि समाज'**
अतुल कहाते, सम्राट फडणीस, दिनेश थिटे, अच्युत गोडबोले, सुषमा शितोळे

***विशेष : 'भारत-पाक संबंध'***
जतिन देसाई

***विशेष : 'जम्मू काश्मीर अनुभव'***
राजा शिरगुप्पे

***साहित्य/कला***
अंजली कुलकर्णी, श्रीपाल सबनीस, नितीन हडप

**कथा** –
लक्ष्मीकांत देशमुख, मनोहर सोनवणे, उमा कुलकर्णी

**ललित/व्यक्तिचित्र** –
डॉ. द.भि. कुलकर्णी, प्रा. मिलिंद जोशी, कृष्णात खोत, मनिषा साधू, उत्तमकुमार इंदोरे

***कविता*** –
वाहरू सोनवणे, विश्वास वसेकर, कल्पना दुधाळ, केशव देशमुख, राजेंद्र दास, प्रशांत असनारे, बबलू वडर, बालाजी मदन इंगळे, चंद्रकांत पांढरीपांडे, कैलास दौंड आणि इतर मान्यवर कवी.

याखेरीज मान्यवर कवींच्या कविता, वैचारिक लेख आणि डॉ. कुमार सप्तर्षी यांचा त्यांच्या खास शैलीत एक लेख.

**अंकाची पृष्ठसंख्या** : २६०    **मूल्य** : १०० रु.

वाचक दिवाळी अंकाचे स्वागत करतील याची खात्री आहे.

– संपादक

विचार

# राज्याची धर्मातीतता ही परंपरागत भारतीयताच !

– श्रीपाद जोशी

*धर्मातीतता ही काही ख्रिश्चनांचीच तेवढी गरज उरलेली नाही. ती साऱ्या जगातील साऱ्याच धर्मीयांची समान सामूहिक गरज झालेली आहे. कोणत्याही विशिष्ट धर्माच्या कायद्यांच्या, नियमांच्या अथवा स्मृतींच्या आधारे लादली न गेलेली सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनातली नैतिकता म्हणजे धर्मातीतता. एवढी सहज, सुलभ व सुटसुटीत अशी धर्मातीततेची संकल्पना हीच तेवढी 'धर्मनिरपेक्षता' ठरू शकते.*



'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेला लॅटिन भाषेतील 'सेक्युलस', 'सेक्युलॅरिस' या शब्दाचा काळ वा युगवाचक अर्थ लागू पडत नाही. धर्म या संकल्पनेची विरुद्धार्थी संकल्पना म्हणजे धर्मनिरपेक्षता, अशी मांडणी संघटित संस्थात्मक धर्मांच्या पुढाऱ्यांकडून प्रामुख्याने केली जाते. त्यामुळे तिला अधार्मिकही ठरवले जाते. विशिष्ट धर्माच्या कायद्यांनी वा नियमांनी न बांधलेले असे तत्त्व म्हणजे 'धर्मनिरपेक्षता' वा 'सेक्युलरिझम'. भौतिक, जडवादी, ईहवादी असेही या संकल्पनेचे अर्थ संभवतात. मात्र सर्वार्थाने राज्य हे इहलोकीच्या सुखाचे साधन ठरवण्यासाठी ते धर्मातीत असणे आवश्यक मानले जाते.

राज्य हे विशिष्ट धर्माधिष्ठित नसावे. ते धर्मराष्ट्र नसावे. ते कोणत्याही विशिष्ट धर्माच्या धर्मग्रंथ, नियम, रूढी, परंपरा कायद्याने चालणारे नसावे. तटस्थ नि कोणत्याही धर्मापासून पूर्णपणे अलिप्त अशा स्वत:च्या कायद्याने चालणारे ते असावे. हा या संकल्पनेचा सर्वमान्य व रूढ असा अर्थ स्वीकारला गेलेला आहे.

'सेक्युलर' या शब्दाला समानार्थी वा त्याचा उपरोक्त नेमका अर्थ सांगणारा, करणारा शब्द म्हणूनच 'धर्मनिरपेक्ष' वा 'धर्मातीत' हा शब्द स्वीकारला व वापरला जातो.

या संकल्पनेचे मूळ हे पौर्वात्य वा भारतीय परंपरेत नाही. ते संस्थात्मक अशा ख्रिश्चन धर्माच्या प्रभावाखालील राज्य संकल्पनेच्या विरोधात उद्‌भवलेल्या विचारव्यूहात आहे. त्यामुळे अन्य संस्थात्मक असणाऱ्या व नसणाऱ्या धर्मीयांच्या प्रवक्त्यांना वा सनातनी धर्मनिष्ठवाद्यांना ही संकल्पना म्हणजे आपल्या धर्माचे व त्यानिमित्ताने आपल्या धार्मिक संस्कृतीचे उच्चाटन करणारे आक्रमण वाटत आले आहे.

चर्चच्या संस्थेला आपले अस्तित्व व स्वायत्तता

टिकवण्यासाठी राज्यापासूनचे जे वेगळेपण आवश्यक वाटत होते ते खरे तर या संकल्पनेच्या इतिहासाशी निगडित आहे. धर्मयुद्धांच्या काळात ख्रिश्चनांमधीलच वेगवेगळ्या पंथांना सहअस्तित्वासाठी सुरक्षित वातावरणाची गरज निर्माण झाली होती. ती या संकल्पनेच्या उदयाच्या मुळाशी होती. शांततामय सहअस्तित्वाची गरज आणि अराजकाच्या जागी राजकीय व्यवस्थेची गरज जी धर्मसत्तेशी संबंधितच असेल, असा एक विचार होता. तर ईश्वर असो वा नसो मात्र स्वतंत्र अशा नीतिमत्तेची गरज तर आहेच, असा दुसरा विचार होता. एक विचार कोणत्या तरी मूलभूत अशा तत्त्वांसोबतच्या समन्वयाचा मूलतत्त्ववादी तर दुसरा राजकीय नैतिकता ही स्वतंत्र अशा आधारावरच असावी असा विचार.

हॉब्जने ख्रिश्चन धर्मीयांच्या सार्वजनिक क्षेत्रातील हस्तक्षेप वा मागण्या औचित्यविहीन ठरवल्या. सार्वजनिक क्षेत्रात धर्मापासून वेगळी, स्वतंत्र नीतिमत्ता हीच सर्वोच्च ठरवली. खासगी जीवनात ज्याने त्याने आपली श्रद्धा, धर्म पाळावा, त्याच्या विवेकाने त्याने श्रद्धा बाळगावी. मात्र सार्वजनिक क्षेत्रातील स्वतंत्र नीतिमत्तेचा अनादर करू नये, अशी ती संकल्पना होती. धर्म ही त्यामुळे खासगी बाब ठरली. चर्चपासून राज्याचे वेगळेपण हे याच आधारावर मान्य झाले आहे. यात राज्याने विशिष्टच धर्म–संप्रदायाचे असू नये हेच अपेक्षित आहे. सर्व धर्म–पंथ–संप्रदाय यांपासून राज्य हे त्यामुळे समान अंतरावर असणे इथे अपेक्षित आहे.

आजचे जग हे पूर्वीसारखे एकभाषिक, एकसांस्कृतिक, एकधर्मीय अशा टोळ्या, समूह वा राष्ट्रांचे जग उरलेले नाही. हे कोणी अमान्य करण्याचे कोणतेच कारण नाही. ते व्यापार–उदीम, रोजगाराच्या संधी, तंत्रज्ञान, संवाद–साधने, माध्यमे इ.च्या सहभागी वापराने बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुसांस्कृतिक झाले आहे.

आपआपले धर्म, उपासना, श्रद्धा यांचा त्याग न करताही इतरांना त्यापासून इजा पोहोचणार नाही व सार्वजनिक जीवन हे विशिष्ट वा बहुसंख्याकांची श्रद्धा, धर्म, पंथ, उपासना पद्धत यांच्या दबावाखाली जगण्याची सक्ती केली जाणार नाही, असे सर्वसहमती व सहअस्तित्वाचे सार्वजनिक जीवन ही आज या पृथ्वीतलावरील सर्वच मानवी समूहांची गरज आहे.

ही गरज भागवण्यासाठी राज्याने धर्म, उपासना यात हस्तक्षेप न करणे आणि धर्माने राज्ययंत्र विशिष्टच धर्माच्या कायद्याने चालवण्याचा आग्रह न धरणे आवश्यक आहे. राज्याच्या या धर्मविषयक तटस्थतेची व धर्माच्या या राज्यविषयक तटस्थतेची मुळे ही ख्रिश्चन धर्मीयांच्या आपसातील कलहापासून हव्या असणाऱ्या मुक्तीत शोधली जात असली, तरी आधुनिक राज्याची धर्मातीतता ही काही ख्रिश्चनांचीच तेवढी गरज उरलेली नाही. ती साऱ्या जगातील साऱ्याच धर्मीयांची समान सामूहिक गरज झालेली आहे. कोणत्याही विशिष्ट धर्माच्या कायद्यांच्या, नियमांच्या अथवा स्मृतींच्या आधारे लादली न गेलेली सार्वजनिक व राष्ट्रीय जीवनातली नैतिकता म्हणजे धर्मातीतता. एवढी सहज, सुलभ व सुटसुटीत अशी धर्मातीततेची संकल्पना हीच तेवढी 'धर्मनिरपेक्षता' ठरू शकते.

'मानवाधिकार' ही संकल्पना त्यामुळेच धर्मातीत, धर्मनिरपेक्ष अशा राज्यासाठी मूलभूत अशी नैतिक संकल्पना ठरते. सोबतच जनतेची सार्वभौमता, स्वातंत्र्य आणि समता हेदेखील या धर्मातीत नैतिकतेचे आधारस्तंभ ठरतात. भारतीय राज्यघटनेने म्हणूनच त्या साऱ्यांना नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा दर्जा दिला आहे. मात्र त्यासाठी शांततामय सहअस्तित्व हे मूल्य म्हणून प्रतिष्ठित करण्याची नितांत गरज आहे. ते तेव्हाच शक्य आहे जेव्हा व्यक्तीची सहनशीलता उत्तेजक भावनिकतेला आवर घालून वाढीस लागेल, सहनशीलता या मूल्याचा संस्कार शालेय पाठ्यक्रमांपासून ते माध्यमांमधून चालणाऱ्या साऱ्या चर्चा, निरूपणे, वाद–विवाद यातून बिंबवला जाईल.

याउलट उठसूट भावना दुखावण्याचे राजकारण करणाऱ्या लोक व समूहांची उभारणी करून त्या माध्यमातून उत्तेजक अशी भावनात्मक आवाहनबाजी केली जाते, अशा कृतींना सत्तेसाठी, मतांच्या राजकारणापोटी अटकाव करण्याची राजकीय इच्छाशक्तीच नसते. हाच शांततामय सहअस्तित्वासाठी आज सर्वात मोठा धोका आहे. हा धोका प्रत्यक्षात उत्तेजक आवाहनबाजी करणाऱ्यांपासून कमी, मात्र त्यावर आपल्या राजकीय पोळ्या भाजणाऱ्यांपासून अधिक आहे.

सहनशीलतेशिवाय दुसऱ्या व्यक्तीच्या, श्रद्धा, भावना, विचार, कृती यांना स्वत:च्या श्रद्धा, विचार, भावना यांच्यासारखे समत्व प्रदान केले जाऊ शकत नाही. प्रत्येकाने दुसऱ्याला सहन करण्याचा विवेक प्रत्येकात असल्याशिवाय सहनशीलता वाढीस लागू शकणार नाही. सहिष्णुतेचा, सहनशीलतेचा, परस्परांच्या अस्तित्वाचा आदर करणारा विवेकी संवाद हा प्रत्यक्ष व्यवहारातून, कृतीतून, माध्यमांतून, कला, साहित्य या साऱ्यांतूनच प्रस्थापित होणे व प्रतिष्ठित होणे गरजेचे आहे.

आज मात्र चित्र नेमके उलटे आहे. असहिष्णू, अविवेकी, काहीच सहन न करता पेटून उठण्याची भाषा बोलणारा संवाद हा अधिक प्रतिष्ठित केला जातो आहे. 'झीरो टॉलरन्स' म्हणजे सहनशीलताविहीन अशी धोरणे हीच गरज असल्याचे भासवले

जात आहे.

असहिष्णू व अविवेकी अशा बहुमताचा दबाव निर्मिणारे राजकारणच खेळले जात आहे. दुसऱ्याचा विचार, भावना, मत, धर्म, अभिव्यक्ती यांवर आपल्या विचाराने, भावनेने अतिक्रमण करण्याचा जणू आपला जन्मसिद्ध हक्कच आहे, असे बिंबवणाऱ्या असहिष्णू शक्तींच्या हातचे आता राजकारण हे खेळणे झालेले आहे. खरे तर हे खेळणेच अशाच राजकारणासाठी निर्मिले गेले आहे. हे राजकारण, हा अविवेक, ही असहिष्णुता ही दुसऱ्याचे काहीच सहन न करण्याची, 'झीरो टॉलरन्स' प्रवृत्ती हीच खरे तर मुळात 'अभारतीय' अशी देणगी आहे. कारण धर्मातीत राज्यासाठी अन्य धर्मीयांप्रती सहिष्णुता आवश्यक आहे. हिंदूंचा हिंदुस्तान व त्यांचा धर्म हा तर परंपरागतरीत्या सर्वाधिक सहिष्णू व सहनशीलता बाळगणारा व ती इतरांना शिकवणारा धर्म समजला जातो. म्हणजे परंपरेने भारतीयतेचे लक्षण हे सहिष्णुता, सहनशीलता ही पाश्चात्य धर्मातीत राज्याकडून उधार घेण्याची गरजच नव्हती व नाही. ती घेतलेलीही नाही. त्यामुळे ती तशी भारतीय नसल्याचा प्रचार हा अपप्रचार ठरतो. उलट तिची शिकवणच भारतीय समाजाने इतरांना द्यावी इतका हा समाज याबाबत परंपरागत सक्षम आणि समर्थ आहे.

दुसरे म्हणजे हिंदू हा ख्रिश्चन वा इस्लाम धर्मासारखा संस्थात्मक व एकचालकानुवर्ती ग्रंथ, आज्ञा, फतवे, एक आदेश यांनी चालणारा धर्म नसल्याने धर्मातीत राज्य सुस्थिर होण्यात हिंदू धर्माचा संघटनात्मक, संस्थात्मक असा अडथळाच नाही. म्हणूनच हे राज्य व ही लोकाशाही धर्मातीत म्हणून निर्मिली गेली व टिकली आहे. खासगी जीवनात सनातनी असणाऱ्या लोकमान्य टिळकांनी पाया रचलेला भारतीय राष्ट्रवाद मात्र त्यामुळेच इहवादी व धर्मातीत राष्ट्रवाद आहे. सांस्कृतिक वा धार्मिक राष्ट्रवाद नव्हे. भाऊजी दफ्तरींनी तर धर्माचे प्रयोजनच इहलोकाचे सुख मानले आहे.

भारतीय समाजाची ही पारंपरिक वैशिष्ट्ये आहेत. ती नाहीशी करून या समाजाला असहिष्णू, अविवेकी करण्याचे, त्याच्या सहनशीलतेला सुरुंग लावण्याचे, त्याच्या धर्माला कधीच नसलेले व त्याने कधीच स्वीकारले जाणे शक्य नसलेले संस्थात्मक, संघटित, विशिष्टांच्याच आदेशावर, आज्ञेवर चालणाऱ्या धर्माचे स्वरूप देण्याचे प्रयत्न हेच मुळात अभारतीय व अ-हिंदू प्रयत्न ठरतात. असे प्रयत्न म्हणजे हिंदू समाजाचे अहिंदूकरण करण्याचे व त्याची पारंपरिक वैशिष्ट्ये नष्ट करण्याचे प्रयत्न करणे आहे. हे संघटित, संस्थात्मक प्रयत्न प्राचीन नसून अशा जाणीवपूर्वकरीत्या करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचा इतिहास हा स्वातंत्र्यपूर्व काळात अतिशय क्षीण अशा स्वरूपाचा दिसतो. स्वातंत्र्योत्तर काळातही पहिली तीन दशके त्या प्रयत्नांना फारसे बळ प्राप्त झालेले दिसत नाही. त्या तुलनेत नंतरच्या म्हणजे गेल्या तीन दशकातच हे प्रयत्न अधिक आक्रमक स्वरूप धारण करताना दिसतात.

थोडक्यात, भारतात खासगीकरण, उदारीकरणाचा स्वीकार, सामाजिक नियंत्रणाच्या धोरणाचा त्याग आणि अनिर्बंध नफा कमवण्यावरील निर्बंध हटवून घेतलेली व्यवस्था यांच्या प्रभावाचे व दबावाचे युग कायदेशीरदृष्ट्या अवतरणे आणि ह्या प्रयत्नांना अधिकचे बळ लाभणे यात एक प्रकारचे नाते प्रस्थापित झालेले आहे, हे स्पष्टच दिसते.

राज्याची धर्मातीतता संपुष्टात आणण्याचे कोणतेही प्रयत्न करणे म्हणजे विशिष्टच धर्माच्या नावावर सत्तेचे संघटन व सत्तेचे ध्रुवीकरण करणे होय. त्यात रस असणारे, त्यातच आपले हितसंबंध सुरक्षित असल्याचे वाटणारे व त्यासाठी संघटित प्रयत्न करणारे वर्ग व जाती मुख्यत्वे कोणत्या आहेत व त्यांचे छुपेपणाने बळ वाढवणारे, वरकरणी धर्मातीत राज्याचा पुरस्कार करणारेदेखील कोणत्या वर्ग व जातींचे प्रतिनिधित्व करतात याचे व्यवस्थित समाजशास्त्रीय अध्ययन केले जाणे गरजेचे आहे. तसे झाल्यास धर्मातीत राज्याची किती प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या उत्थानासाठी आवश्यकता आहे व ती नष्ट केली तर नेमके कोणाचे नुकसान आहे हे सप्रमाण सिद्ध करता येईल. अनुभवजन्य अशा शोधाच्या आधारावर तर ते सिद्धच आहे. हे सारे याकरिता करायचे की विकासाच्या नावावर राज्यसत्तेचे ध्रुवीकरण हे धर्मातीत राज्यालाच सुरुंग लावणाऱ्या शक्तींच्या बाजूने होणार नाही हे बघण्याची कधी नव्हे एवढी मोठी गरज आज निर्माण झाली आहे. कारण विकास हा समन्यायी, सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि लोकानुवर्ती व्हायचा असेल तर धर्मातीत लोकशाही राज्य टिकणे सर्वात महत्त्वाचे आहे. या धर्मातीत लोकशाही अभिव्यक्तीलाच आज विविध प्रकारे चूप बसवणे सुरू आहे. ते प्रयत्न दूर सारणे ही आज प्राथमिक गरज झाली आहे.

**- डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५ 'संकल्प' सहनिवास, ४० खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर ४४००१०

आजकाल

# इतिहासाच्या भगवेकरणाचा प्रयत्न

– राम पुनियानी



*प्रा. सुदर्शन राव यांची नुकतीच इंडियन कौन्सिल फॉर हिस्टॉरिकल रिसर्च (आयसीएचआर) वर नेमणूक झाली. प्रा. राव यांनी आजवर इतिहासलेखनात जी भूमिका घेतली आहे ती सनातनी आहे. ही निवड सरकारने केलेली नसून संघाने केलेली आहे. संघाने याअगोदरही वाजपेयी सरकार सत्तेत असताना असे प्रयत्न केले होते. संघ–भाजपला धर्मनिरपेक्ष लोकशाहीचे स्वरूप बदलायचे आहे. राव यांची निवड या बदलांच्या प्रयत्नाचा एक भाग आहे.*

निवडणुका व त्यातून मोदी सरकारची स्थापना हे संघ परिवाराच्या राजकारणाचे फक्त पहिले पाऊल आहे. लोकांची मानसिकता हिंदुत्ववादासाठी तयार करणे व हिंदुराष्ट्राची मागणी पुढे रेटणे हा यापुढचा परिवाराचा कार्यक्रम आहे. त्यासाठी शिक्षण हे सर्वात मोठे हत्यार असणार आहे. शालेय वयातच मुला–मुलींना जातीयवादी चष्म्यातून लिहिलेला इतिहास शिकवणे व त्यातून त्यांची जातीयवादी मानसिकता तयार करणे हे काम दक्षिण आशियातील जवळपास सर्वच मूलतत्त्ववादी राजवटींनी केले आहे. पाकिस्तानचा इतिहास आठव्या शतकातील मुहम्मद बिन कासिमच्या सिंधवरील आक्रमणापासून सुरू होतो. जणू काही त्याच्या आधी सिंध पाकिस्तानचा भूभाग अस्तित्वातच नव्हता. आणि मग त्याचा इतिहास असण्याचा प्रश्नच नाही. या प्रकारच्या विचारधारेचे शिक्षणखाते हे नेहमीच महत्त्वाचे हत्यार राहिले आहे. राष्ट्रीय लोकशाहीचे आघाडीचे सरकार होते तेव्हा देशातील इतिहासाची जातीयवादी अंगाने मांडणी करण्याचा प्रयत्न झाला होता. या वेळी तर भाजपला पूर्ण बहुमत आहे.

प्राध्यापक वाय सुदर्शन राव यांनी इतिहासाचा अभ्यासक म्हणून शैक्षणिक क्षेत्रात काही भर घातल्याचे दिसून येत नाही. त्यांचे काम विशेषतः रामायण व महाभारताचे ऐतिहासिकत्व सिद्ध करणे याच विचारांशी संबंधित आहे. याशिवाय त्यांनी विविध ब्लॉग्ज लिहिले आहेत ज्यामध्ये पारंपरिक विचारसरणीचे प्रतिबिंब स्पष्ट दिसते. ते जरी स्वत:ला संघाशी जोडून घेत नसले तरी त्यांचे हिंदुराष्ट्राबद्दल आकर्षण स्पष्ट दिसते. इस्लामपूर्व वैभवशाली हिंदू संस्कृती व मुस्लीम आक्रमणांमुळे झालेली




अधोगती हे त्यांचे आवडते विषय आहेत. त्यांच्या मते घोरी राजवटीपासून सुरू होऊन मुघल बादशाहापर्यंत ज्या मुस्लीम राजवटी निर्माण झाल्या आहेत त्याच भारताच्या अंधारयुगाला जबाबदार आहेत. आपल्या देशातील ज्या ओंगळ सामाजिक चालीरीती आहेत (उदा. जातिसंस्था, स्त्री–पुरुष भेद) त्या सर्व या मुस्लीम राजवटींचा परिणाम होय. सुदर्शन राव यांच्या मते प्राचीन काळी ही जातिसंस्था व्यवस्थित काम करत होती आणि तिच्याविरुद्ध समाजात बिलकुल असंतोष नव्हता.

जर राव यांनी थोडादेखील विवेकवादी दृष्टिकोन बाळगला असला तरी त्यांना सहज कळून येईल की, जातिसंस्था आणि अनिष्ट प्रथा ही मुस्लीम सत्ताधीशांची देणगी नव्हती तर वैदिक धर्माच्या (ब्राह्मणी धर्माच्या) वैचारिक पायातच ही विषमता होती. या सामाजिक व्यवस्थेतूनच जन्मावर आधारीत जाती–वर्णांची उतरंड तयार झाली; आणि ही सर्व प्रक्रिया मुस्लीम शासकांच्या आगमनाअगोदरच घडली.

मुस्लीम शासकांनी जातिव्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचा फारसा प्रयत्न केला नाही व त्यांनी तशी इच्छाही दाखवली नाही. याउलट मुळातील समतावादी मुस्लीम धर्माने सामाजिक स्तरावर हळूहळू जातिव्यवस्था स्वीकारण्यास सुरुवात केली होती. ज्याप्रमाणे पाकिस्तानी इतिहासाच्या पुस्तकात हिंदू धर्माचे अस्तित्वच मान्य केले जात नाही; त्याप्रमाणे हे जातीयवादी सर्व अनिष्ट प्रथांचे पातक मुस्लीम व ख्रिश्चन धर्मावर फोडतात. राव यांनीसुद्धा त्यांच्या लिखाणातून याच विचारांची री ओढली आहे. त्यांच्या इतिहासात भारताच्या सर्व अधोगतीचे खापर कल्पनेतील मुस्लीम सत्ताधीशांवर फोडले आहे. पण राव येथे हे विसरतात की औरंगजेबाच्या दरबारातसुद्धा ३४% लोक हिंदू होते. याउलट स्त्रीदास्य आणि जातिसंस्थेची उतरंड या गोष्टी मनुस्मृतीमधून आल्या आहेत, जी पहिल्या व दुसऱ्या शतकात लिहिली गेली. मनुस्मृतीमध्ये असे अनेक श्लोक आहेत की खालच्या जातीतील लोकांनी उच्च जातीच्या लोकांपासून दूर राहावे, असे त्यातून प्रतीत होते. जातिव्यवस्थेची सुरुवात चार वर्णांच्या रूपाने वेदकाळापासून झाली. मनुस्मृती लिहीपर्यंत तिचे रूपांतर जन्मावर आधारीत एका कधीही न बदलल्या जाणाऱ्या सामाजिक व्यवस्थेत झाले होते. इ.पू. दहाव्या शतकात रचल्या गेलेल्या वाजसेनी संहितेत चांडाळ आणि पौलक्ष हे दोन शब्द सापडतात. छांदोग्य उपनिषद जे आठव्या शतकात लिहिले गेले त्यात वर्णन आहे की, जे लोक कुकर्म करतील त्यांना पुढचा जन्म कुत्रा किंवा चांडाळ यांचा प्राप्त होईल. याउलट सिंधवरील आक्रमणाचा अपवाद वगळता भारतातील मुस्लीम आक्रमणे नवव्या शतकात सुरू झाली आहेत आणि युरोपियन सत्ता भारतात पाय रोवण्याच्या हिशेबाने १६व्या शतकात आल्या आहेत. जातिबाह्य लग्नांना परवानगी नाकारणे आणि शुद्रांना अस्पृश्य ठरवणे या प्रथा त्याआधीच चालू झाल्या होत्या. म्हणजे अस्पृश्यतेसारख्या चुकीच्या प्रथांचा व मुस्लीम आक्रमणाचा काहीएक संबंध नाही.

संघाचे दुसरे सरसंघचालक मा. स. गोळवळकर गुरुजी यांनी तर वर्णव्यवस्थेचे कौतुकच केले आहे. 'वर्णव्यवस्था हा काही हिंदू समाजाचा दोष नाही आहे; आणि आपले प्राचीन वैभव हस्तगत करण्यासाठी याचा उपयोगच होणार आहे.' (मा. स. गोळवलकर, भारत प्रकाशन नागपूर १९३९, पृष्ठ ३९) यानंतरसुद्धा त्यांनी वर्णव्यवस्थेचे छुपे समर्थनच केले आहे. ''जेव्हा समाज सुधारणेच्या पुढच्या टप्प्यावर जाईल तेव्हा काही भेद आहेत ते वैज्ञानिक व सामजिक आहेत आणि सर्व वर्ण एकाच समाजपुरुषाचे भाग आहेत. ही तर फक्त विविधता आहे आणि यात दोषास्पद काही नाही. ([illegible] डिसेंबर १९५२ पृष्ठ ७) दीनदयाळ उपाध्याय जे संघपरिवारातील ज्येष्ठ नेते होते आणि जनसंघाचे अध्यक्ष होते. त्यांनी लिहिले आपली जी चातुर्वण्याची व्यवस्था होती त्यातील प्रत्येक वर्ण हा एकाच वेळी

एकतेचे आणि समाजातील व्यक्तिवादाचे उदाहरण आहे. शिवाय चारी वर्ण हे समाजाला पूरक आहेत. ही कल्पना ढासळली तर याच जाती एकमेकांना पूरक ठरण्याच्या ऐवजी मारक ठरतील आणि त्यामुळे समाज एकसंध राहणार नाही तर कोलमडला जाईल (डॉ. दीनदयाळ उपाध्याय, एकात्मिक मानवतावाद, नवी दिल्ली, भारतीय जनसंघ १९६५ पृ. ४३)

आंबेडकरांच्या आणि गोळवलकरांच्या वैचारिक मांडणीत या दोन्ही विचारसरणींचे द्वंद स्पष्ट दिसते. घटनाकार आंबेडकरांनी जातिसंस्था आणि अस्पृश्यता संपवण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. त्यासाठी त्यांनी मनुस्मृतीला जबाबदार धरले आणि मनुस्मृती दहनाचे कार्यक्रम केले. याउलट गोळवलकरांनी मनुस्मृती आणि चार्तुवर्णाच्या कल्पनेवर स्तुतिसुमने उधळली. जातिव्यवस्था व्यवस्थित काम करत होती आणि मुस्लीम आक्रमणामुळे बिघडली हा जातिव्यवस्थेच्या समर्थकांचा दावा अर्धसत्य आहे. जातिव्यवस्था समाजातील मूठभर उच्चवर्णीयांसाठी व्यवस्थित काम करत होती आणि तेच तिचे लाभार्थी होते. याउलट समाजातील शुद्र आणि अतिशुद्रांसाठी दमनाची आणि दहशतीची यंत्रणा होती. यामध्ये दलित समाजाने विरोधच केला नाही ही गोष्ट खोटी आहे, कारण दलितांना शिकण्याचा अधिकारच नव्हता. बुद्धकाळापासून याविरुद्ध संघर्ष चालूच आहे. तथागतांचे सम्यक बौद्ध तत्त्वज्ञान आणि मध्यममार्ग, स्वर्गनरक या कल्पना नाकारणे आणि एकूणच विवेकवादी बौद्ध तत्त्वज्ञान ही प्रस्थापित जातिसंस्थेविरुद्ध चळवळच होती. मध्ययुगीन काळातील संत कबिरांसारखे संत व त्याच वेळी महाराष्ट्रात उदयाला आलेला वारकरी पंथ यांनी समाजातील जन्मावर आधारीत उच्च–नीचतेचा कायमच निषेध केला आणि माणुसकीचे साधे सोपे व सरळ तत्त्वज्ञान रुजवले. परंतु प्राध्यापक रावांसारखे लोक याच जातिसंस्थेची भलामण करत आहेत. मोदी राजवटीमध्ये बहुजन समाजापुढे व बहुजन हिताय आणि बहुजन सुखायचा पुरस्कार करणाऱ्या समतेच्या तत्त्वज्ञानापुढे काय वाढून ठेवले आहे याचेच हे उदाहरण आहे.

**– राम पुनियानी**
११०२, बिल्डींग नं.५, म्हाडा कॉलनी, रामबागजवळ,
पवई, मुंबई ४०००७६

**अनुवाद – प्रसन्न मराठे**
सी–११ सृष्टी, गुरुगणेशनगरजवळ, डीपी रोड,
कोथरूड, पुणे ४११०२९

## 'सत्याग्रही'साठी लेखन पाठवा.

नव्या दमाचे, ताजे, तुमच्या शैलीतले.
मनमोकळे, स्पष्ट, परखड, मुद्देसूद.
सभोवतालच्या परिस्थितीवर अचूक भाष्य करणारे.
भ्रष्ट राजकारण, मनमानी नोकरशाही, उदारीकरणाच्या नावाखाली चालणारा वसाहतवाद यावरील प्रतिक्रिया.
दारिद्रय, बेरोजगारी, गुंडगिरी, शोषण यांचे अस्वस्थ करणारे सच्चे अनुभव.
वाऱ्याच्या झुळकीसारखी वाटणारी एखादी सुखद घटना.
नर्म विनोदी पद्धतीची चुरचुरीत आठवण.

कथा, कविता, अनुवाद, व्यक्तिपर लेख, ललित असे काहीही.
सारे काही सत्याग्रही परिवाराला साजेसे.
पानाच्या एका बाजूस, समास सोडून सुवाच्च अक्षरांत आमच्याकडे लिहून पाठवा.
चांगल्या मजकुराला सत्याग्रहीत निश्चितच प्रसिद्धी दिली जाईल.
आपले सहकार्य 'सत्याग्रही' साठी मोलाचे आहे.

कथा



# नात मातीच

मूळ हिंदी - रईसा जिलानी

अनुवाद - सदानंद सिनगारे

मुंबई अमृतसर मेल आपल्या नेहमीच्या जलदगतीने पुढे जात होती. रतलाम नागदा मागे पडलं होतं. भवानी मंडी रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर संत्रा भरलेल्या टोपल्या घेऊन विक्रेते ओरडत होते. इथे संत्रा भरपूर पिकतो. नागपूर नंतर संत्रा उत्पादनात याच भागाचा क्रमांक लागतो. भारतभरातून ते प्रसिद्ध ठिकाण असल्याचं सांगतात. माझ्या समोरच्या बर्थवर बसलेल्या स्त्रीने तिच्या मुलासाठी संत्री घेतली. माझ्यासमोर एक धरून म्हणाली, ''घ्या, खाऊन बघा. इथली संत्री चवीला गोड आहेत. गोड आणि रसदार.'' मी काही बोलण्याआधीच तिने माझ्या हातावर एक संत्रे ठेवलेच. खरं म्हणजे मी तिला टाळू शकलो नाही. मी संत्रे खाल्ले आणि माझा अभिप्रायसुद्धा दिला. मी म्हणालो, ''खरोखर संत्रे गोड आणि रसदार आहेत आणि मोठीसुद्धा ! जणू काही आताच झाडावरून तोडून आणली इतकी ताजी !''

गाडी आपल्या गतीने धावत होती. कोटा सवाई माधोपूर मागे पडले होते. तेवढ्यात मला डुलकी लागली. अर्धवट

झोपेतून जाग आली तेव्हा गाडी मथुरा स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभी होती. पेढेवाले जोरजोरात आवाज देत होते. मी खाली उतरून पेढे घेतले. डब्यात येऊन त्या महिलेच्या मुलांना दिले. जास्तच आग्रह केल्यावर मोठ्या मुश्कीलीने तिने एक पेढा घेतला आणि म्हणाली, ''तुम्ही कधी घरी पेढे तयार करून खाल्ले काय?''

''या जमान्यात, त्यातल्या त्यात दिल्ली सारख्या मोठ्या शहरात, दूध कुठे मिळते चांगले. गायी म्हशी पाळण्याचा तर प्रश्नच नाही.'' मी म्हणालो.

''खरंच, बरोबर आहे तुमचं म्हणणं. पेढे बनवण्यासाठी दूध चांगलं पाहिजे.'' असं म्हणत ती एक गुजराथी मासिक काढून वाचू लागली. मुलं व्हि.डी.ओ.गेम खेळण्यात रमून गेली. खेळता खेळता एकमेकांशी भांडू लागली. छोटा तर फारच खोडकर होता. मी मध्ये पडून त्यांना समजावीत होते.

मी बारकाईने त्या स्त्रीकडे बघत होतो. कारण जेव्हा मी डब्यात चढलो तेव्हापासून ती मला ओळखीची वाटू लागली होती. परंतु ती नेमकी कोण? आठवत नव्हते. तिच्या गालावर असलेला काळा तिळ मात्र मला सारखी कम्मोची आठवण करून देत होता. कम्मो, जिचं नाव करुणा असं होतं. गोरा रंग, पाणीदार डोळे, लांब नाक असलेली कम्मो रुपवान होती. पस्तीस वर्षे झालीत गाव सोडून. कुणास ठाऊक आता कुठे असेल कम्मा !

खिडकीबाहेरच्या वृक्षांना मागे टाकत ज्या वेगाने गाडी पुढे धावत होती त्याच वेगाने माझे विचारचक्र किती तरी वर्षे मागे जात होते. थेट मी दहा-अकरा वर्षे वयाचा असेल त्या काळात ते जाऊन थांबले. कम्मो साधारण त्याच वयाची असेल. गाव लहानच होते आमचे. परंतु टुमदार आणि स्वच्छ. गावातल्या सत्यनारायणाच्या मंदिरातल्या पुजारी बाबांची एकुलती एक मुलगी होती कम्मो.

आम्ही गावातल्या प्राथमिक शाळेत शिकत होतो. कम्मो रोज मंदिरातला प्रसाद आणायची. कधी पेढे, कधी बर्फी तर कधी केळी, पेरू असा तो प्रसाद असायचा. गावातील लोकांनी भक्तीभावाने भगवंताला चढवलेला प्रसाद एका थैलीत भरून ती आणायची. म्हणजे तिच्या दोन्ही हातात थैल्या असायच्या. एक शाळेच्या पुस्तकांची आणि एक प्रसादाची. शाळेतली मुलं तिच्या मागे मागे या प्रसादाच्या आशेने फिरायची. मधली सुटी झाली की ती मुलांना प्रसाद वाटायची. मला जरा जास्तच द्यायची. याला कारण म्हणजे मी तिला गणिते सोडवायला मदत करायचो. आमची घरे जवळ जवळ होती. कधी कधी तर मी तिची प्रसादाची भारी थैली शाळेत आणायला मदत करायचो.

माझे आजोबा त्यावेळी गावचे सरपंच होते. खूप मोठा वाडा गोदाम आणि बगिचा होता. त्या बगिच्यात आजोबांनी एक शिवमंदिर उभारले होते. शिवरात्रीला तिथे मोठी जत्रा भरायची. मी रोज आजोबांसोबत मंदिरात जाऊन भगवान शंकराला बेलपत्र अर्पण करायचो. शंकरजींच्या गळ्यातला साप आणि समोर बसलेला नंदी तर फारच सुरेख होते. मी आजोबांना म्हणायचो, ''या सापाची भीती नाही का वाटत या शंकरजींना? यावर आजोबा म्हणाले होते, ''बेटा, शंकरजी सापाचे विष पिऊन टाकतात. त्यांनी समुद्रमंथनात निघालेले विष पिऊन टाकले नसते तर आतापर्यंत या पृथ्वीवर पापच पाप वाढले असते. म्हणून तर शंकरजींना 'निलकंठ' म्हणतात.'' आजोबा फारसे शिकलेले नव्हते; परंतु कथा भागवत ऐकून त्यातल्या गोष्टी ते मला सांगायचे.

मी कम्मोच्या त्या मंदिरात सत्यनारायणाची पूजा करायचो तेव्हा कम्मो मला तुळशीचं चरणामृत द्यायची. माझ्या कपाळावर गंधाचा टिळा लावायची आणि मग मी मंदिरला प्रदक्षिणा घालायचो. संध्याकाळच्या आरतीला सुद्धा मी कधीकधी हजेरी लावायचो. आरतीला बहुदा गल्लीतले सारेच स्त्रीपुरुष गोळा व्हायचे. कम्मोची आजी माझ्या हातात पितळेची छोटी घंटी द्यायची आणि ती वाजवीत मी 'जय जगदीश हरे' ही आरती मोठ्या आवाजात म्हणायचो.

दिवाळीच्या दिवसात तेच पुजारी आमच्या घरी लक्ष्मी पूजनाला यायचे. आजोबा त्यांना भरपूर दक्षिणा द्यायचे. दसरा दिवाळीत मोठी मजा असायची. लोक आजोबांना भेटायला यायचे. राम राम घालायचे. आजोबा नोकरांना सुद्धा नवे कपडे द्यायचे व त्यांना फेटा बांधायचे. गावभर दिव्यांच्या पणत्यांच्या ओळी असत. फटाक्यांची आतिषबाजी तर खूपच.

एक दिवस कम्मो आणि मी फटाके फोडत होतो. आम्ही एक छोट्या फटाक्यांची लड गायीच्या शेपटाला बांधून पेटवून दिली. मग काय पुसता, गाय खुंट्याचे दावे तोडून जीवाच्या आकांताने सैरावैरा पळायला लागली. तिने सर्वत्र धुमाकूळ घातला. अंगणातले सगळे दिवे तुडवले. सगळीकडे हलकाल्लोळ माजला. पुजारी बाबांनी कम्मोला दोन थापडा मारल्या. मी भीतीने माझ्या घरात पळून आलो. मात्र रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. माझ्या उनाडपणाची शिक्षा कम्मोला मिळाली. ती सारखी रडत असेल. तीही रात्रभर झोपली नसेल. रात्री उशीरा मला झोप लागली. दुसऱ्या दिवशी मी तिच्या घरी मिठाई घेऊन गेलो तर ती बोलली सुद्धा नाही. तोंड फिरवून मंदिराच्या मागे

सहानेवर चंदन उगाळायला राग रागात निघून गेली.

'अन्नकूट'च्या दिवशी ज्यावेळी मी मंदिरात गेलो. कम्मोने काहीच खाल्ले नव्हते. छप्पन पदार्थ आणि बत्तीस भाज्यांचा नैवेद्य केला होता. त्यातलं तिने काहीच खाल्लं नाही. तिची आई म्हणाली, ''बेटा, कम्मो तुझीच वाट बघत बसली होती. आम्ही सोबतच सर्वांच्या पत्रावळी मांडल्या होत्या. ती सतत सांगत हाती की, आई, गोपालसाठी दहीवडे काढून ठेव, काकडीची भाजी काढून ठेव.''

अन्नकुटचा दिवस मला खूप चांगला वाटायचा. सर्वत्र गोड धोड पक्वांनाचा सुवास घमघमत असायचा. केशराचा सुगंध वातावरणात भरलेला असायचा. मी सर्वात लहान होतो म्हणून माझी आजी नेहमी मला दूधात केसर टाकून त्या दूधापासून बनवलेली खीर द्यायची. असली केशरचा सुगंध मला बरोबर ओळखता येत असे.

होळीच्या दिवशी पिचकारी घेऊन मी कमोच्या घरी जायचो. ती जाम घाबरायची, घरात एका कोपऱ्यात जाऊन लपून बसायची. संध्याकाळी ज्यावेळी ती तिच्या आजीसोबत मंदिरात कापसाच्या वाती वळायची तेव्हा गुपचूप जाऊन थोडा गुलाल तिच्या अंगावर टाकून पळ काढायचो. काय मजेदार होळी असायची गावात! मोठमोठ्या कढ्यातून रंग तयार केला जायचा. होळीची फाल्गुनची गाणी म्हणायचे लोक. मला त्यावेळी त्या गाण्यातले फारसे कळत नव्हते. आता समजते की ते ऋतू ऋतूंचे गाणे होते. निसर्गाच्या विलोभनीय सौंदर्याचे आणि परिवर्तनाचे गाणे होते.

गाव खूपच चांगले होते. सगळीकडे हिरवळ होती. जांभूळ खिरणीची झाडे होती. पिवळ्या खिरण्या गोड आणि चवदार लागायच्या. लोक या किरण्या सुकवून आपल्या नातेवाईकाकडे दूर दूर च्या गावी पाठवायचे. करवंदाच्या जाळ्या तर कित्येक होत्या. दाट जाळीत कधी कधी चित्ता वस्ती करून राहायचा. एकदा तर तो गावात आला होता. बाहेर झोपलेल्या एका मुलाला चित्ता उचलून घेऊन गेला तेव्हापासून लोक अधिक सतर्क राहू लागले.

अचानक एक दिवस बातमी आली की चंबळ नदीवर गांधीसागर धरण बांधणार आहेत. त्यामुळे आसपासची गावे पाण्याखाली येतील. लोकांना तिथून हलवून अन्यत्र विस्थापित केले जाईल. त्यांना त्याचा मोबदला देण्यात येईल असेही सरकारातून सांगण्यात आले. ही वाईट बातमी जंगलातल्या वणव्यासारखी सगळीकडे पोहोचली. लोकांना धक्काच बसला. गावात स्मशानशांतता पसरली. पंचायतीची तातडीने मीटिंग भरली.

मी लहान होतो; परंतु मला नक्की आठवते की त्या रात्री आजी खूप रडली होती. आई बाबा दुसऱ्या खोलीत महत्वाची कागदपत्रे बघत बसली होती. अधून-मधून ते एखादाच शब्द बोलत होते. त्या दिवशी कुणाकडेच चूल पेटली नाही. मुलांना दूध गरम करून देण्यात आले होते. घराघरातील स्त्रिया बाहेर येऊन आपसात गोष्टी करीत होत्या. सर्वांच्या डोळ्यात अश्रू होते.

आजोबा तर मौन धारण करून बसले होते. हिरामण पोपट आपले पंख जोरजोरात फडफडवून भूक लागल्याचं सांगत होता. आईने त्याला एक भाकरीचा शिळा तुकडा आणि एक हिरवी मिर्ची दिली आणि एक दीर्घ निश्वास टाकून मनाशीच म्हणाली, ''हिरामण, आता तुला कसे घेऊन जायचं रे बाबा.'' आई दुःखी मनाने कपाळावर हात देऊन थिजल्यासारखी जागीच बसली होती. ज्यावेळी सामानाची बांधाबांध केली गेली त्यावेळी हिरामणचा पिंजरा मी माझ्या हातात घेऊन ठेवला होता.

पहाटेलाच आजोबा शिवमंदिरात गेले होते. मलाही लवकर जाग आली होती म्हणून मीही त्यांच्या मागोमाग मंदिरात गेलो. आज मी आजोबांना लहान मुलांसारखे रडताना पाहिले होते. शिव शंकरजींच्या समोर बसून ते ओक्साबोक्शी रडले होते. मी आजोबांना समजावीत होतो घरी चलण्यासाठी आग्रह करीत होतो.

आमच्या बगिच्याची देखभाल करण्यासाठी रमजानी काकांना नेमले होते. त्यांच्या राहण्याची सोय बगिच्यातच एका कोपऱ्यात दोन खोल्या बांधून करून देण्यात आली होती. रमजानी काकासोबत त्यांची पत्नी, दोन मुली व एक मुलगा सलीम असे कुटुंब होते. सलीम माझ्यासोबतच शिकत होता. त्या कुटुंबाशी आमचे घरोब्याचे संबंध होते. आजोबा त्यांच्याशी खूप गोष्टी करीत.

आज आजोबा काही न बोलता निघाले होते. तेवढ्यात त्या काकूने आवाज दिला, ''सावकारजी, असे चुपचाप नका जाऊ. या, सुपारी तर घ्या.'' काकूंनी लाकडी खाट टाकली. एक प्रांजळ मनाचे ते कुटुंब होते. त्यांच्याकडे चार बकऱ्या व सहा सात कोंबड्या होत्या. थोडी भांडी कुंडी आणि एक दळणाची छोटी चक्की होती.

आजोबा खाटेवर बसता बसता म्हणाले, ''काकूजी, आम्ही सगळे लुटल्या गेलो बरबाद झालो. आता गाव खाली करावे लागणार.'' त्यावर काकू म्हणाली, ''अरे कां, रमजानी सांगत होते असं काही तरी. परंतु असे कसे होईल? आमचे तर सगळे खानदान इथेच पुरलेले आहे. ते सोडून कसे जाईल मी. माझ्या मुलाची अकबरची कबर इथेच आहे. त्यावर अगरबत्ती कोण लावील? मी नाही गाव सोडून जाणार. पाण्यात बुडायचं झालं तरी बेहेत्तर. मी बुडून जाईल पण इथून हलणार नाही.''

असं म्हणत काकूने डोळ्याला पदर लावला.

आजोबा म्हणाले, ''हो ना, मी सुद्धा अपार कष्ट घेऊन काडी काडी जमवून एवढं सगळं उभारलं आणि जे जागच्या जागी सोडून जाताना हृदय पिळवटून निघते बघा. माझं शिवमंदिर बांधायला जेमतेम दोन वर्षे झाली असतील. शिव शंभूची मूर्ती अजूनही चमकदार आहे जणू काही आताच प्रतिष्ठापना केली आहे.''

''होय सावकारजी.'' रमजानी काका आतापर्यंत एका बाजूला बसून जमीन उकरण्याचा चाळा करीत चूप बसलेले होते ते बोलले. आजोबांनी काकूच्या हातून सुपारीचे खांड घेतले आणि खाटेवर ठेवलेली पिवळी पगडी डोक्यावर ठेवून काठी टेकत ते निघाले. खरोखर ज्या दिवशी सगळा गाव खाली झाला त्या दिवशी ती काकू आपल्या अकबराच्या कबरीला आलिंगण देऊन तिथेच मेलेली आढळली होती. तिला सुद्धा अकबराच्या कबरीशेजारीच पुरले होते.

माझ्या आजोबाचे मोठे भाऊ दिल्लीत रहायला गेले होते. आजोबांनी तिथेच अशोकविहारमध्ये एक घर विकत घेतले. ज्यावेळी आम्ही घर सोडून निघालो त्यावेळी आजीने तुळशीच्या झाडाखालची थोडीशी माती खोदून एका कापडात बांधून ठेवली होती. आजी तू कापडात काय बांधतेस म्हणून मी विचारले तर म्हणाली होती, ''बेटा, आपल्या गावाची माती आहे. जेव्हा मी लग्न होऊन या घरात आले होते तेव्हापासून या मातीचा सुगंध मनात साठवत आले आहे. हाच सुगंध आत मी दिल्लीला घेऊन जाईल.''

खरोखर आजीने ती कापडात बांधलेली माती तिच्या लोखंडी पेटीच्या तळाशी ठेवली होती आणि ज्या ज्या वेळी दिपावलीत लक्ष्मीपूजन व्हायचे त्यावेळी ती ही मातीची पुरचुंडी पूजेत ठेवत असे. आम्ही त्या मातीला धूप दाखवत असू. तिची आरती करीत असू. आजीने मला हे स्वत:च सांगितले होते. आईला तर आजी म्हणाली होती की, ''मी ज्यावेळी मरेन त्यावेळी ती मातीची पुरचुंडी माझ्या तिरडीवर ठेव.'' आणि खरोखरच आईने ती मातीची पुरचुंडी आजीच्या तिरडीवर ठेवली होती. हे सगळं पाहत ऐकत मी मोठा होत गेलो. आजोबा तर दिल्लीला असताना सदानकदा गावाच्याच गोष्टी करीत असत. आता हिरामण पोपट आपल्या पिंजऱ्यात बसून आमच्या आयुष्याचे हे बदलते रंग पाहात म्हातारा होत चालला होता.

अचानक एका झटक्यात एका स्टेशनवर गाडी थांबली. माझ्यासमोरच्या आसनावर बसलेली ती स्त्री वरच्या बर्थवर ठेवलेली पेटी काढण्यासाठी उभी राहिली. तिचे दोन्ही हात पेटी काढण्यासाठी वर केले तेव्हा मला तिच्या हाताच्या कोपरावर एक लांब असा जखमेचा व्रण दिसला. मला त्याचक्षणी आठवले की कम्मोच्या हातावर सुद्धा असाच व्रण होता. जांभळे तोडताना तुटलेली एक फांदी घुसून झालेल्या जखमेने तो व्रण कायमचा पडला होता. खूप रक्त वाहून गेले होते. दहा टाके तरी पडले असतील. माझ्या मनात वारंवार येत होते की ही स्त्री कम्मो तर नसेल ! मी मोठ्या हिमतीने तिला विचारले, ''तुम्ही बालपणी कुठे होतात?''

ती म्हणाली, ''मध्यप्रदेशात, चंबळाच्या काठी एक छोटेसे गाव होते, मातेसरा.''

माझा अंदाज खरा ठरला होता. ''करुणा नाव आहे ना तुमचं?''

''तू गोपाल तर नाहीस?'' ती आश्चर्याने म्हणाली.

''होय, मी गोपाल..'' पुढील शब्द माझ्या गळ्यात अडकले होते. तिच्याही डोळ्यात आसू आले होते. किती वर्षे झाली आम्ही एकमेकांना भेटलो नव्हतो.

काही वेळाने मी म्हणालो, ''कम्मो, कुठे गेले होते तुम्ही सारेजण?''

ती एक दीर्घ श्वास घेत सांगू लागली, ''गोपाल, माझे मामाजी सुरतला राहायचे. आम्ही सगळे तिथेच गेलो होतो राहायला. तिथेच एका मंदिरात माझ्या बाबांना पूजा करण्याचं काम मिळालं होतं. मलाही मघापासून असं वाटत होतं की या माणसाला कुठेतरी पाहिलेलं आहे म्हणून. पण गोपाल, तुझ्या केसात जन्मापासून ती एक पांढरी बट होती ती कुठे गायब झाली?'' मी म्हणालो, ''केसांच्या खिचडीत कुठे हरवली कळलेच नाही.'' आम्ही लोक दिल्लीला आलो. आजोबांनी तिथेही अडत सुरू केली. मी शिकत होतोच. डॉक्टर झालो. सफदरगंजमध्ये एक हॉस्पिटल आहे तिथे मी हृदयाचा डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहे.'' अशा अनेक आठवणी आम्ही काढत गेलो. जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. काही आठवत नव्हते ते मेंदूला जोर देऊन आठवण्याचा प्रयत्न झाला. कम्मो म्हणाली, ''रमजानी काका कुठे भेटले?''

त्रेय, सलीम मला १९७१च्या भारत पाकिस्तान युद्धाच्या वेळी भेटला होता. तो सेकंड लेफ्टनंट म्हणून सैन्यात नोकरीला होता. रमजानी काका भोपाळला होते. सकीना व शकीलाचे लग्न होऊन त्या सासरी गेल्या आहेत.

''गोपाल, पण इतक्या दिवसांनी तू सलीमला कसे काय ओळखलेस?''

''तो युद्धात गोळी लागून जखमी झाला होता. माझी ड्युटी तेव्हा फ्रंटवर लागली होती. मी नवीनच डॉक्टर म्हणून कामाला लागलो होतो. तुला आठवते कम्मो, 'हातात

बांधलेला काकूनी दिलेला हिरवा तावीज. मी त्याला विचारलेच की ''तू सलीम आहेस ना.'' तेच बरोबर निघाले. आम्ही दोघे दोन महिने सोबत राहिलो. आता दोन महिन्याआधी दिल्लीला आला होता. खूप मोठा सुका मेवा घेऊन आला होता. रमजानी काका म्हातारे झाले. सलीम सगळ्यांची आठवण करीत होता.

''माझी आठवण करीत होता काय रे सलीम?''

''वा.. वा.. तुला कसा काय विसरू शकतो तो कम्मो? मुगाचे लाडू त्याला खूप आवडायचे. मी माझ्या हिश्याचे सुद्धा त्यालाच द्यायचो. तू मला आणि त्यालाच तर जास्त प्रसाद देत होतीस. एक दिवस शाळेतून येताना एक कुत्रा तुझ्या मागे लागला होता तेव्हा सलीमनेच तर तुला त्याच्या तावडीतून सोडवले होते.''

''होय गोपाल, माझा फ्रॉक सुद्धा फाटला होता. आणि तेव्हापासून मला काळा कुत्रा पाहिला की फार भीती वाटते.'' कम्मो बोलता बोलता थांबली. तिचा श्वास भरून आला होता. मी म्हणालो, ''तुझी आठवण काढत होता सलीम. परंतु मला तरी तुझा पत्ता कुठे माहिती होता? हां, तुझी आजी माझी आठवण काढते का गं?''

''होय गोपाल, आजी तर तुझी किती वर्षे आठवण काढीत होती.'' म्हणायची, '' गोपाल सुंदर आरती म्हणायचा. आजी गावाला कशी विसरेन. गावच्या कृष्ण मंदिरातील मूर्तीचे दागिने तिथेच मंदिराच्या मागे जमिनीत पुरून आली होती इथे. ही गोष्ट बाबांना दोन वर्षांनंतर तेव्हा कळली जेव्हा त्यांना इथल्या मंदिरातल्या मूर्तीला शृंगार करावयाचा होता. कारण की ते मंदिर आता बाबांच्या संपूर्ण ताब्यात देण्यात आले होते. आम्हाला राहायला चांगले घर याच मंदिराच्या आवारात बांधून दिले होते. आजीला बस एकच चिंता होती ती म्हणजे कृष्णदेवाचे दागिने आता कसे आणायचे. गाव तर धरणाच्या पाण्यात बुडून गेले होते. शेवटी त्या दागिण्यांचा पिच्छा सोडला होता.

''करुणा, जेव्हा तुझे लग्न झाले तेव्हा आली का गं माझी आठवण? यावर कम्मो उर्फ करुणा म्हणाली, ''होय तर. खूप आठवण येत होती. या गोष्टीवरून मला आठवले जेव्हा शेजारी मावशीकडे तिच्या मुलीचे लग्न होते तेव्हा नवरा मुलगा मांडवात आला तेव्हा मी मनातल्या मनात म्हणालो होतो की मी सुद्धा एक दिवस कम्मोच्या अंगणात असाच मांडवाखाली येऊन कम्मोला पत्नी म्हणून आपल्या घरी घेऊन जाईल.

त्यावेळी आजी आणि आई खूप हसल्या होत्या. कारण कम्मो पडली गुजराथी ब्राह्मण आणि आम्ही माहेश्वरी महाजन. त्यावेळी हे जातीपातचं बंधन फार कठोरतेनं पाळत असत. जातीची गोष्ट आजीनेच मला सांगितली होती. एरवी मला माहिती असायचे काय कारण?

करुणा थांबून थांबून एकएक गोष्ट सांगत होती. म्हणाली, ''माझे लग्न सुरतच्याच एका चांगल्या कुटुंबात झालं. सासरे बुवांचा कापडाचा ठोक व्यापार होता. माझ्या पतीचे तिथेच महावीर मार्केटमध्ये कापडाचे दुकान आहे. पती खूपच चांगल्या स्वभावाचे आहेत. दोन मुली आहेत आम्हाला. ही दोन मुले माझ्या मोठ्या मुलीचे आहेत. त्यांना सोडायला मी दिल्लीला जात आहे. हे सांगताना ती अचानक रडायलाच लागली. म्हणाली गावची खूप आठवण येते.

माझ्या बाबांना सुरतचे वातावरण मानवत नाही. त्यांना तिथे करमत नाही. ते म्हणतात, ''कुठे गावातली ती शुद्ध हवा आणि त्या आमराया. कुठे ही सुरतची प्रचंड गर्दी आणि सतत धावत असलेले लोक. आई तर प्रत्येक सणाला गावची आठवण काढते. तिकडचं सणावाराचं खाणंपिणं आणि सुरतचं सगळं वेगळंच वाटतं तिला. इथले खाखरे खम्मण आणि तिथल्या लाडू बाटीची व बाफल्यांची ती तुलना करते. हिरव्या कोथिंबीरीच्या चटणीची तिला आठवण येते. इथल्या खोबरा चटणीत सगळे गोड घालतात याचे तिला नवल वाटते. ती म्हणते, इथे आल्यावर कित्येक दिवस तर जेवणच गोड लागलं नाही. आजी तर बाबांना म्हणते, ''देवाने आमच्या तोंडातला आमच्या जिवंतपणीच घास हिसकावून घेतला.''

''होय कम्मो, आमच्या घरी सुद्धा अशाच गावच्या गोष्टी राहतात. आजी आजोबा तर दहा वर्षेच राहीले परंतु त्यानंतर आईबाबा पार थकून गेले. नवे शहर नवीन लोक नव्याने व्यापार याचे बस्तान बसवताना खूप अडचणी आल्या. आमचे काका मात्र खरोखरच चांगले होते. आपल्या मुलांपेक्षाही त्यांनी आम्हाला जास्त माया लावली. मी त्यांच्या प्रेरणेमुळेच आज डॉक्टर होऊ शकलो.

दिल्ली जसजशी जवळ येऊ लागली तसे आम्ही पुन्हा जवळ आलो होतो. कम्मोला मी माझ्या घरी येण्याचे निमंत्रण दिले. माझ्या पत्त्याचे कार्डही दिले. कम्मो म्हणाली, ''मी हार्ट पेशंट आहे आणि तू पडला हृदयाचा डॉक्टर. कधी आजारी पडलीच तर तुझ्याकडेच येईन ऑपरेशन करायला.''

''असे म्हणू नकोस कम्मो.'' मी म्हणालो.

गाडी थांबली. दिल्ली स्टेशन आले होते. कम्मोला तिचे सर्व सामान उतरविण्यास मी मदत केली. तिचे जावई तिला घ्यायला आले होते. त्यांच्याशी ओळख झाली. आम्ही दोघेही वयाने पन्नासच्या आसपास

होतो. परंतु नात्याला वयाची अट नसते. तोच गोडवा तोच ताजेपणा तोच गावाच्या मातीचा सुगंध सोबत होती. जड अंतकरणाने आम्ही निरोप घेतला.

दोन वर्षे झरझर निघून गेली. आज हॉस्पिटलमध्ये जेव्हा मी बाह्य रूग्ण विभागात रोग्यांना तपासत होतो तेव्हा एक आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेला पुरुष येऊन मला विचारू लागला. ''तुम्ही डॉक्टर गोपाल आहात ना, मातेसरावाले?'' मी होय म्हणाले.

''मी करूणाचा पती, शरद भट्ट. करूणाच्या हृदयाचे दोन व्हॉल्व खराब झालेत. मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करतो म्हणालो. परंतु तिचे तुमच्या हॉस्पिटलमध्ये येण्याचा हट्टच धरला. म्हणाली, ''ऑपरेशन करायचे तर डॉ. गोपालकडेच.''

''चला, बरे झाले. कधी ना कधी आपण आपल्या गावाकडच्या लोकांच्या कामी पडलो.''

खम्मोला डिलक्स वॉर्डात भरती करण्यात आले. तिथे तिला बरे वाटत होते. म्हणत होती की, ''इथे मरण आले तरी मनाला शांती मिळेल. मी तिला अशी निराषेची गोष्ट मुखातून काढायचीच नाही, असे सांगत होतो. इथून बहुतेक सगळे रोगी तंदुरुस्त होऊन जातात. माझी पत्नी आणि मुलेही तिला भेटायला आली होती. तिलाही त्यांना भेटून बरे वाटले.

ऑपरेशनच्या दिवशी मी कम्मोसाठी लाल गुलाबांचा गुच्छ आणला होता. मला पक्की आठवण होती की कम्मोला लाल गुलाब खूप आवडतात. बगिच्याच्या माळ्याची नजर चुकवून ती गुलाबाची फुलं तोडून न्यायची. आज माझ्या हातून गुलाबाचा गुच्छ घेताना तिला रडू कोसळले होते. मी ते पाहून बाहेर आलो होतो. तिचा पती माझ्या मागे येऊन मला समजावू लागला. म्हणाला, ''डॉक्टर असूनही इतके भावविवश होता तुम्ही. मला करुणाने सगळं काही सांगितलं आहे.''

मी त्यांच्या तोंडाकडे पाहू लागलो. रुमालाने डोळे पुसले. मला वाटू लागले की माझे हात कम्मोचे ऑपरेशन नाही करू शकणार. मी हे ऑपरेशन डॉक्टर बॅनर्जीकडून करवून घेईन.

कम्मोला रक्तदाब होता. तो सामान्य करता करता एक आठवडा गेला. ज्या दिवशी ऑपरेशन ठरले होते त्याच दिवशी सकाळपासून तिची नस मंदावली होती आणि ऑपरेशन थिएटरमध्ये जाण्याच्या आधीच तिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. तिचा हात माझ्या हातात तसाच राहून गेला. गुलाबाची फुले सगळीकडे अस्ताव्यस्त पसरली.

मी आत काळजातून हादरून गेलो. मी अशी कल्पनाही करू शकत नव्हतो की कम्मो माझ्या हातात असताना जीव सोडेल. मी व्हरांड्यात बसून खूप खूप आठवण काढीत होतो. वारंवार ते लाल गुलाब समोर दिसत होते. मी माळ्याला आवाज दिला. म्हणालो, ''बगिच्यातले सगळे गुलाब उपटून फेकून दे.''

मला आज– आतापर्यंत माझ्या गावाच्या मातीचा सुगंध आसमंतात पसरल्याचे जाणवते.


**– मूळ हिंदी – रईसा जिलानी**

**– अनुवाद – सदानंद सिनगारे**

जिजामाता मार्ग, खामगाव, जि. बुलडाणा

मोबा. ९४२२५६८१२७



## खालील विक्रेत्यांकडे सत्याग्रहीचे अंक विक्रीस उपलब्ध आहेत.

- **बी. डी. बागवे आणि कंपनी**
  खटाव बिल्डीग, सेंट्रल सिनेमामागे, गिरगाव, मुंबई
- **संदेश एजन्सी**
  अप्पा बळवंत चौक, नारायण पेठ, पुणे ४११०३०
- **पूनम एजन्सी**
  जोगेश्वरी मंदिरासमोर, बुधवार पेठ, पुणे ४११००२
- **अपर्णा एजन्सी**
  ५१८, दक्षिण कसबा, सोलापूर ४१३००७
- **पाठक ब्रदर्स**
  श्रीनिवास, सहकारनगर, नाशिक ४२२००१
- **विवेक बुक सेंटर**
  हनुमान चौक, मेन रोड, लातूर ४१३५१२
- **पाठक ब्रदर्स**
  मेहेर प्रसाद कॉम्प्लेक्स, रामदास पेठ, नागपूर ४४००१०



मंथन

# महाभारतकाळ : ऱ्हासपर्वाकडून भक्तीयुगाकडे

– चंद्रकांत अडावदकर

*भक्ती नावाचा एक नवा युगधर्म महाभारत काळाच्या अंतसमयी त्या दग्धभूमीत अंकुरत होता. त्याचे हे धुमारे जीवनाच्या भावना, कल्पना, विचार, संवेदना या साऱ्याच पैलूंना सजीवपणा देत होते. मरगळीची धूळ झटकली जात होती. जीवन जगण्याच्या मागे एक बळवंत, सशक्त आणि सक्षम उद्दिष्ट, प्रयोजन उभे राहात होते. त्यातून एक नवी स्फूर्ती, ईर्ष्या जागी होत होती. श्रीव्यासांनी लिहिलेले श्रीमत् भागवत किंवा अठरापुराणे हे त्याचेच आविष्कार होत.*

महाभारतात अश्वत्थाम्याच्या बालपणीची एक गोष्ट आहे. त्याला दूध हवे होते. त्याऐवजी पिठात पाणी मिसळून केलेली लापशी त्याला दूध म्हणून दिली. महामूर दारिदैन्य याचा हा दैवाणा आविष्कार होता. पण अश्वत्थामा ''मी दूध प्यालो'' म्हणत फुशारकी मारू लागला. आपणही अनेकवेळा भासालाच सत्य मानून मूळच्या सत्याकडे डोळेझाक करीत असतो; आणि आपल्या समस्येवर उत्तर मिळाले म्हणून समाधान मानून घेत असतो. तारुण्यातील प्रमाथी कामवासनेलाच 'प्रेम' समजतो. आज कित्येक महिला नोकरीच्या जोखडात स्वत:ला बांधून घेतात आणि त्यातून मिळणाऱ्या पगारालाच आर्थिक स्वातंत्र्य समजतात. प्रत्यक्षात मात्र 'चूल, मूल आणि रांधा, वाढा, उष्टी काढा' या तथाकथित बंधनांमध्ये आणखी एका पारतंत्र्याची गोष्ट वेगळी असते. वस्तुस्थितीतल्या वास्तव विवंचना खरे उत्तर मिळेपर्यंत त्यांची पाठ सोडत नाहीत. मग ते विद्यार्थीदशेतील मैत्री खरी समजून मदत घेण्यासाठी द्रुपदराजाकडे जातात, तेव्हा त्यांचा भ्रमनिरास होतो. गुरुगृही शिकत असताना झालेली राजाची मैत्री हाही एक आभासच होता आणि आपण त्यालाच सत्य मानीत होतो; या साक्षात्काराने स्वत:चे दारिद्र्य त्यांना अधिकच खुपू लागले. त्यामुळे त्यांनी काय केले हे आपल्याला ठाऊक आहे. कुरुवंशाच्या पुत्रांना शस्त्रास्त्रविद्या शिकवण्याची नोकरी त्यांनी पत्करली. आपली विद्या विकायला

काढून तथाकथित कौटुंबिक स्वास्थ्य त्यांनी कमावले खरे; पण त्या मोबदल्यात, खरेतर, द्रुपदाचा विध्वंस करण्याच्या सुडबुद्धीचा एक किडा त्यांच्या मनाला एकसारखा पोखरत राहिला. द्रौपदीची भर दरबारात होणारी विटंबना त्यामुळेच त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली. गुरुच्या उच्चासनावर बसून द्रौपदीच्या पाच पतींना द्रुपदाच्या जावयांना (म्हणजे वस्तुत: आपल्याच शिष्योत्तमांना) जुगारात कपटाने दास बनवलेले पाहताना 'आपला या गोष्टीशी संबंध नाही' असा सर्वसाधक तटस्थपणा स्वीकारला. पुढे द्रुपदाचा वंश कुरुक्षेत्रावर रणांगणात पांडवांच्या बाजूने उभा राहिलेला पाहून कौरवांचे सेनापतिपद त्यांनी स्वीकारले. न्याय–अन्यायाबद्दल विवेक शिकण्याचे कर्तव्य असणाऱ्या या गुरुचा हा अध:पातच होता. 'विवेकभ्रष्टांना भवति विनिपात: शतमुखम्' चिरंजीवी अश्वत्थाम्याच्या जखमेच्या रुपाने हा अध:पात आजही चिरंजीव होऊन झरत आहे. 'बोद्धारो मत्सरग्रस्ता प्रभव: स्मरयदूषिता:'चे द्रोणाचार्य हे एक ज्वलंत उदाहरण आहे.

श्रेष्ठ विचारवंत मात्र समाजाच्या विघटनेची समस्या जेव्हा पाहातात तेव्हा आपल्या 'स्व'चा, स्वकीयांचा विचार करीत नाहीत, ते त्या 'स्व'च्या पलिकडे जातात. त्या विघटनेची विवंचना त्यांना एवढी ग्रासते की त्या समाजविघटनेच्या मागचे मूळ कारण सापडल्याशिवाय ते स्वस्थ राहू शकत नाहीत. मग त्यावर 'मुले कुठार:' न्यायाने शाश्वत मूल्यांवर आधारलेला एखादा नवा युगविचार ते मांडू पाहातात. प्रत्येक युगप्रवर्तनाच्या काळात असे घडते, असे घडत आलेले आहे. वेदकाळ, रामायणकाळ यांच्यावेळी असे घडले आहे. पुढे यज्ञातील बहुल हिंसाचार, पुरोहिताचे वर्चस्व, विविध कर्मकांडांचा बडिवार, विविध दर्शनातील घटपटादि कर्मकांडांचा बडिवार, विविध दर्शनातील घटपटादि वावदूक चर्चा यांनी बावचळलेला समाज अशी स्थिती जैन आणि बौद्ध विचारांच्या उद्‌भवप्रसंगी होती. अशावेळी सामान्य जनांच्या पातळीवर उतरून, त्यांच्याबद्दल अपार कळवळा असल्याने, त्यांच्या समस्या आपल्याच आहेत आणि आपणही त्यांनी गांजलो आहोत, असा सहानुभावाने अनुभव–उमाळा गौतम बुद्धांना आला आणि त्यांनी एक क्रांतिकारी उत्तर आपल्या पीढिकांतून दिले. असाच उमाळा महावीरांना सुद्धा आला होता आणि हिंसाचाराविरुद्ध त्यांनी अहिंसेचा महामान्य आपल्याला दिला. दलितांच्या उत्थानाच्या आणि सामाजिक समतेच्या चळवळीतून बुद्धाच्या संदेशाचेच पुनरुज्जीवन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. तर महात्मा गांधींनी अहिंसेच्या शस्त्रातून नव्या भारताची उभारणी केली. विसाव्या शतकातही या दोन महापुरुषांना बुद्ध आणि महावीरांच्या तत्त्वज्ञानांतून प्रेरणा मिळाली.

युगप्रवर्तन व्हायचे असेल तर विचारवंताने 'स्व'च्या व्यक्तित्वापलीकडे जायला हवे असते. 'बुडती हे जन न देखवे डोळा' आणि त्यांच्या दु:खांनी 'फुटो पाहे प्राण', 'ऐसी कळवळ्याची जाती' असायला हवी. पण स्वार्थ व स्वहिताची कोती जाणीव यांनी द्रोणाचार्यांसारख्या विचारवंतांना ग्रस्त केले की काय होते ते व्यासांनी महाभारतात लिहून ठेवले आहे. आजही सत्ताधाऱ्यांना विकल्या जाणाऱ्या तथाकथित बुद्धिवंतांची अशीच शोकान्तिका होताना आढळते. सत्ताधारी चुकत असले तरी जनसामान्यांच्या कळवळ्याऐवजी, दुरवस्थेच्या फाटल्या आभाळाला थातुरमातुर स्पष्टीकरणांच्या तत्त्वज्ञानाचे ठिगण लावण्याचा असफल प्रयत्न करताना हे असे बुद्धिमंत दिसतात तेव्हा ते फार केविलवाणे वाटतात.

धृतराष्ट्र हा महाभारतकालीन एक महत्त्वाचा माणूस. भारतातले एक मोठे मध्यवर्ती राज्यशकट त्याच्या ताब्यात होते. तो मोठा राजपुत्र, म्हणून राजसिंहासनावर त्याचा अधिकार. पण तो जन्मांध म्हणून तत्कालीन राजनीतीच्या अनुसार पंडू राजा झाला. तो निवर्तल्यावर आपसूकच युधिष्ठिराला गादी मिळणार; पण तो अल्पवशी. म्हणून धृतराष्ट्र हा पालक या नात्याने हा राजसिंहासनाचा प्रतिपालक झाला. धृतराष्ट्र हा राज्याभिषेक न झालेला राज्याचा सर्वेसर्वा अशा रीतीने झाला. तसे पाहिले तर भीष्म व धृतराष्ट्र यांची भूमिका हस्तिनापरच्या राज्यासंबंधात समानच होती. पण भीष्म सदैव केवळ 'रक्षक' याच भूमिकेत एका सल्लागाराच्या जाणिवेने वागलेले दिसतात. तर धृतराष्ट्र आपल्या मुलाबाळांच्या काळजीने सदैव व्यग्र केलेला दिसतो. 'न्याय्येन मार्गेण मही परिपालयन्त:' या वैदिक पद्धतीच्या अनुसार त्याची न्यायबुद्धी असायला हवी होती. पण पुत्रमोह अथवा स्वार्थादि तत्सम कारणांमुळे ती आंधळी झाली आणि एक महाभारत घडले.

धृतराष्ट्र विचारवंत नव्हता का? अंधत्वासारखे शारीरिक अपंगत्व म्हणजे दृष्टीसारख्या एखाद्या इंद्रियाचा अभाव एवढेच नसते; पण अशा परावलंबित्वामुळे त्या माणसाला मानसिक अपंगत्वही येते. त्यातून त्याची मानसिक जडणघडणही बदलून जाते. प्रत्येक बाबतीत दुसऱ्याबद्दल संशय त्याच्या मनात जागा असतो. हा आपली फसवणूक तर करीत नाही ना, अशासारख्या शंकांनी प्रत्यही त्याचे मन पोखरले जात असते. परावलंबित्वामुळे एक न्यूनगंड त्याचा पाठलाग करीत असतो. दुसरा जो सल्ला देईल त्याला त्याचा आणि फक्त त्याचाच स्वार्थ तर नाही ना? त्याच्या मनात कपट तर नाही ना? आजूबाजूचे शकुनीसारखे तोंडपूजेजवळचे वाटतात आणि परखड मत मांडणारे विदुरासारखे

हितकर्ते परके होऊ लागतात. भीष्मकाकांचा कल पंडूच्या पुत्रांकडे आहे; मग आपली बाजू ते सांभाळतील का? अशा आणि यांसारख्या चिंतांनी धृतराष्ट्र दुश्चित झाला आहे. राजपद तो भोगतो आहे; सर्वांवर त्याचे वर्चस्व आहे. तरीपण ते वैध नाही. तो राजा–अभिषिक्त राजा नाही. या गोष्टींची सल त्याच्या मनात आहे. युधिष्ठिर मोठा होईल; त्याला यौवराज्याभिषेक करावाच लागेल. मग हळूहळू आण कुणीही नसू. यासाठी त्याने काय केले; तर मंत्रीगणातील महत्त्वाची माणसे सोडून मंत्रीमंडळातील सहाव्या सातव्या क्रमांकावरील कणिकाचा सल्ला घेतला. आदिपर्वात तो कथाभाग आला असून कणिकाने केलेला कपट–उपदेश 'कणिक नीति' या नावाने प्रसिद्ध आहे. धृतराष्ट्राच्या अधू मनाच्या अवस्थेची गांधारीला फार तीव्र जाणीव झाली असली पाहिजे. म्हणून आपल्या नवऱ्याला आपण कुठे, कोणाकडे, पाहतो, जातो, काय करतो या शंकांनी भंबावून सोडू नये म्हणून तिनेही बिचारीने डोळ्यांवर पट्टी बांधली आणि सदैव बाळंतपणाच्या फेऱ्यांमध्ये स्वत:ला या वृत्तीमुळे अडकवून घेतले. असा हा राजा समतोल विचार काय करणार? कणिकनीतीत सांगितलेले सगळे कपट उपाय पांडवांसाठी वापरले गेलेले आपल्याला दिसतील. प्रजेसहित कोणालाही आश्वासने द्यावीत; पण पूर्ण करू नयेत, झुलवीत ठेवावे, हा उपाय धृराष्ट्राने युधिष्ठिराला युवराज पदाच्या अभिषेकाबाबत वापरला (आदिपर्व अ १४२.८४), भीमाला विषप्रयोग करून डोहात बुडवणे किंवा पांडवांना लाक्षागृहात जाळणे हे उपाय कशिकानेच सांगितले आहेत (आदि अ १४२.१४). वरवर गोड बोलत, सहानुभूती दाखवत प्रहारही करावेत व वरून कळकळीचे उद्‌गार काढावेत ही रीत कणिकानेच धृतराष्ट्राला शिकवली (आदि १४२.८४); युद्ध संपल्यानंतर धृतराष्ट्राने संन्यास घ्यायचा ठरवले पण त्या सर्वपरित्यागाच्या वेळीही त्याचे क्रोध, द्वेष, मत्सर त्याला सोडून गेले नव्हते. भीमाने आपल्या पुत्रांना मारल्याची अढी धृतराष्ट्राने मनी धरली होती; आणि भीमाऐवजी त्याच्या लोखंडी पुतळ्यालाच आंधळेपणाने कवटाळून त्या पुतळ्याचे चूर्ण करून टाकेल अशी राक्षसी सूडबुद्धी संन्यास धारण करते समयीही दाखवावी, या अविचारी तामसीपणाला काय म्हणावे? माणसातल्या अधमाधम विकृतींनाच प्रकृती ठरवून त्यामागील स्वार्थाला एका वैचारिक तत्त्वज्ञानाची बैठक कणिकाने दिली आणि स्वार्थ, अव्वलपोटेपणा, उद्दाम स्वैरपणा यांना प्रतिष्ठा दिली. त्यात माणसांमधली स्वाभाविक सहजतेने उजपणारी उदात्तता, औदार्य, समंजसपणा यांना बावळट निर्बुद्धपणाची पातळी दिली. या गोष्टींना निरुपयोगी टाकाऊ ठरवून कचरापेटीत टाकले. सुसंस्कृत जीवनशैलीच करपून टाकली, महाभारत काळात युद्धपर्व व युद्धोत्तर सामान्य जनजीवनाची जी ससेहोलपट झालेली दिसते त्यावरून हेच सिद्ध होते. हस्तिनापूराच्या परिसरातले कौरव आणि सोन्याच्या द्वारकेच्या परिसरातले यादव यांचा राजकीय प्रभाव साऱ्या भारतातल्या राज्यांवर होता. त्यांच्या राजकीय कारकिर्दीतच ही कीड लागलेली दिसते. कंस, जरासंध, कालयवन यांची उदाहरणे म्हणजे या प्रवृत्तींचा प्रारंभ होता. त्यामुळे कौरवांनी पांडवांचा केलेला दुस्वास व द्वेष या पोटी ही सारी कृत्ये घडली होती व ती नमित्ते संपल्यानंतर सारं काही सुरळीत होणार होते असे नाही. १) श्रमाविना मिळालेली संपत्ती २) त्यातून आलेला सदसद्‌विवेकाविना, अनायासे मिळालेला विलासभोग आणि ३) सर्वांगीण कल्याणाच्या तत्त्वाला पारखी झालेली राजनीती या तीन सामाजिक पातकांची ती परिणती होती. जेव्हा जेव्हा या त्रिदोषांचा उद्‌भव होतो तेव्हा तेव्हा समाज आणि संस्कृतीचे ऱ्हासपर्व सुरू होते असे इतिहास सांगतो. आजच्या समाजालासुद्धा ही धोक्याची घंटा ऐकू यायला पाहिजे.

धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्रावरच्या युद्धातही अधर्म्य वागणुकीची कितीतरी उदाहरणे सापडतात. क्रौर्य म्हणजे शौर्य अशा विकृत व्याख्या तयार होत होत्या. अभिमन्यूचा वध त्याचे उत्तम उदाहरण आहे. चक्रव्यूह भेदून अभिमन्यू केंद्रापाशी आला असताना सारे अतिरथी महारथी असलेल्या काका–मामांनी त्या एकट्यावर एकत्र येऊन हल्ला केलाच; पण तो मेल्यावर त्याच्या कलेवराला लाथ मारली. या क्रौर्यालाच त्यावेळी शौर्य म्हटले गेले; आणि या अशा बांधवांनाच संग्रामात पुढे मृत्यू आला. तेव्हा त्यांना पांडवांनी तीलांजली दिली. या दोन कृत्यांतून संस्कृती आणि अर्वाच्य अदबट विकृती यांतले अंतर कळून चुकते. रणांगणातून पळून जाऊन लपून बसणे आणि सूर्य मावळल्यावर 'जितं मया' अशा आविर्भावाने प्रकट होणे याला जयद्रथी पराक्रम म्हणतात, तर यक्षाने कौरवांना बंदी केले तेव्हा मदतीला धावत जाऊन (क्यं पच्छाधिकंशतम्) आम्ही आहोत एकशे पाच असे युद्धिष्ठिराने म्हणणे याला सांस्कृतिक बंधुभाव म्हणतात. सैरन्ध्री नावाच्या दासीला बळजबरीने नाटकशाळा बनवणे हा सत्ताधारी या नात्याने आपला हक्कच आहे, असे कीचकाने उर्मटपणे बजावले. त्याला दीन दुबळ्यांना छळणे आणि महिलांना केवळ उपभोग्य वस्तू ठरविणे म्हणजे पौरूष गाजवणे, असे वाटत होते. अशी जीवनजीवनमूल्यांची उलथपालथ कौरव व यादव राज्यातच सुरू झाली होती.

चंगळवाद, उपभोगवाद, संपत्तीच्या वैभवाच्या कैफातून जन्मलेला मदोन्मतपणा अशा पायऱ्यांनी अनर्थ परंपरेचा सोपान सत्ताधारी वर्ग भराभरा चढत होता. राजस आणि तामस वृत्तींचा

नंगानाच द्वारकेच्या परिसरात सुरू होता. यादवांमध्ये तर आवडलेली कोणतीही स्त्री उचलून न्यावी आणि मग टाकून द्यावी अशा अनाचाराला ऊत आला होता. ऋषीमुनी, त्यांची प्रवचने, चिंतने, तपश्चर्या या गोष्टी टिंगलीचा विषय बनल्या होत्या. सांबाला गरोदर स्त्रीचे सोंग देण्याच्या मागे ऋषीच्या तपोज्ञानाची टवाळी करणे हाच उद्देश होता. पण असा उद्दामपणा याअगोदर भगिरथापूर्वी सागरमुनींही दाखवला होता. संपन्न, समृद्ध आणि सुरक्षित अशा प्रजेला ना परचक्राची भीती ना दारिद्र्याची धास्ती, ना देवाधर्माचा धाक ! सुखवाद, सुस्थिती आणि सत्ता यांच्या पाठोपाठ येणारा चंगळवाद व वैचारिक कंगालपणा हळूहळू समग्र भारतालाच पोखरायला सुरवात करीत होता. धर्म, अर्थकामादी चार पुरुषार्थाची कर्तव्यपथ्ये विसरून अनाचार, अनीती, अत्याचार व आततायीपणा यांनाच चार पुरुषार्थ समजणाऱ्या उन्मतत्त उद्दामांची धास्ती निर्माण झाली होती. एक प्रकारची निर्णायकी उत्पन्न झाली होती. झुंडशाहीचे राज्य सुरू झाले होते. राज्यकर्तेही हतप्रभ झाले की असे घडत जाते, कृष्णाचे पतन झाल्यावर अर्जुन त्याच्या हजारो स्त्रियांना घेऊन जात असताना अभीरांनी त्याच्यावर धाड घातली. त्याच्या गांडीव धनुष्याचा प्रभाव ओसरला; स्त्रियांना डोळ्यादेखत ओढून गेले आणि या स्त्रियाही स्वखुशीने त्यांच्याबरोबर गेल्या.

साम्राज्याच्या या ऱ्हासपर्वाचे, यादवांच्या यादवीचे चित्रण व्यासांनी आपल्या महाभारतात शेवटी अत्यंत कडवटपणे रंगवले आहे. आपल्याच वंशजांचे चरित्र 'जय' नावाच्या इतिहासात म्हणजेच आजच्या महाभारतात रंगवताना व्यासांसारखा ज्येष्ठ विचारवंतसुद्धा खिन्न, उदास आणि पराभूत झाला. या विषण्ण मनोवस्थेत त्यांनी तळतळून उद्‌गार काढले आहेत की, ''अहो, मी हात उंच उभारून लोकांना हाकारतो आहे, वाहतो आहे; पण माझे कोणीही ऐकूनच घेत नाही. तुम्हाला पैसा पाहिजे आणि कामसुखही हवे आहे ना! मग धर्माने वागा. कारण धर्मापासून पैसा आणि कामनांचे सुख मिळू शकते. मग अधर्माने–अनीतीने का वागता? धर्माचे अनुसेवन का करीत नाही? (ऊर्ध्वबाहू विरोम्येष न च कश्चित श्रृणोति माम्।

धर्मात् अर्थश्च कामश्च। किंनु धर्मानुसेव्यते।।) पण व्यासांचा आक्रोश म्हणजे अरण्यरुदनच ठरले.

''लोक त्यांची इच्छा नसतानासुद्धा पापकृत्यांकडे का वळतात?'' असा एक भाबडा प्रश्न अर्जुनाने गीतेच्या तिसऱ्या अध्यायात विचारला आहे. त्यावर कृष्णाने उत्तर दिले, ''काम एव क्रोध एव रजोगुण–समुद्‌भव:'' काम आणि क्रोध मूलत: एकच आहेत आणि तो काम रजोगुणापासून उद्‌भवतो त्या कामाच्या आहारी माणूस जातो. कामनापुर्ती झाली नाही की क्रोधादि उत्पन्न होतात. ज्ञानी माणूसही तेव्हा चळतो. मग इंद्रिये, मन, बुद्धी अशा चढत्या क्रमाने कामवासना माणसाचे सारे काही ताब्यात घेते आणि त्यामुळे पापकृत्यांचे अनर्थ ओढवतात.'' हे वक्तव्य करताना आपल्याच द्वारकेचे उदाहरण कृष्णाच्या डोळ्यासमोर असेल का?

आयुष्याचे उद्दिष्टच हरवलेली युद्धानंतरची भारतीय प्रजा भकास झाली; आणि अर्थहीन जिणे विसरण्यासाठी ती माणसे बेछूट कामकृत्ये व बेबंद व्यसनांच्या नशेमध्ये राहाण्याचा यत्न करीत सतील का? त्या युद्धात पांडवांना जय मिळाला हे खरे; पण सारा प्रदेश म्हणजे स्मशानभूमी झालेल्या राज्यावर त्यांना स्वामित्व मिळाले. एक उदास आणि विषण्ण राज्य त्या हतभाग्यांना स्वीकारावे लागले. त्या भयानक संहाराच्या अनुभवाने गांगरलेली प्रजा सुन्न व बोथट झाली होती. कुठल्याही सुखाच्या वा दु:खाच्या संवेदनाच माणसे हरवून बसली होती. न्याय मिळवण्यासाठी पांडवांनी युद्ध केले. तर त्यांना काय मिळाले?

जगण्याची दिशा हरवलेला कणाहीन असा गोंधळलेली समाज नावाची प्रजा युधिष्ठिराला शुष्क राज्यासकट मिळाली. त्यांचा उत्साह कसा घटवा, त्यांच्यात प्राण कसे फुंकावेत? उभारी येण्यासाठी कोणती स्वप्ने त्यांना द्यावीत, कुठल्या आदर्शांचे नमुने त्यांच्यासमोर ठेवावेत? हे प्रश्न राज्यकर्त्यांना भेडसावीत होते. जुने आदर्श ढासळलेले आणि कणखर अजिंक्य समजले गेलेले ते थोर–त्यांचेही पाय मातीचे असल्यासारखे झुंझीच्या झंझावातात विरघळून गेलेले पाहाणे नशिबी आले. 'काहीच वेचले नाही, शेवटी हात झाडले' असे तेरा तेरा वर्षांच्या कठोर वनवासी तपाला आलेले हे फळ पांडवांच्या पदरी पडले. कामपिसारांची पिलावळ भुते बनून सर्वत्र थैमान घालत होती. हे सारे कसे आवरायचे, ही आसमंत व्यापून टाकणारी विवंचना विचारवंतांना ग्रासत होती.

कणखर कण्याचा निष्ठावान बुद्धिवंत म्हणून समग्र कुरुवंशातल्या कुणा पुरुषाला सगळ्या भारताने आपला निखळ आदरभाव अर्पण करावा, असा महापुरुष म्हणजे भीष्माचार्य. ज्या पुतणे, नातू यांना स्वत:च्या अंगाखांद्यावर खेळवले, त्यांनीच एकमेकांचा गळा घोटण्यासाठी सज्ज व्हावे, जे राज्य व जो वंश जपावा, वाढावा म्हणून आजन्म नि:स्वार्थी कर्तव्यबुद्धीने आपले आयुष्य समर्पित केले, त्यांच्यातच झालेल्या संघर्षाने तेही उद्विग्नच झाले होते. उत्तरायण सुरू होण्याची वाट पाहत बाणांच्या टोकावर जवळजवळ सहा महिने पडून राहताना त्यांच्या मनात कोणते विचार येत असतील? आपल्या आयुष्याचा आढावा घेताना

कोणकोणत्या भावना त्या चिंतनात त्यांना ग्रासून गेल्या असतील?

युद्धातील भीषण नरसंहार, राज्य म्हणजे बेचिराख झालेला उद्ध्वस्त झालेला मुलुख आणि शून्य मनस्क प्रजा यांच्या वैराण दर्शनाने युधिष्ठिर उदास झाला. असे हे राज्य करावे तरी कसे, या प्रश्नापोटी आधार म्हणून आपल्या शरपंजरी आजोबांकडे गेला. त्यावेळी त्यांनी केलेला उपदेश महाभारताच्या शांतिपर्वात आला आहे. त्या विवेचनाला भीष्मगीता असे नाव आहे. त्यात राजधर्माचा उपदेश आहे. धृतराष्ट्राला कणिकाने सांगितलेले राजधर्माचे उपाय कणिकनीति म्हणून सिद्ध झाले तर हा राजधर्म भीष्मगीता म्हणून प्रसिद्ध झाला. या गीतेवर कृष्णाच्या भगवतगीतेतील अध्यात्म विचारांची थोडीफार छाया आहे. कृष्णगीता युद्धाच्या आरंभी सांगितलेली, तर भीष्मगीता युद्धाच्या नंतर सांगितलेली. या दोन गीतांच्या मधल्या काळात एक भयानक संहार घडून आला आहे. मानवांचाच नव्हे तर मानवतेचाही संहार घडला. घरोघरी पांढऱ्या कपाळाच्या तीन पिढ्यांतील विधवा दिवाभीताचे आयुष्य जगत होत्या. अर्जुनाने व्यक्त केलेले सर्वच अनर्थ खरे ठरले होते.

चारित्र्यहीनता आणि अधर्माचरण हे समाजाचे विघटन करणारे उत्पात ठायी ठायी दिसत होते. दु:ख आणि वेदनांनी घायाळ झालेली, इतके दिवस धृतराष्ट्राच्या राज्यात राहिलेली जनता विजयी पांडवांमुळेच आपल्या नशिबी हे सारे आले. युद्धखोर पांडवांनी हे युद्ध न्याय-अन्यायाचा डांगोरा पिटत साऱ्यांवर लादले आणि बिचारे कौरव मात्र धारातीर्थी पडले. भावांनी राज्य केले असते तर काय बिघडले असते? पण पांडवांची युद्धाची खुमखुमीच आपल्या आजच्या दुर्दैवाला कारण आहे अशी निरवंदना घरोघर होत होती. (शांतिपर्व अ ७) अर्जुनादी भावंडांना या दूषणांचा अनुभव त्या वैराण राज्यात वावरताना घेत होता. अशावेळी धर्मराजादी पांडवांचे शांतवन होईल आणि राखेतून राज्य आणि प्रजा पुन्हा कशी उभी करावी याचे उत्साहवर्धक विवेचन भीष्माचार्यांकडून अपेक्षित होते.

भीष्मगीतेत राजाच्या धर्माचे तात्त्विक विवेचन आहे. चांगल्या आदर्श राजाचे गुणधर्म, मंत्रीमंडळातील मंत्र्यांची कर्तव्ये, राज्यकारभाराचे तात्त्विक विवेचन, गुन्हेगारांना शासन, चार पुरुषार्थ व चार आश्रम यां बाबींचे गेलेले व्यक्तिजीवन, प्रजाजनांमधील समाजाची चातुर्वर्ण्य व्यवस्था व त्या व्यवस्थापासून होणारी समाजाची परस्परावलंबी एकसंध अवस्था इ. गोष्टींचे वर्णन भीष्मांनी केलेल्या उपदेशात आहेत. गुरुगृही असताना सर्वच राजपुत्रांना या बाबींचे शिक्षण त्याकाळी दिले जाई. पांडव या गोष्टी गुरुकुलात शिकले होते. तेव्हा आता या

> “*धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्रावरच्या युद्धातही अधर्म्य वागणुकीची कितीतरी उदाहरणे सापडतात. क्रौर्य म्हणजे शौर्य अशा विकृत व्याख्या तयार होत होत्या. अभिमन्यूचा वध त्याचे उत्तम उदाहरण आहे. चक्रव्यूह भेदून अभिमन्यू केंद्रापाशी आला असताना सारे अतिरथी महारथी असलेल्या काका-मामांनी त्या एकट्यावर एकत्र येऊन हल्ला केलाच; पण तो मेल्यावर त्याच्या कलेवराला लाथ मारली. या क्रौर्यालाच त्यावेळी शौर्य म्हटले गेले; आणि या अशा बांधवांनाच संग्रामात पुढे मृत्यू आला. चंगळवाद, उपभोगवाद, संपत्तीच्या वैभवाच्या कैफातून जन्मलेला मदोन्मतपणा अशा पायऱ्यांनी अनर्थ परंपरेचा सोपान सत्ताधारी वर्ग भराभरा चढत होता.*”

पुस्तकी पांडित्याची त्यांना अपेक्षा नव्हती.

दैनंदिन राज्यकारभारात निव्वळ शिस्तबद्ध शासनाऐवजी लवचिकपणा स्वीकारून प्रजेला दिलासा कसा द्यावा हा प्रश्न धर्मराजादिकांना पडला आहे. कठोर शासकाची नव्हे तर वत्सल प्रजापालक पित्याच्या भूमिकेत कसे वागावे, उच्छंखल उन्मतांना धाक आणि गरीब, गांजलेल्या बहुजनांना विश्वासाचा आधार ही तारेवरची कसरत दररोज घडणाऱ्या घटनांना सामोरे जाताना कशी करावी याचे मार्गदर्शन त्यांना आपल्या आजोबांकडून हवे होते. शरपंजरी पडून उत्तरायणाची वाट पाहणाऱ्या या श्रेष्ठाकडून उदास नातवाला काही उत्साहदायी, प्रेरणादायक दिलासा देणारी वैचारिक शिदोरी मिळत नाही. ते तर असामान्य मगदूराचे असते तर युद्धापूर्वी सांगितलेल्या कृष्णाच्या भगवद्गीतेऐवजी युद्धोत्तर पडझडीवर उपाय सांगणारी भीष्मगीता टिकली असती. अलिकडे दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेले जपान आणि जर्मनी पुन्हा वेगाने आणि निश्चयाने उभे राहिले. जगाला आपल्या प्रगतीने त्यांनी आश्चर्यचकित केले. भीष्मगीतेतून असा इतिहास घडलेला नाही. त्याऐवजी शांतिपर्वातली ही भीष्मगीता आज ध्यानातही येत नाही असे का झाले?

आपल्या नातवांचा विषाद, वैराग्य आणि उदासमनस्कता या साऱ्या गोष्टी त्या आजोबांना कळल्या आहेत. त्यामागची कारणेही समजली आहेत. आपल्याकडून संवेदनशील कारणेही समजली आहेत. आपल्याकडून संवेदनशील उत्तराची अपेक्षा आहे. याचीही

जाण त्यांना आहे. आपलेच नातू किंकर्तव्यमूट होऊन आलेले असताना पराक्रम अथवा मोक्षपर तत्त्वज्ञान येथे उपयोगी नाही; त्याऐवजी आतून उत्स्फूर्तपणे आलेली भूतमात्रांसंबंधीची कळकळच मार्ग दाखवू शकते असे समजूतदार प्रौढ भान भीष्माचार्यांना का येऊ नये? या प्रश्नाचा पाठपुरावा करू लागलो की त्यांच्या एकंदरच जीवनाविषयीच्या दृष्टिकोनावर प्रकाश पडू शकतो.

पराक्रम, प्रतिज्ञा आणि पालकत्व यांची झापडे आपल्या कर्तृत्वाला आणि अनुभवविश्वाला त्यांनी लावून घेतली होती. प्रथम शंतनू राजे उसन्या घेतलेल्या तारुण्यात कामक्रीडेतच मग्न होते. म्हणून राज्याचा प्रतिपाळ त्यावेळच्या तरुण भीष्माला करावा लागला. नंतर विचित्रवीर्य शृंगारात बुडालेला म्हणून, त्यानंतर पंडूचा मृत्यू व धृतराष्ट्राचे अंधत्व यामुळे राज्याचे परिरक्षण व प्रतिपालन करण्याचे उत्तरदायित्व प्रौढ होत जाणाऱ्या भीष्माने स्वीकारले. या सर्व घटनांनी त्यांचे विचारविश्व व अनुभवविश्व बांधले गेले. सारे आयुष्य राजदरबाराच्या परिपालन व परिरक्षण क्षेत्रात गुंतून पडले, परिसीमित झाले, त्यांचा अप्रतिहत पराक्रम तर सर्वमान्य पूर्वीपासूनच होता. म्हणून तर आपल्या सैन्याचे सेनापतिपद त्यांनीच शेवटपर्यंत स्वीकारावे असा दुर्योधनाचा आग्रह होता. शिवाय राज्यपरिरक्षणाची जबाबदारी टाळता येत नव्हती. त्यामुळे कुरुक्षेत्रावरील युद्धात त्यांना तटस्थ राहाताही येईना. वडिलांपासून, भाऊ, पुतणे यांच्यापर्यंत तीन पिढ्या ख्यालीखुशालीत बुडालेल्या असताना व राजवैभव आजूबाजूला हाका मारीत असताना व्रतस्थ व विरक्त जीवन जगणाऱ्या भीष्माने आजन्म ब्रह्मचर्यपालन आणि राजगादीवरील अधिकाराचा त्याग या भीष्म म्हणजे भयंकर प्रतिज्ञेतील कडक पर्यायहीन व्रताचे पालन अखेरपर्यंत अबाधित ठेवले. पण ही त्यांची वैशिष्ट्येच त्यांच्या अनुभवविश्वाच्या मर्यादा बनल्या. त्यांच्या विचारविश्वाचा परीघ सीमितच राहिला.

अंबा, अंबिका आणि अबालिका यांच्या अपहरणाचा पराक्रम त्यांच्याबाबतीत निष्फळच ठरला आणि शिखंडीच्या जन्माद्वारे त्याच्यासारख्या इच्छामरणी वीराच्या मृत्यूची नांदी सुरू झाली. व्यासांकडून निपलेल्या संततीमध्ये व्यंगे होती आणि कर्तव्यबुद्धीने कौरवांच्या बाजूचे सेनापतिपद स्वीकारे तरी सहानुभूती पांडवांबद्दल आणि न्यायत: राज्यावर हक्क पांडवांचाच अशी आतून भूमिका– असा अन्तर्विरोध भीष्मांच्या व्यक्तित्वात सदैव आढळतो. प्रज्ञावंत तरी ते आहेतच, प्रज्ञेने दिलेला निर्णय प्रत्यक्षात आणण्याचे दृढ निश्चयी सामर्थ्यही त्यांच्याजवळ आहे. युद्धपूर्व व युद्धोत्तर समाजाच्या अनैतिक व मूल्यहीन अवस्थेतून जन्माला आलेल्या समस्याही त्यांना कळल्या आहेत; पण प्रतिज्ञा पराक्रम आणि राज्याशी असलेली निष्ठा यांच्या जोखडात ते अडकून पडले. द्रोणाचार्य पुत्रप्रेमाच्या आणि सुडबुद्धीच्या जोखडातून बाहेर न पडल्यामुळे कोणकोणत्या आरिष्टांनी द्रोणाचार्यांना व त्यांच्या अश्वत्थाम्यालाही सर्वनाशाकडे नेले हे सर्वांना माहीतच आहे. सूडबुद्धी काय किंवा प्रतिज्ञापालन काय; या गोष्टी ज्या संदर्भात स्वीकारल्या होत्या त्या आता नंतरच्या काळात, बदलत्या परिस्थितीत अर्थहीन ठरत आहेत, याकडे लक्ष न देता हे दोन्ही महापुरुष आपापली जोखडे करुवाळत राहिले.

विचारवंतांच्या व्यक्तित्वावर परिणाम करणारी अशी जोखडे त्यांच्या त्यांच्या आयुष्यात अनेकदा तयार होत असतात. त्या त्यांच्या हळव्या जागा असतात. त्यांना स्पर्श झाला की जागा भळभळू लागतात. मग त्यांच्यासाठी वेगळा न्याय, वेगळी स्पष्टीकरणे, वेगळी कारणमीमांसा शोधली जाते. यामुळे एखाद्या समस्येवरील तटस्थ, सांगोपांग व दूरगामी विचारप्रक्रियेत खंड पडतो. मूळच्या विवंचनेत आणखी वेगळ्या घटकांचा समावेश होत जाऊन मूळच्या विवंचना अधिकच गुंतागुंतीची होते. उत्तरे जटिल बनतात, उत्तरे भलतीकडेच वाहात जातात. अश्वत्थाम्याने पांडवांची मुले रात्रीत ती झोपेत असताना मारणे, ब्रह्मास्त्राचा वापर करणे ही उत्तरे अशीच बहकलेली आहेत. माणसामाणसांच्या सहवासातून उत्पन्न झालेल्या अलवार नाजुक भावबंधांना बळी पडल्याने, रक्ताच्या नात्याचा विसर करून न दिल्याने, किंवा एखाद्या तत्त्वाला अमानुष कडकपणे कवटाळून बसल्याने तर एखाद्या घेतलेल्या व्रताची जन्मभर पर्यायहीन जपणूक करीत राहिल्याने विचारवंतांना समस्या कळलेल्या असूनही, सांगोपांग विचारला या जोखडांची मर्यादा पडल्याने योग्य उत्तर सापडू शकत नाही.


पण द्रोणाचार्य किंवा भीष्माचार्य हे जन्मभर कवटाळून बसलेल्या पर्यायहीन अशा आपल्या कडक अपरिवर्तनशीलतेचे हे परिणाम म्हणावे तर कृष्णाच्या व्यवहारकुशल लवचिकतेचे अंतिम फलित तरी कोणते निपजले? 'न धरी शस्त्र करी मी' अशी कृष्णप्रतिज्ञा त्याने स्वतच मोडली हा असा व्यवहारी लवचिकपणा 'नरो वा कुजरो वा' चा सल्ला देणे किंवा शिखंडीला पुढे करून भीष्माच्या पाठीवर बाण सोडणे हाही धर्मयुद्ध व अधर्म्ययुद्ध या बाबतीतला लवचिकपणाच. दुर्योधनाला मारण्यासाठी स्वत:च्या मांडीवर थाप मारून तेथे घाव घालण्याचे दिग्दर्शन करणे किंवा रथचक्र पृथ्वीने गिळले असता कर्णाचा वध करण्यास अर्जुनाला सुचवणे या सर्व आणि इतरत्रही अनेक वेळी सूक्तासूक्ततेचा विधिनिषेध व बाळगता कृष्णाने फक्त अंतिम

फलित हेच लक्ष्य ठरवले होते. साध्यसाधनशुचितेपेक्षा 'विनाशायच दुष्कृताम्' असे खलनिग्रहण हेच अंतिम फलित त्याने स्वीकारले होते. किंबहुना अंतिम सत्याची कृष्णाची व्याख्याच वेगळी आहे. 'तत् सत्यं यत् सर्वूतहितेरतं' असे कृष्ण सांगतो. या सर्व खटाटोपाचा इत्यर्थ काय निघाला याचा शोध घ्यायला पाहिजे. समुद्रातून स्वतःच उत्पन्न केलेल्या सोन्याच्या द्वारकेचा आणि अभिनव गणराज्य पद्धतीचा त्यातील प्रजेसकट स्वतःचे नातू, पणतू, राजस्त्रिया या साऱ्यांचा विनाश स्वतःच्या डोळ्यांसमोर आपल्या अंतसमयी त्याला पाहावा लागला. हाच तो इत्यर्थ हाता काय?

ग्रीक पुराराणातल्या 'अचिलिज हिल'सारख्या किंवा दुर्योधनाच्या अक्षत शरिरावर माझ्यासारख्या जागा या शबल राहाव्या अथवा कृष्णाच्या तळपावलावर हरणाच्या डोळ्याएवढी जन्मखूण अशा गोष्टी विचारवंतांच्या आयुष्यभराच्या दीर्घोद्योगांना विफलतेकडे कशा बरे घेऊन जातात? पण भारती युद्धाच्या अंतीच्या विफलता या एकट्या दुकट्याच्या आयुष्यातील नव्हत्या. त्या समग्र भारतीय समाजावर परिणाम करणाऱ्या होत्या. जनसामान्य अंधारात चाचपडत होते आणि विचारवंतही समोरच्या काळोखाला सामोरे जात उदास नैराश्याला शरण गेले. केवढा भयावह युगान्त हा !

प्रत्येक व्यक्ती किंवा व्यक्तिसमूह म्हणजे समाज किंवा एखादी संस्कृतीसारखी संस्था या साऱ्यांच्या बाबतीत जनम-मरणाचे फेरे सुरूच असतात. अस्ति, जायते, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, नश्यतेच या सहा अवस्थांमधून प्रत्येक सजीव-मग तो माणूस, समाज, संस्कृती किंवा एखादी संकल्पना असा-जातच असतो. कालांतराने एखाद्या गोष्टीतली ऊर्जा,चैतन्य हरपत जाते, क्षीण होत होत कालसंगतीशी विपरीत होते आणि शेवटी विलीन पावते. भारती युद्धापर्यंतच्या भारतीय जीवन प्रणालीची, नवनवे विचार देण्याची शक्ती कमी होत गेली, नव्या परिस्थितीतल्या आव्हानांना नवे उत्तर देण्याची क्षमता नाहीशी झाली होती. त्यामुळे ही जीवनप्रणाली नव्या काळात नैसर्गिकरीत्याच विलीन पावली काय? तसे झालेले दिसत नाही. या सरत्या युगाचे चैतन्य क्षीणत्वाकडे झुकले असले तरी प्रामुख्याने ते विकृतीकडे झुकले होते. मूल्ये होतीच पण ती उफराटी होत होती. त्यामुळे यापूर्वी भारतात घडले होते तशी जीवनप्रणालीने आणीबाणीच्या प्रसंगी कात टाकून देऊन नव्या चैतन्य तेजाने सळसळणे, यावेळी घडणे शक्य नव्हते. या चैतन्य, मूल्ये, ऊर्जा, विचारप्रणाली, तत्त्वे इ. साऱ्यांना कुरुक्षेत्रावरच्या भारती युद्धाने जोरदार धक्का दिला. अठरा दिवसात अठरा अक्षौहिणी सैन्य नष्ट झाले. बाजारबुणगे, सैन्यास मदत करणारे, पाणी, रसंद, औषधे पुरवणारे व चिलखते, रथ, तलवारी दुरुस्त करणारे, हत्यारांचे निर्माते इत्यादींची बेरीज केली तर जवळजवळ ४३ लाखांपर्यंत संख्या जाते असे जाणकारांचे गणित आहे. ते सारे अतिशयोक्त संख्यावर्णन आहे असे समजलो, तरी भारताच्या तीन पिढ्या कुरुक्षेत्रावर कामी आल्या, असा निष्कर्ष निघू शकतो. सरत्या संस्कृतीवर केवळ अठरा दिवसात पडलेला मोठाच घाला होता. सारी प्रस्थापित व्यवस्था अकस्मात कोलमडून पडली होती. ती जागा भरून काढणारे नवे चैतन्य कुठेच दिसत नव्हते. अशी ही या ऱ्हासपर्वाची शोकान्तिका होती.

कणिकनीति, भीष्मगीता, हंसगीता, पाराशरगीता किंवा कृष्णाने शेवटच्या प्रयाणप्रसंगी सांगितलेली उद्धवगीता या युद्धातील संहाराच्या ज्वालामुखीतून निर्माण झालेल्या त्सुनामीमध्ये वाहून गेल्या. कृष्णाची श्रीमत् भगवतगीता तेवढी नाव घेण्यासाठी फक्त उरली. माणसाच्या ऐहिक व पारमर्थिक जीवनाची धुरा सांभाळण्याचे व्रत गीतेने घेतले आहे. अर्जुनाचे निमित्त करून एका आदर्श जीवनपद्धतीचा आराखडी कृष्णाने आपल्या काळात गीतेच्या रुपाने भारतीयांसाठी काढण्याचा यत्न केला आहे. अंतिम ज्ञान म्हणजेच 'सत्य' मिळवण्याचे व ते प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचे त्या काळात जे मार्ग सांगितले जात होते, त्यांच्या समन्वयाचा गीतेत यत्न केला आहे. ज्ञानमार्ग, संन्यासमार्ग, कर्मयोग मार्ग, भक्तीमार्ग यांपैकी जे स्वीकाराल त्याद्वारे इंद्रियांवर ताबा मिळवायचा आणि आसक्तीविहिन जगायचे. मात्र तेव्हाही ऐहिक आणि पारमार्थिक कर्तव्यकर्मे म्हणजे विहित कर्मे निरिच्छिपणे करीत करीत शेवटी नैष्कर्म्यापर्यंत जाणे म्हणजेच मोक्ष. मोक्ष ही व्यक्तिगत बाब आहे. चार पुरुषार्थातला तो शिखरस्थ पुरुषार्थ. त्यामुळे त्याला सामाजिक संदर्भ नाही. असे असले तरी या पारंपरिक मोक्षसंकल्पनेत गीतेची भर म्हणजे त्यात आलेले सामाजिक तत्त्व. जनकराजाने सिद्धावस्थेस पोचल्यावरही लोकसंग्रह केला. लोकतत्त्वाला जनकराजा विसरला नाही. मोक्षार्थी साधकानेही तसे करायला पाहिजे. त्यासाठी साधक सिद्ध-अवस्थेस पोचला तरी त्याने विहितकर्मे टाकून देऊ नयेत. आपल्या जीवनक्रमाचा आदर्श इतरेजनांना द्यावा, हे त्याचे नंतरचे कर्तव्य होय. कारण आपण जसे वागू तसे इतरेजन वागतात (यद् यद् आचरति श्रेष्ठ; तत् तत् एव इतरोजन:।) गीता अ ३-३१ ही ती सामाजिक बांधिलकी गीतेने मोक्षमार्गावरच्या कापडींना दिली आहे. अज्ञ जनांना ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या। हे न झेपणारे तत्त्वज्ञान सांगून द्विधा मनोऽवस्थेत पाडू नये. जनसामान्य सत्त्व, रज, तमात्मक प्रकृतीचे असतात. संसार, प्रपंच त्यातील



*सामान्य जनांनाही गीतेतील तत्त्वज्ञानात्मक जीवनविवेचनाऐवजी त्या तत्त्वज्ञानाचे आचरण ज्यात आहे अशा भक्तकथांची मोहिनी पडली.*

जबाबदाऱ्या त्यातून मिळणारे सुख–दु:ख, हर्ष–अमर्षादि विकार यात ते गढलेले असतात. त्यात त्यांना रस असतो. बायका मुले प्रपंच या गोष्टी, हे आपण उभे केलेले जग मिथ्या, अर्थहीन आहे असे सांगितल्यामुळे संसार करताना, त्यातील विहितकर्मे सोडवत नाहीत व करवतही नाही अशी एक अपराधी भावना त्यांच्या मनात जागी राहील व धड मोक्ष नाही, धड संसार नाही अशी अवस्था होईल म्हणून त्यांना न झेपणारे तत्त्वज्ञान सांगून त्यांचा बुद्धिभेद करू नये (न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानाम् गीता ३–२६ उलट रोजचीच वहित कर्मे शास्त्रशुद्ध पद्धतीने कशी करावीत व जसे करताना त्यांपासून निरासक्त, निर्लेप व मनाने विरक्त होऊन क्रमाक्रमाने नैष्कर्म्याकडे कसे जावे याचा आदर्श स्वत:च्या वर्तनाने त्यांना दाखवून द्यावा, हे मुक्त आत्म्याचे सामाजिक कर्तव्ये असल्याचे गीतेत म्हटले आहे. हे गीतेचे पारंपरिक अध्यात्म विचारास दिलेले योगदान. परंतु तत्त्ववेत्यांमध्ये मात्र गीतेचे प्रतिपाद्य काय यावर हमरीतुमरीपर्यंत हिरीरीने वाद होत राहिले. त्यांच्यामुळे गीतेतील प्रतिपाद्य जटिल बनले. भगवत्‌गीता हा मूठभर विद्वानांचा चर्चाविषय तेवढा झाला. भगवत् गीतेबद्दल जनसामान्यात आजही आदर आहे. पण ती त्यांच्यात वाचली जात नाही. अशा रीतीने ती त्यांच्यापासून अनेक मैल दूरच राहिली.

**तत्त्वज्ञानाचे आचरण**

खुद्द व्यासांना सुद्धा समग्र महाभारत लिहूनही मनाची शांती मिळेना. चिरंजीवींच्या यादीतील तिसऱ्या क्रमांकाचे व्यासमुनी समाजाच्या ऱ्हासाचे हे दुर्दैवी दशावतार पाहून व्यथित होत होते. पाहता पाहता त्यांच्यासमोर तीनचार पिढ्या विलय पावत होत्या. आपल्या पुढ्यातील या पिढ्यांच्या विनाशाचा इतिहास लिहिताना त्यांचेही मन विदीर्ण झाले. एक भकास ज्वालामुखीच जणू आसमंत जाळून पोळून टाकत होता. पण त्याचवेळी कालपुरुष पृथ्वीच्या पाटीवर एक अघटित लिहीत होता. त्या ज्वालामुखीच्या तोंडावर एखादे नाजुक तृष्णपुष्प उमलावे आणि वाऱ्यावर डुलत राहावे, तसे ज्वालामुखीच्या राखेतून एक चैतन्य आकार घेत होते. एक नवी पिढी जन्म घेत होती. या नव्या आविष्काराची जिजीविषा प्रबळ होती. एक नवे चैतन्य नव्या तरुण पिढीच्या रुपाने साकारत हाते. नव्या उमेदी, नवी स्वप्ने, नवे जग यांची चाहूल चाचपडत प्रकट होत होती. अशावेळी मन:शांतीसाठी व्यासांनी पुन्हा लेखणी हाती घेतली. लिहायला सुरुवात केली –''श्रीमत् भागवत'' कृष्णाचे चरित्र.

समग्र महाभारतात भगवत् गीतेपूर्वी कृष्णाला 'भगवान' असे कुठेही म्हटलेले नाही. गीतेमध्ये मात्र भगवान उवाच असा उल्लेख आलेला आहे. कृष्णाची वक्तव्ये म्हणजे प्रत्यक्ष ईश्वराची वचने अशी ग्वाही देण्यास तेथून प्रारंभ झालेला दिसतो. त्या अगोदर अर्जुनादिकांप्रमाणेच एक कर्तृत्ववान पराक्रमी पुरुष, एक मुत्सद्दी पुरुष अशीच त्याच प्रतिमा आहे. गवळ्याचे पोर अशा अवहेलनांचाही तो विषय कधीतरी झाला आहे आणि यज्ञातील अग्रपूजेचा मान कृष्णाला देण्यास त्याच्या नातेवाईकांनीच वाद घातले आहेत. पण गीतेच्या चौथ्या अध्यायात कृष्णाच्या तोंडूनच आपण परमेश्वरावतार असल्याचे घोषित केले ओ (गीता अ४.६) शिवाय दहाव्या व अकराव्या अध्यायात त्याची म्हणजे परमेश्वराची विभूतीरूपात्मक व उग्ररूपेही अनुक्रमे व्यक्त केली आहेत. 'जन्म कर्मच मे दिव्यम्' (गीता अ ४.९) असे कृष्णाच्या तोंडूनच स्पष्टीकरण दिले आहे. शिवाय आपले हे ईश्वररूप न समजणाऱ्या आणि आपल्याला इतर सामान्य माणसांप्रमाणेच मानणाऱ्या लोकांना'सर्वज्ञानविमूढ' (गीता अ३.२) आणि योगमायेत लपलेल्या 'आपल्या देवत्वाला' न कळणाऱ्या अज्ञजनांना (गीता अ ७.२५) मूर्खअज्ञानी अशी स्वत: कृष्णानेच संभावना केली आहे. अशा स्थितीत महाभारत लिहिण्याने आलेला विषण्णपणा घालवण्यासाठी मन:शांतीसाठी कृष्णाचे मानवी आणि अतिमानवी असे दिव्यरूप श्रीमत् भागवताद्वारे व्यक्त करण्यास सुरवात केली. व्यासमुनींना भावलेले आकळलेले कृष्णाचे व्यक्तिमत्त्व या चरित्रकथेतून मांडले आहे. त्याची जन्मकथा, बाळपणीचे लडिवाळ रूप त्याच्या बालपणाबद्दलचा इतरांना वाटणारा वत्सलभाव, त्याने केलेल्या गोपींच्या छेडछाडी, त्याच्या रासक्रीडा या साऱ्यांनाच कोडकौतुकाचे कोंदण आहे. त्याने

केलेली अचाट कृत्ये, त्याने केलेल्या भगवत्भक्त रक्षणाचे प्रसंग यांच्या लेखनाने हळूहळू व्यासांचे स्वास्थ्य परत येऊ लागले. सामान्य जनांनाही गीतेतील तत्त्वज्ञानात्मक जीवनविवेचनाऐवजी त्या तत्त्वज्ञानाचे आचरण ज्यात आहे अशा भक्तकथांची मोहिनी पडली. कारण हे भक्त म्हणजे हाडामासांची माणसे होती. संसारातल्या त्रिविध तापांनी इतरेजनांप्रमाणेच ही भक्त मंडळी पोळली होती.

संसार असार आहे, ब्रह्म तेवढे सत्य या वादामुळे संसार करता निर्माण होणारी अपराधी भावना भक्तीच्या भावचिंब रसाळपणामुळे नाहीशी होत होती. गृहस्थाश्रमीची सारी कृत्ये ईश्वरार्पण बुद्धीने करावीत या विचारसरणीने सांसारिकांना एक बळ मिळाले. भक्तीचे नऊ प्रकार ज्याच्या त्याच्या वृत्तीला अनुसरून स्वीकारले गेले. भक्ती हा एक व्यक्तिगत उपचार तर होताच; पण त्याला सार्वजनिक आधारही मिळू लागला. कीर्तन, भजन, कथापठण, मनन, चिंतन, पूजन, नामस्मरण आदि उपचार सार्वजनिक ठिकाणी एकत्रितरीत्या होऊ लागले. त्यासाठी गावोगाव मंदिरांची उभारणी झाली. यात्रा, उत्सव, मेळे यांनी सामाजिक जीवन गजबजू लागले. मंदिरांच्या प्रांगणात शिल्प, चित्र, नाट्य, नृत्य आदि कलांच्या द्वारे देवकथा उलगडू लागल्या. मंदिरे ही पुराण श्रवण, प्रवचन, भजन–गायने यांच्या निमित्ताने गावकरी एकत्र जमण्याची स्थळे बनली. ती गावोगावची सांस्कृतिक केंद्रे झाली. भारतीय युद्धोत्तर आलेला जीवनातील भकास, रणरणता वैराणपणा हळूहळू कमी होत होता. जगण्याच्या मागे एक नवे रसरसते चैतन्य उभे राहात होते. जिजीविषा पुन:जीव धरू लागली होती. आणि हे सारे कुणा एकाच्या नेतृत्वाखाली होत होते असे नव्हे. समाजातील सामान्यांच्या जगण्यातून आकार घेत होते. भक्ती नावाचा एक नवा युगधर्म महाभारत काळाच्या अंतसमयी त्या दग्धभूमीत अंकुरत होता. त्याचे हे धुमारे जीवनाच्या भावना, कल्पना, विचार, संवेदना या साऱ्याच पैलूंना सजीवपणा देत होते. मरगळीची धूळ झटकली जात होती. जीवन जगण्याच्या मागे एक बळवंत, सशक्त आणि सक्षम उद्दिष्ट, प्रयोजन उभे राहात होते. त्यातून एक नवी स्फूर्ती, ईर्ष्या जागी होत होती.

श्रीव्यासांनी लिहिलेले श्रीमत् भागवत किंवा अठरापुराणे हे त्याचेच आविष्कार होत. पुढे हरिवंशातही भक्तीच्या आणि भक्तांच्या कथांनाच प्राधान्य मिळाले. देवाची स्तुतिस्तोस्त्रे, आरत्या, आख्याने यांचा उदय झाला. ऱ्हासपर्व संपून एक भक्तीयुग नावाचे नवे दालन उघडले जात होते.

**– प्रा. चंद्रकांत आडावदकर**
५ कैवल्य, शास्त्रीनगर हौ.सोसायटी, इंदिरानगर, नाशिक
मोबा. ९९२२२१२६८८

महाराष्ट्र गांधी स्मारक निधीने प्रकाशित केलेली गांधी विचारावरील पुस्तके जुन्या अल्प किमतीत उपलब्ध. २५ पुस्तकांची एकूण किंमत रु. १२३१/– सर्व ग्रंथांचा एकत्रित संच केवळ रु. १०००/– मध्ये उपलब्ध.

**ग्रंथांचा तपशील :**

१. जीवनदर्शन
२. जीवनसाधना
३. सत्याग्रह विचार
४. सत्याग्रहाची जन्मकथा
५. हरिजन
६. ग्रामस्वराज्य
७. जातीय ऐक्य
८. शिक्षण विचार
९. राजकारण
१०. अर्थकारण
११. सत्याग्रहाचे प्रयोग
१२. स्वराज्य सत्याग्रह
१३. धर्मविचार भाग–१
१४. धर्मविचार भाग–२
१५. अहिंसाविचार
१६. गांधी चारित्रेरेखा
१७. पत्रगुच्छ
१८. चित्रे व चरित्रे
१९. गांधी प्रोफाईल्स ऑफ महात्मा
२०. गांधी विचार मीमांसा
२१. सर्वधर्म समभाव सामाजिक समता
२२. महात्मा गांधींचे विविध दर्शन
२३. ग्रामसफाई व ग्रामक्रांतीची सुरुवात
२४. ग्रामक्रांतीची दिशा
२५. दैनंदिन विचार

पत्ता : महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, गांधीभवन, कोथरूड, पुणे ४११०३८
फोन : (०२०) २५३८५०९१ E-mail : mgsnidhi@gmail.com

## कविता

### ओळख



निसर्ग चेहरा देतो
ओळख नव्हे !
माणूस ओळख कमवतो
रंगरूप नव्हे !

रंगरुपाला भाळणाऱ्यांनो..
जे आपण कमावलंच नाही
त्यात कसला आलाय अभिमान?
ओळख कमवण्यासाठी झटणाऱ्यांनाच
मिळत असतो तो तेज स्वाभिमान!

चेहऱ्यावर सुरकुत्या येतील
कोमेजून जाईल रूप
पण जे अनादी राहील
ते असंच तुमच्या कार्याचं स्वरूप !

ओळखेलाच चेहरा बनवा मित्रांनो..
निसर्गाने दिली तरीही
देणगी ही देणगीच असते
मावलेल्या ओळखीचे मात्र
मरणानंतरही अस्तित्व दिसते

चेहरा तर मृताला ही असतो
जिवंतपणा हा
रंगरूपात नाही
तर तुम्ही केलेल्या कार्यात असतो.

**– स्नेहल मिरगणे**
८०४ अ–१०, करिष्मा सोसायटी,
कर्वे रोड, पुणे ४११००४
मोबा. ९६२३१९९४५३


### भिंत

भिंत आहे का तुझ्या माझ्यात?
नको चाचपडू दिसायची नाही ती
साध्या दगड विटांची नाहीच ती

पाया खूप भक्कम आहे ति
आणि खूप खोल
कित्येक शतके खोल

चांगला भरलाय तो गच
धर्माच्या विटांनी
परंपरेच्या दगडांनी

विटा तशा ठिसूळ ह्या
नीट भाजल्या नाहीत
भट्टी काही जमली नाही



पण इतक्या ठासून भरल्यात की
धरणीकंप झाला तरीही
टिचभरसुद्धा हलायच्या नाही

खूप काळजीने लिंपलीये भिंत
आधी शेंड्यादाढ्यांनी
आता खुर्ची वरल्या टोप्यांनी

कित्येकदा फासलेय रंग
कधी गडद हिरवा
कधी भडक भगवा

ओलावाही कधी धरायची नाही
आणि पडले पोपडे कधी
तरी लिंपायला आहे न खादी

कधी पडलीच तिला भगदाडे?
असं म्हणतात
चार भिंतीचं घर होतं
साऱ्यांना सामावून घेतं

पण नकोच ते
ही एकच भिंत बरी
अदृश्य पण अभेद्य खरी
तुझ्यामाझ्यात
माणसामाणसांत बांधलेली

**– सोनाली काळे**
सिद्धिविनायक अपार्टमेंट, दादावाडी,
स्वारगेट, पुणे ४११०४२
मोबा. ९४०४५३७३१०

## ज्याला कान आहेत तो ऐका

नंतर गुरुजी
आम्हाला म्हणाले
तुम्ही इतके अप्पलपोटे, दुष्ट, कारस्थानी
असूनही
तुमच्या मुलाने भाकरी मागितली
तर त्याला धोंडा देता का?
हे ऐकून आम्ही आमच्या
हातातले दगड गुरुजीवर भिरकावून दिले
आणि आमच्या गावातून गुरुजीला
हद्दपार केले

नंतर गुरुजी नवीन गावात गेले
कसे कुणास ठाऊक
यादेखील गावात आम्हीच होतो
आम्हाला पाहून गुरुजी म्हणाले
तुम्ही म्हणजे सडलेल्या कबरा आहात
तुमच्या दुर्गंधीने दुनियेचं पर्यावरण नासून गेलंय
हे ऐकून आम्ही नागासारखे धावून गेलो
गुरुजी कसेबसे निसटले
नंतर आम्ही कबरा खणायचं कंत्राटच घेतलं.

गुरुजी देवळात आले
ते देऊळही आमच्याच मालकीचं होतं
देऊळ हेच तर
आमच्या पोटापाण्याचं साधन होतं एकमेव
देवळावरच मस्त चाललेलं आयुष्य आमचं
गुरुजींनी हाती चाबूक घेतला
आणि मोडून तोडून टाकली
नीट बसलेली घडी
क्षणार्धात घडलं सारं
तीक्ष्ण हत्यारानिशी आम्ही
गेलो धावत
आणि यावेळी देखील
गुरुजी निसटले
सही सलामत.

ती बाई कुलटाच होती
जन्मणारी प्रत्येक बाई पापीच असते
अशी आमची पक्की धारणा आहे
अजाण बालिका ते गलीतगात्र वृद्धा
कशातच करीत नाही आम्ही भेद
आम्ही रिंगण करून चेंदामेंदाच
करणार होतो बाईचा
तर, गुरुजी आले आमच्या गावात
आणि एका बाईचा प्राण वाचला
गर्भातच बाईचा खून करणारे आम्ही
आम्हाला रोखणार कसे गुरुजी?

लोटली असतील दोनेक हजार वर्षे
आम्ही गुरुजीलाच
आहोत शोधत
आम्हाला खात्री आहे
एक दिवस
आमच्या सापळ्यात अडकेलच गुरुजी.
तेव्हा आम्हीच करू त्याचा निवाडा
तुर्तास तुम्हाला कळकळीची विनंती ही की
दिसलेच गुरुजी कुठे
तर आमच्याशी
संपर्क साधावा तत्काळ
आमचा पत्ता ठाऊकच आहे तुम्हाला
गुरुजींचं वर्णन करायची आहे का
आवश्यता?
नसावी बहुधा
तरीही ओळखीची खुण एवढीच की
आपलं व्यवस्थित चाललेलं असताना
एखादा येऊन आपल्याला
सैतानाची पिलावळ म्हणत असेल
आपला दिवसरात्र देवळात मुक्काम असूनही
आपलयाला चाबकाने फोडून काढत असेल
आपल्या हजार पिढ्यांचा उद्धार करीत
भर बाजारात आपली वस्त्रं उतरवत असेल
वेश्या, दारूडे, विधवा, भिकारी
यांच्या सोबत एका गावातून दुसऱ्या गावात
भटकत असेल
समजावे की तोच आहे गुरुजी.

**– सायमन मार्टिन**
सुवार्ता, जीवनदर्शन केंद्र, गिरीज, वसई,
जि. ठाणे ४०१२०१
मोबा. ९४२१५४९६६६

## नव्या वाटेने

आयुष्यात ज्या वाटेवर मला
जायचे नव्हते
तीच वाट माझ्या वाट्याला
आली

मी अंधारातून प्रकाशाकडे
चाललो आहे
जे भोग भोगावे लागतात
ते भोग भोगतो आहे

पण मी तत्त्वाने, विचाराने
निर्धाराने चालत दांभिक जगाला
विद्रोहाचा प्रकाश देणारी मशाल
पेटवतो आहे

मी स्वत:च रक्तबंबाळ करणारी
पाऊलवाट तुडवतो आहे

माझ्या पोटाच्या गोळ्यास
स्वाभिमानानं जगण्यासाठी
हिंमत देत आधारवड झालो आहे

परंपरा, प्रतिष्ठा यांची जळमाटं
जाळून मी पुढे झालो आहे
सभ्यतेच्या, संस्काराच्या झुली
पांघरून मिरवणाऱ्या
गांजलेल्या मनोवृत्तीस विद्रोहाच्या
अग्नीत जाळतो आहे

नातीला देखील मी
तिच्या मन मस्तक अन मेंदूला
समर्थ करतो आहे

हे सर्व करताना इज्जत, अब्रु
यांना बळी पडलो नाही
मी माझी सहचारिणी
माझी मुलगी
माझी नात
आता चालतो आहोत

तथाकथितांचा बुरखा फाडण्यासाठी
नव्या संस्काराच्या मशागतीसाठी
स्वाभिमानाने माणूस म्हणून जगण्यासाठी

–

## चारोळी

- शब्द पाळला नाही
  म्हणून नाराज आहे
  नारायण देवाची वाणी
  ही तर श्रेष्ठींची करणी
  स्वप्नावर समुद्राचे पाणी

- नाराजी आता राजीनाम्यात
  उतरणार
  लाल दिवा जाताच
  संधी साधू
  दुसऱ्या गव्हाणीत दिसणार

- त्यांना मुख्यमंत्री पदाची घाई
  झाली आहे
  कोणासंगेही गाठ बांधण्याची
  तयारी ठेवली आहे
  प्रसंगी काका आडवे आले तरी
  पुतण्याने लढाई करण्याची तयारी
  केली आहे

*महायुतीत सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्यांची गर्दी आहे तिकडे आघाडीत तिकीट वाटपाची सर्दी आहे कुणीही येवो, मतदारांना छळणारांचीच वर्दी आहे*

**– आनंद कोठडिया**
'वादळ बंगला', मु. पो. जेऊर,
ता. करमाळा, जि. सोल

## लोकशाही महोत्सव

पाण्यासाठी वणवण भटकंती
उजेडासाठी मिणमिणती चिमणी
पावसाळ्यात चिखलाचं साम्राज्य
रणरणत्या उन्हात अंगाची काहिली

आमच्यासाठी हवाहवासा वाटणारा
निवडणुकांचा लोकशाही महोत्सव
राजकीय पक्षांची गिधाडीधाड
मतांच्या जोगव्यासाठी तुटून पडते
सर्वच झोपडपट्टी एरियात

विजपाणी, पक्की घरे, पक्के रस्ते
अश्वासनांचे फसवे जाहीरनामे
जुन्याच बाटलीत नवी बारुदे
आम्ही पचवले आता हे सारे

मिरवणुका–मोर्चे–रोड शो–सभा
आम्हीच असतो हयात भागीदार
झोपडपट्टी दादांचे कंत्राटी कामगार
मुकी जनावरे कुणीही हाका

लोकशाही महोत्सव हंगामात
कमाई माणसी वीस पंचवीस हजार
तेवढीच चोरांच्या हातशी लंगोटी
नंतर जीवनात अंधारच अंधार

वाट पाहतो पुढच्या
लोकशाही महोत्सवाची
आमच्यासाठी तोच दिवाळी दसरा

**– गजानन नारायण प्रधान**
विश्रांतीनगर, बी–४, बिल्डींग नं.२,
हिंगणे खुर्द, पुणे ४११०५१



## शब्द

हरवलेले काही आशाळभूत शब्द परत फिरू लागतात
काळजाच्या हार्डडिस्कच्या काठाकाठाने
अंतकरणाच्या डेस्कटॉपवर
नवं काही उतरावं लेखणीतून, या आशेनं
प्रत्येक अटळ शिशीर सोसला भोगला तरी
गळत्या पानांच्या जखमा विसरून
निष्पर्ण फांद्यांवर जशी
उमलू लागतात कोवळी पाने


ऋतूमागून ऋतू बदलतात आयुष्यातले
वावटळी येतात, वादळेही येतात
पिवळ्या पानांची व्हावी वाताहत
आणि जमावीत पाने बुंध्याभोवती, तशी
शब्दांच्या बगळ्यांची माळ डोक्यावरून पसार होत
पुन्हा येतेच वस्तीला मनाच्या घरट्यात, आपलेपणाने

शब्द हरवत नाहीतच मुळी
शब्द असतात इथे तिथेच कुठे तरी, विखुरलेले
विस्मरणात कुपीत, निमुट ओठ मिटून बसलेले
किंवा रिसायकल बीनमध्ये असतात सुरक्षित
मेंदूच्या सुपर संगणकात अवघडून बसलेले
शब्द डिलिट होतच नाहीत कधी, कायमचे !

शब्द, रत्ने तुकोबाच्या जीर्ण गाथेतली
शब्द, शस्त्रे रामबाण, रामदासाच्या झोळीतली
शब्दांना असते प्रतिष्ठा, स्वाभिमान
शब्दांची करावी लागते आराधना, आठवून आठवून
शब्दांची बांधावी लागते पूजा
कवितेच्या भरजरी मखरात बसवून
शब्द परत फिरतात आपल्या कोटरात
दिवसभर दमलेल्या पाखरांसारखे
आपले निष्कपट पंख पसरून

शब्द परत फिरू लागतात काळजाच्या
हार्डडिस्कच्या काठाकाठाने
नवं काही उतरावं लेखणीतून या आशेने

**– सदानंद सिनगारे**
जिजामाता मार्ग, खामगाव, जि. बुलडाणा
मोबा. ९४२२५६८१२७



## पहाट

आली भली पहाट रात्र सरून गेली
ओठात वल्लरींच्या ही मंदमंद मुरली

तम, दुख अंतरी हृदयातुनी जगाच्या
उजळून रात्र त्यांची घेऊन सुख आली

जागे करून विश्व विझवीत तारकांना
झरण्यात गीत गात लेऊन साज आली

उधळून मुक्त देत स्वानंद पुष्पराशी
निशिगंध मोगरा नि जाई–जुई–चमेली

काळोख घेत पिऊनी घुसळीत अंतराला
बेभान सागराची लाट विरून गेली


पेटून रान उठले दाही दिशेत लाल
किलकिल पाखरांची घरट्यातूनी उडाली

झाली भली पहाट मज नाही मुळीच भान
नेत्रात निज अजूनी स्वप्ने सुखावलेली

**– विजय गायकवाड**
बी १५ इंद्रप्रस्थपुरम, हडपसर, पुणे ४११०२८
मोबा. ९०२८९७४८१३

**ललितभाष्य**

# तिमिरभेद




– माधव गवाणकर

'टोपीवाला बंगला' तसा काळोखाचाच होता. जुन्या, पावसाची गळती असलेल्या, रंगरंगोटीला मुकलेल्या खोल्याच खोल्या. तिथे बागुलबुवाने काळोख भरून ठेवलाय असे वाटायचे. राजू रेगेसारखा एखादा शाळकरी वर्गमित्र क्वचित तिथे आलाच तर त्याला या घराची रचनाच कळायची नाही. तो दचकायचा. आम्ही तिथले भाडेकरू होतो; पण समाजवादी मालकाकडून काडीचा त्रास किंवा हस्तक्षेप नव्हता. भाडे अवघे वीस रुपये. त्यामुळे रंगकाम किंवा अन्य दुरुस्ती भाडोत्र्यानेच करणे अगदी स्वाभाविक ठरले असावे. मुंबईत वीस रुपयांत आता एक कप चहासुद्धा मिळणे अवघड. अशा अंधाराच्या जुन्या घरी माझा निरीश्वरवाद मीच झेपवला. सोबत होती ती फक्त पुस्तकांची. मनात संघर्ष सुरू असायचा आणि 'संघर्षाच्या नव्या वाटा' दाखवणारी अनेक पुस्तके मात्र माझ्यापाशी होती. त्यातले 'तिमिरभेद' हे वेगवेगळे पुरोगामी, बंडखोर, सत्यवादी आणि परखड विचार एका समान विषयात गुंफणारे पुस्तक मला विशेष आवडू लागले. वेगवेगळ्या विचारवंतांचे विचार एकाच ठिकाणी वाचायला मिळणे ही एक पर्वणीच होती. 'मी नास्तिक का आहे?' ही भगतसिंग ह्यांची पुस्तिका किती लहान होती; पण ती ठिणगी ठरली. मनातली 'चकमक' वाढलीच!

कुपोषण, शोषण, अन्याय, विषमता यांचा भोवरा जाणवू लागला. मी प्रकाशाच्या दिशेने सरकत होतो. माणसाचे खरे प्रश्न माणसानेच सोडवले पाहिजेत. आकाशात कुणी बसलेला नाही ही भावना मला ठाम बनवू लागली. पूजा, प्रार्थना मी कायमची सोडली.

'अ.भि.गोरेगावकर' ही माध्यमिक शाळाही आम्हाला मनाने प्रकाशित करत होती. कारण तिथली चार–पाच शिक्षक मंडळी पारंपरिक कर्मकांड, जातपात आणि जुन्या जगातले ईश्वरवादी, दैववादी विचार न मानणारी होती. त्यातल्या एक कमल देसाई समाजवादी राजकारणात मृणाल गोरेंच्या बरोबरीने होत्या. वसुधा पाटील लेखिका बनल्या. ग्रंथ, शिक्षक आणि स्वत:ला आलेले, मी तपासून, ताडून पाहिलेले अनुभव यातून माझी जडणघडण झाली. त्यामुळे देवधर्म मानणाऱ्या व आधीची पिढी सांगेल ते होय होय म्हणत मान्य करणाऱ्या माझ्या वयाच्या नातलग मुलांपासून मी थोडा अलग पडलो. मला देवळात जायचे नव्हते की सणउत्सवांचे प्रदूषण करायचे नव्हते. मला इंग्रजांचा खेळ क्रिकेट खेळायचा नव्हता की नुसतेच पोरीला वापरून टाकून द्यायचे नव्हते. त्यामुळे पोरे जे उद्योग मुंबईत करत होती, त्यापेक्षा वेगळे लेखन, चिंतन, ब्रॉडकास्ट, जुन्या मराठी गाण्यांचा सराव, वेगवेगळ्या व्यक्तींची नक्कल, एकपात्री नाट्यछटा, खासगी शिकवण्या, नास्तिक मित्रांचा शोध असे वेगळे उद्योग मी करत गेलो, पण तिथेही बुद्धिवादी दृष्टिकोन कायम ठेवला. अनीश पटवर्धनसारखे माझे काही विद्यार्थी खासगीत शिकताना, आपोआप नास्तिक झाले. 'उद्यापासून नास्तिक व्हायचं बरं का, दुपारी बारापासून नास्तिकता सुरू' असे काही नसते. डळमळीत मन हळूहळू कणखर होत जाते. नास्तिकाचा संघर्ष अदृश्य असतो. तो

समाजाला कधी जाणवत नाही. निरीश्वरवादी मनातून ढवळून निघतो. कधी खवळून उठतो व स्वत:लाच समजावून शांत करतो. गरिबी तर त्याला सतावत असतेच. पत्रकारितेसारख्या क्षेत्रात तो असेल तर अनेक तऱ्हेचे खेळ त्याच्या विरोधात खेळले जातात. नेम धरला जातो. त्यात पुन्हा नास्तिक अविवाहित असेल तर त्याला काटे टोचणे समाजाला अधिक सोपे जाते. 'त्या बाजूने कोण उभे राहणार?' असा गैरसमज असतो, पण सत्यच उभे असते व सत्य आपल्या पाठीशी आहे ही एकमेव गोष्ट संघर्षप्रक्रियेत बळ देत असते. मी उन्हातून चालत चालत बातमी किंवा मुलाखत घ्यायला जातो, तेव्हा नवश्रीमंताची एखादी तरी कार पटकन थांबते आणि मला इच्छित स्थळापर्यंत किंवा जवळपास नेते. हा आदर राजकारणात नसतानाही मिळवतो. साधी राहणी व सत्यशोधक बाणा यामुळे मला कधीही कसले भय वाटले नाही. भीतीचा विनाश हासुद्धा अंधाराचा विनाश आहे. मला 'फोबिया' जडू शकत नाही.

मानसशास्त्राचा अभ्यास करताकरता काळोख आणखी कमी होतो. माणूस समजून घेण्याची लेखकाची जी आवश्यक प्रक्रिया आहे ती सायकॉलॉजीमुळे जास्त परिपक्व आणि परिपूर्ण बनते. त्यामुळे नवोदितांनी मानसशास्त्राचा अभ्यास अवश्य केला पाहिजे.

जे अत्यंत भंपक, भंकस लेखन मी आसपास पाहतो, त्यातले नकलीपण आणि जुनाटपणा हा बुद्धिवाद्यांच्या, तर्ककठोरतेच्या आणि भेदक अनुभवांच्या अभावातून आलेला आहे.

एखादे तरुण, नास्तिक मन वाईट संगत मिळून बरबाद होऊ शकते का? होय, तसेही मी पाहिले ! त्या युवकाला 'ब्राऊन शुगर'चा नाद लागला. त्या गर्द अंधारात तो तिमिरभेद कसला करणार? अर्थात त्याच्या इतकाच दोष त्याच्या पालकांचा होता. त्यांनी त्याला व्यसनमुक्तीच्या दिशेने नेले नाही. आमच्या सहवासात येऊ दिले नाही. ईश्वरवाद, दैववाद, कर्मकांड या दिशेने ते गेले. त्यामुळे त्या मुलाचा शेवटी अंत झाला. तो एक चांगला विद्रोही व कलाकार तरुण होता. मी शेकडो लेख, कथा लिहू शकलो. ते निर्व्यसनी असल्यामुळे. कलंदरपणाच्या नावाखाली येणारे शौक बुद्धिवादी मनाने टाळलेच पाहिजेत. जीवनाची शिस्त, संयम, सभ्यता, समतोल व (लैंगिक) आरोग्य या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

समाजाच्या तळागाळापर्यंत ज्ञान नेण्यासाठी माझा भर, कल ग्रामीण भागाकडे राहिला. कोकणातल्या छोट्या छोट्या साप्ताहिकांतही (अत्यल्प मोबदला घेऊन) मी सदरे दिली. कारण कोकणात अज्ञानाचा, अंधश्रद्धांचा अंधार इतका आहे की, कुणीतरी सलग पंधरा–वीस वर्षे तरी हे काम करणे आवश्यक होते. माझ्या लेखनातून, भाषणांतून, मुलांच्या कार्यक्रमांतून बालकथानकातून परिवर्तन झाले, असा माझा दावा नाही. मात्र, खडबडून जागा होणारा, विशेषत: तरुण श्रोता मी माझ्यासमोर पाहिला. गणेश सकपाळसारखे अगदी छोट्या गावातले युवक (पत्रकार) तर आरपार बदलून गेले. ते आता जॉबसाठी कुठेही गेले तरी सत्यनिष्ठा, बुद्धिवादी बैठक विसरणार नाहीत. 'स्मशानातला वाढदिवस'सारखे अंधश्रद्धा हटवणारे उपक्रम राबवणारे तरुण बातमीदार कार्यकर्तेही माझ्याच घरी शिक्षण घेऊन लहानाचे मोठे झाले. ते व्यावसायिक बनले, तरी पुरोगामी विचारांचे एक प्रकाशित अंग त्यांना कायम लाभलेले आहे. प्रत्येक गोष्टीला एक कारण असते व ते नीट शोधून काढले पाहिजे, मग उपाय करता येतील हे आम्ही अगदी शाळकरी मुलांनाही बेस तयार करताना सांगतो.

माझे वडील भोळेभाबडे शिक्षक होते. त्यांची–माझी वैचारिक टक्कर अनेकदा झाली. पण माझा एकही मुद्दा खोडता न आल्यामुळे शेवटी माघार घेत, हसतहसत ते देवाऐवजी मलाच (कोपरापासून) नमस्कार करायचे. एका शाळेची संस्थापिका व दीर्घकाळ मुख्याध्यापिका असलेल्या आईने मला विचारसरणीचे आणि जीवनशैलीचे स्वातंत्र्य दिले. कधी जुन्या विचारांचा दबाव आणला नाही. महाराष्ट्रात सध्या जे भ्रष्ट आचारांचे, भ्रामक विचाराचे, वेडाचारांचे आणि दांभिकतेचे अंधारयुग येऊन अनैतिक प्रदूषण होत आहे त्यावर इलाज म्हणजे मानवतावादी बुद्धिवादाचा स्वीकार आणि प्रचार–प्रसार !

शैक्षणिक पातळीवरही अभ्यासक्रमात बुद्धिवादाचा अखंड संचार दिसायला हवा. अर्थात तसे वैचारिक स्वातंत्र्य तिथल्या समितिसदस्यांना दिलेले नाही, की मुळातच त्यांची तशी मानसिक तयारी नाही ते मला माहीत नाही. मात्र नास्तिकतेवरचा पाठ मी तरी कधी मुले तोंडपाठ करताना पाहिली नाहीत. जर देशात लोकशाही असेल, तर सर्व विचारप्रणालींचे शिक्षण शाळा–कॉलेजातून दिले गेले पाहिजे. मुलांनी ठरवावे, की त्यांना सत्य हवे की भ्रामक असत्य! तेस्वातंत्र्य राज्यघटनेनेच दिलेले आहे.

मात्र, भ्रष्ट महाराष्ट्र विवेकी विचारांची जी पद्धतशीर गळचेपी व उपेक्षा करत आहे, त्यात या प्रांताची कधीही भरून न निघणारी हानीच आहे हे नक्की ! मी कॉलेजात सलग अनेक वर्षे शिकवत आलो. तिथेही आपोआप बुद्धिवादी विचारांचा, परिवर्तनवादी विचारांचा संस्कार मुलामुलींना दिला. जे खरे वैचारिक काम करतात, त्यांचा सन्मान प्रतिगामी करणार नाहीतच, पण पुरोगामीही त्यांना धीर देत नाहीत ही खंत सर्वात मोठी आहे.


**– माधव गवाणकर**
वडाचा कोंड, मु.पो.ता.दापोली, जि. रत्नागिरी ४१५७१२
मोबा. ९१४५९२४०५३



भाष्य

# सीमाप्रश्न आणखी किती दिवस प्रलंबित?

– रामचंद्र रेडकर




*महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नावर राजकारण्यांनी घेतलेली भूमिका ही घोंगडे भिजत ठेवावे अशी आहे. कर्नाटक राज्यातील मराठी भाषिक नागरिकांना आपण राहतो त्या प्रदेशासह महाराष्ट्रात सहभागी होण्याची इच्छा आहे. याबद्दल अनेक अहवाल, चर्चा राज्य आणि केंद्राच्या कायदेमंडळांमध्ये झाल्या. पण प्रश्नाचं मूळ रूप सहा दशकांनंतरही तसेच आहे. या प्रश्नावर नव्या सरकारने गंभीरपणे विचार करावा आणि सामान्य नागरिकांच्या भावनांची हेळसांड करू नये.*

१९५६ साली देशात भाषिक राज्ये निर्माण केल्यानंतर राज्याराज्यातील सीमेचे तंटे उद्‌भवले. हे सीमेचे तंटे सोडवण्यासाठी हरिभाऊ पाटसकर यांनी तयार केलेले सूत्र संबंधित राज्यांनी मान्य करून या तत्त्वानुसार संख्याक, भौगोलिक सलगता व लोकेच्छा या तत्त्वानुसार देशातल्या म्हैसूर राज्याने हे तत्त्व मानले नाही. त्या वेळी महाराष्ट्र–कर्नाटकात काँग्रेसचे राज्य होते.

सरकारे बदलली तरी ५८ वर्षे झाली. महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न लोंबकळत पडलाय. कर्नाटकाला दुखवायचे नाही व महाराष्ट्राचे काँग्रेसचे कार्यकर्ते मवाळ

आहेत. दिल्लीश्वरासमोर मान झुकवणारे आहेत हे जाणून दिल्लीच्या काँग्रेसच्या पंतप्रधानांनी, गृहमंत्र्यांनी महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्न कुजवत ठेवला.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरू झाला तो बेळगावच्या भूमीत. नंतर हा लढा सबंध द्विभाषिक राज्यांत पेटला. आणि पंडित नेहरूंना गुजरात राज्य वेगळे करून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र द्यावा लागला. तत्कालीन मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी १९६० साली कर्नाटकात अडकलेला मराठी भाषक असलेला बेळगाव, कारवार, निपाणी, खानापूर, हल्याळ हा बहुसंख्य मराठी प्रदेश महाराष्ट्रात विलीन करण्याचे वेळोवेळी आश्वासन दिले. पण ते पूर्ण मात्र झाले नाही.

५८ वर्षे हा प्रश्न रखडतोय याचा अर्थ काय करून घ्यायचा? महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना बेळगावचा मराठी सीमाप्रदेश महाराष्ट्रात विलीन करून घ्यायचाच नाही. आतापर्यंत महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी राजकारण खेळले. याचा जास्त फायदा घेऊन म्हैसूर राज्याचे नामकरण झालेल्या कर्नाटक सरकारला हा मराठी सीमाप्रदेश आपलाच आहे असे सांगण्याचे धाडस झाले.

बेळगाव मराठी सीमावासीयांचे दुर्दैव म्हणजे काँग्रेसचे राज्य जाऊन केंद्रात भाजप आघाडीचे राज्य आले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी सीमातंटा काँग्रेससारखा कुजवत ठेवला. सत्तेवर नसताना बेळगावच्या जाहीर सभेत अटलबिहारी वाजपेयी यांनी सांगितले होते, की आमच्या पक्षाची सत्ता आल्यावर ताबडतोब बेळगावचा सीमाप्रश्न सोडवण्याचे वचन देतो. जाहीर सभेत लोकांनी टाळ्या वाजवल्या, लोकांच्या आशा पल्लवित केल्या, काही काळानंतर भाजप आघाडीचे सरकार सत्तेवर येऊन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी वचनभंग केला व कर्नाटक सरकारला दुखावले नाही. बेळगावची मराठी जनता विसरली नाही. दुसरे दुर्दैव महाराष्ट्रात नवल घडले, शिवसेना भाजपचे सरकार आले, त्यांनीही सत्तेवर आल्यावर या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. शिवसेनेचे वाघ कै. बाळासाहेब ठाकरे यांनासुद्धा बेळगाव–महाराष्ट्र सीमाप्रश्नाचा विसर पडला की जाणूनबुजून त्यांनी दुर्लक्ष केले. आणि सत्ता गेल्यानंतर बेळगाव सीमाप्रश्नाचे राजकारण पुढे रेटले. महाराष्ट्राचा भाजप पक्षही तत्कालीन काळात बेळगाव सीमाप्रश्नाविषयी उदासीन ठरला. खोटे राजकारण खेळून बेळगाव मराठी सीमाप्रदेशातल्या २५ लाख लोकांच्या भावनांना ठेच पोचवली. महाराष्ट्रातले सर्व राजकीय पक्ष यांनी बेळगाव सीमाप्रश्नाचे भांडवल करून निवडणुकीत निवडून येण्याचे यश मिळवले. बेळगावात ज्या ज्या वेळी आंदोलने झाली, त्या त्या वेळी महाराष्ट्राच्या सर्वपक्षीय नेत्यांनी बेळगावच्या जाहीर सभेत लवकरात लवकर बेळगावचा मराठी सीमाप्रदेश महाराष्ट्रात विलीन करून घेतोच, अशी राणा भीमदेवी थाटाची भाषणे करून बेळगाव मराठी सीमावासीयांचा विश्वासघात केला. कन्नड सक्ती आंदोलनात राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी १९८६ साली पंतप्रधान राजीव गांधी आलेले असताना, बेळगावात कित्तुर राणी चन्नम्मा चौकात हजारो लोकांच्या समोर सत्याग्रह केला. शरद पवार यांच्या खांद्यावर लाठी बसली अशी अफवा पसरल्यावर बेळगाव ग्रामीण भाग पेटला व प्रक्षुब्ध मराठी तरुणांवर कर्नाटकी पोलिसांनी गोळीबार करून आठ तरुण ठार केले. कर्नाटकी पोलिसांनी मराठी भाषिकांवर अमानुष, नरपशुतुल्य अत्याचार केले. एवढेच नव्हे तर महिलांनादेखील मारले. घरांचे दरवाजे बुटाच्या लाथांनी फोडून घरातील आतल्या माणसांना निर्दयीपणे लाठ्यांनी मारले. त्यानंतर महाराष्ट्रातले ढोंगी नेते मराठी भाषकांच्या दु:खावर फुंकर घालायला आले व या नेत्यांनी कर्नाटक सरकारचा निषेध करण्यापलीकडे काही केले नाही. या महाराष्ट्राच्या सर्व नेत्यांनी विश्वासघात केला. शरद पवारांचा सत्याग्रह नाटकी, ढोंगी ठरला. त्यांनी म्हणे एक अव्यवहारिक तोडगा बेळगावच्या मराठी नेत्यांना सुचवला. पण तो तोडगा केंद्र सरकारकडून लादला नाही. २००४ साली थोडी लाज वाटून महाराष्ट्र सरकारने बेळगाव मराठी सीमेचा तंटा सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल करून नेला. त्यावेळेला मराठी जनतेला सांगितले की ४–५ वर्षात सर्वोच्च न्यायलय या सीमाप्रश्नाचा अंतिम निकाल देईल. पण ११ वर्षे उलटली तरी देखील सर्वोच्च न्यायालयात सीमाप्रश्न अनिर्णित आहे.

कायद्याच्या सापळ्यातून सर्वोच्च न्यायलयात अडकलेल्या सीमाप्रश्नाचा नक्की केव्हा निकाल लागणार? महाराष्ट्रातील, कर्नाटकातील ज्येष्ठ वकील मंडळी हे सांगू शकत नाहीत. केंद्राने नेहमी कर्नाटकाला झुकते माप व महाराष्ट्राला अप्रत्यक्षरीत्या तंबी देऊन ५८ वर्षे सरळ लवकर सुटणारा सीमाप्रश्न हा दीर्घकाळ ठेवून अधिक गुंतागुंतीचा केला. मध्यंतरी महाजन आयोगा बाहेर पडला. यांनीसुद्धा तत्त्वशून्य पक्षपातीपणाचा अहवाल लिहिला व बेळगाव आदी सीमाप्रदेश

यातला अल्पसा भाग महाराष्ट्राला देऊन जास्त भाग कर्नाटकात ठेवावा अशा शिफारसी केल्या.

लोकसभेत महाजन आयोगावर चर्चा झाली नाही. हा अहवाल स्वीकारावा की फेटाळावा? याचा निर्णय झाला नाही. हा अहवाल बासनात केंद्राने गुंडाळून ठेवला, याची सीमावासियांना खंत वाटते. गेली ५८ वर्षे कर्नाटक सरकार व बेळगावचे जिल्हा प्रशासन पोलीस बळाचा वापर करून मराठी नागरिकांवर क्रूर हल्ले करत आहेत. लोकशाहीतील सीमावासियांची चळवळ ऐनकेन प्रकारे चिरडून टाकण्याची एकही संधी सोडत नाही. बेळगाव सीमाप्रदेशात लोकशाही नसून कर्नाटक सरकार, जिल्हा प्रशासन पोलिसी बळाचा वापर करून तरुणांवर खोटे खटले घालून गेली ५८ वर्षे त्रास देत आहे. तरीदेखील केंद्राला आणि महाराष्ट्र राज्यकर्त्यांना दया येत नाही. मराठी भाषकांना चिरडलेले पाहून महाराष्ट्राचे राज्यकर्ते डोळे असून डोळे झाकतात. मुंबईच्या समुद्रकिनारी हे नालायक राज्यकर्ते किती कोटी रुपयांचा शिवाजींचा पुतळा बसवणार? ही तर बेशरमपणाची कमालच म्हणायची. २ पिढ्या सीमालढ्यात बरबाद झाल्या, त्या कालवश झाल्या. आता तिसरी मराठी तरुण पिढी लोकशाही मार्गाने लढा देण्यास सिद्ध आहे.

हिंसाचार करून राष्ट्रीय संपत्तीची होळी करून स्वतंत्र तेलंगण राज्याची निर्मिती होते. केंद्र सरकार हिंसाचाराला घाबरते. ५८ वर्षे मराठी सीमावासीयांनी तेलंगणसारखाच मार्ग पत्करायला हवा होता काय? लोकशाहीची, महात्मा गांधीजींच्या मार्गाची सत्याग्रही लढ्याची दखल केंद्र सरकार घेत नाही. याला काय म्हणावे बरे? पंतप्रधान मोदींना. गुजरातचे मुख्यमंत्री असताना बेळगावचा सीमाप्रश्न माहीत असावा. आता ते पंतप्रधान झालेत. गृहमंत्री राजनाथ सिंह आहेत. या दोघांनी मिळून बाहेरून लवकरात लवकर कर्नाटक सरकारवर दडपण आणून हा प्रश्न सोडवावा. प्रश्न न्यायालयात आहे म्हणून काय झाले? बाहेरून दोन्ही राज्यांच्या समझोत्याने कमीतकमी कटुता राहील या रीतीने मोदी सरकारला लवकर प्रश्न सोडवता येतो व तो सोडवला नाही तर तेलंगणसारखे उग्र आंदोलन तरुण पिढी करण्यास पुढे येईल व हा सीमासंग्राम नको तितका भडकेल.

महाजन आयोगाने येळ्ळूर हा ग्रामीण भाग महाराष्ट्रात घालण्याची शिफारस केली. म्हणून येळ्ळूरवासियांनी आपल्या गावच्या वेशीवर 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' असा बोर्ड लावला. यात राजकारण आले. कन्नड संघटनांचे पित्त खवळले व त्यांनी कर्नाटक सरकारमार्फत जिल्हा प्रशासनाला म्हणजे जिल्हाधिकाऱ्याला हा बोर्ड काढण्यास भाग पाडले. तरुणांनी दुसऱ्यांदा बोर्ड लावल्यावर येळ्ळूर गावात कर्नाटकी पोलीस येऊन त्यांनी राक्षसी वृत्ताचे प्रदर्शन करून घराचे दरवाजे फोडून, महिलांना, प्रौढ माणसांना बडवले. याचे चित्रण बहुतेक मराठी दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांनी दाखवून सैतान पोलिसांची क्रूरता कशी असते हे दाखवून महाराष्ट्रातल्या जनतेत चीड निर्माण केली. कर्नाटक उच्च न्यायालयाने पिवळा-तांबडा झेंडा बेकायदेशीर जाहीर केला असताना न्यायालयाचा अवमान करून विभागीय आयुक्ताच्या कार्यालया हा झेंडा बरीच वर्षे लावला आहे. बेळगाव महापलिकेवरील दिमाखाने फडकणारा भगवा झेंडा द्वेष बुद्धीने काढून टाकला व मराठी भाषिकांना डिवचले. ज्या राज्यात १५ टक्केच्या वर भाषिक लोक राहत असतील त्यांना त्या भाषेत सरकारी कागदपत्रे द्या असा आदेश बेळगावच्या अल्पसंख्याक उपायुक्ताच्या अधिकाऱ्यांनी गेली ४० वर्षे कर्नाटक सरकार आणि बेळगाव जिल्हा प्रशासन या आदेशाची अंमलबजावणी केली नाही. सर्व आदेश फाइलीत गुंडाळून केंद्रीय अल्पसंख्याक आयोगाचा अपमान केला. येथे कायदा आडवा येत नाही. मात्र येळ्ळूर येथे महाराष्ट्र राज्य हा बोर्ड लावल्यावर उच्च न्यायालयाने निकाल दिल्याप्रमाणे ताबडतोब फलक फोडून टाकले. लोकशाहीत हा पक्षपातीपणा का?

**- रामचंद्र रेडकर**
श्रीनिधी अपार्टमेंट, सोमवार पेठ, टिळकवाडी, बेळगाव ५९०००६

वाचकहो,

'सत्याग्रही'तले तुम्हाला काय आवडते?

'सत्याग्रही'मध्ये काय वाचायला तुम्हाला आवडेल? आम्हाला जरुर कळवा. 'सत्याग्रही'च्या स्वरूपात त्यानुसार आम्हाला बदल करता येतील. 'सत्याग्रही मासिक' वाचकांच्या आधारावर आणि प्रेमावर उभे आहे.

- संपादक

**स्मरण**

# जेव्हा चित्रे बहिष्कृत ठरले

– माधव पोतदार

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत अनंतराव चित्रे यांनी कार्य केले. बाबासाहेबांच्या विचारांना त्यांनी कृतीत आणले. हे विचार सनातनी प्रवृत्तींना पटणारे नव्हते. या प्रवृत्तींनी अनंतरावांना समज दिली; पण ते डगमगले नाहीत. शेवटी त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात आला. तो तीन वर्षे चालला. त्यांना बऱ्याच हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्या. कालांतराने लोकांना त्यांच्या कार्याचे मोल समजले. त्यांनी बहिष्कार मागे घेतला. प्रवाहाच्या विरोधात उभे राहणाऱ्या अनंतरावांच्या कार्याला सलाम !*

---

रायगड जिल्ह्यातील पोलादपूर गाव. याच गावचे अनंत विनायक चित्रे. प्रसिद्धीस आले ते भाई चित्रे म्हणून. संपूर्ण आयुष्य दीनदलितांसाठी खर्च केलेले; पण विशेषत: चौदारतळे पेटवण्यात त्यांचा मोठा वाटा होता. मार्चमध्ये महाडमध्ये जी 'कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद' भरली त्याच परिषदेत शेवटच्या दिवशी शेवटचा ठराव मांडला तो याच भाई चित्र्यांनी.

अनंतराव चित्रे यांचा १९२३ सालीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी परिचय झाला होता. याच वर्षी बॅरिस्टर होऊन आलेल्या बाबासाहेबांना वकिली करण्यासाठी स्वतंत्र अशी जागा हवी होती. ती जागा समाजसेवा संघाचे ना.म. जोशी यांनी मिळवून दिली होती. दामोदर हॉलच्या पाठीमागच्या इमारतीत डॉक्टरांना कचेरीसाठी व ग्रंथालयासाठी मिळाली होती. अनंतराव हे समाजसेवा संघाचे महत्त्वाचे कार्यकर्ते होते. मूळचे पोलादपूरकर. ते परळला दामोदर हॉलच्या बच्चूबाई बिल्डिंगमध्ये रहात होते. इथेच बाबासाहेबांशी अनंतरावांचा स्नेह घडला होता. बाबासाहेबांचे साथी बनले होते.

१९२९चा नोव्हेंबर महिना. याच महिन्यापासून पोलादपूरच्या रहिवाशांनी चित्रे यांचे घर बहिष्कृत केले होते. अस्पृश्यांसाठी झटणारा हा क्रांतिपुरुष सनातन वृत्तीचा शत्रू ठरला होता. अनंतरावांनी इंदूरला 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन केली होतीच, शिवाय जी महारकुळे होती त्यांच्या दु:खांशी ते समरस झाले होते. त्यांची सर्वच कृती गावाच्या दृष्टीने संतापजनक ठरली होती. त्यातून गावानेच त्यांना बहिष्कृत ठरवून सजा फर्मावली होती.

१८ नोव्हेंबर १९२१ बुधवारचा दिवस होता. कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हमीद अली आपल्या पत्नीसह पोलादपूरला आले होते. त्यांनी पोलादपूरच्या महारवाड्याला भेट दिली होती. त्यावेळी अलींच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची सभा भरविण्यात आली. अनंतराव सभेला तर होतेच; पण त्यांची पत्नीही सभेला गेली होती.

एवढे निमित्त सनातनवृत्तीच्या गावाला पुरेसे होते. दुसराच गुरुवारचा दिवस उजाडला आणि गावाने कडक बहिष्कार पुकारला. या बहिष्कारात गावाच्या पोलीस पाटलाने विशेष पुरस्कार घेतला होता. हे वयोवृद्ध पोलीस पाटील दुसरे तिसरे कुणी नव्हते तर चित्रे घराण्यातीलच भाईबंद होते. त्यांच्या कडक सूचनेप्रमाणे मोलकरीण बंद झाली, लहानसहान कामे करणारा महादू घरी यायचा बंद झाला, दळण कांडण करण्यासाठी कुणीही येईनासे झाले. त्यामुळे अनंतरावांच्या पत्नीलाच धुणीभांडी, दळणकांडण करावे लागले. इतकेच काय पाणवठ्यावरील पाणीही मिळणे कठीण गेले.

बहिष्कार पडून तीन महिने झाले तरी त्यात काडीचाही बदल काही घडला नाही. त्यात आणखी भर पडली ती अनंतरावांनी आयोजिलेल्या सहभोजनाची. डॉ. बाबासाहेब यासाठी हजर होते. या सहभोजनात सामील झाले होते ते प्रामुख्याने महाडकर. केशवराव चांदे हे ब्राह्मण गृहस्थ. त्यांच्या साथीला सीकेपी समाजातील कार्यकर्त्यांचा भरणा अधिक होता. यात होते चिंतोबा देशपांडे, मनोहर गोविंद टिपणीस, सदोबा देशपांडे (पुण्याचे) शांताराम पोतनीस, तळ्याचे बापूसाहेब देशमुख, यशवंत

महादेव कुलकर्णी याशिवाय महाड–पोलादपूर परिसरातील पांडुरंग साळवे, चांढवेकर, भागोजी राघो पवार, नांदगावकर इत्यादी.

अनंतरावांनी या सहभोजनाने बहिष्काराला एक प्रकारे उत्तर द्यायचा प्रयत्न केला होता खरा; पण गाव बदलणारा नव्हता. यापेक्षाही जातभार्दध बदलणे शक्य नव्हते. १९३१ पासून या बहिष्काराला अधिक धार आली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या सभेनंतरचा दिवस होता दिवाळीचा शेवटचा. १९३२ चा. अनंतरावांच्या पत्नीने घरोघर फराळाची ताटे पाठवली होती ती सर्वच परत आली होती. शेजारीपाजारी बोलायचे बंद झाले होते. ते थोडीच ताटांचा स्वीकार करणार होते? ज्यांच्याकडे ताटे पाठवली त्यांनी मुक्ताफळे उधळली. 'इंदिराबाई महारवाड्यात जाऊन आलेल्या आहेत. तेथे त्या जरूर पाणी प्यायल्या असतील. तेव्हा ही फराळाची ताटे परत घेऊन जा. आम्हाला ती नकोत. आमच्या मुलामुलींची अजून लग्ने व्हायची आहेत.'

पोलादपूर गावातला कुंभारवाडाही या बहिष्कारात उभा ठाकला होता. हा बहिष्कार चित्रे खोताविरुद्धचा होता. चित्रे खोत होते; पण ते जन्मभर कष्टले होते ते कुळांसाठी. असा हा वेगळा खोत होता.

पोलादपूर गावातच भाचेजावई राहात होते. त्यांचे नाव बापूराव चित्रे. पण हे जावईही गावच्या दडपणामुळे घरी येईनासे झाले. इतकेच नव्हे तर अनंतरावांच्या कुटुंबांशी एक शब्दही बोलत नव्हते. याच काळात अनंतराव आजारी पडले. अनंतरावांची मोठी बहीण तीही सख्खी, सर्वात मोठी. बायजी. ती उतरली होती ती जावयांकडे; बापूरावांकडे. पण आजारी असलेल्या भावालाही ती पहायला येऊ शकली नाही. बापूराव तसे शेजारीच होते. ते भेटणेही शक्य नव्हते. तेव्हा त्यांनी अनंतरावांना पोस्टाने एक पत्र पाठवले व आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या पत्राला दि. ४ मार्च ३२ रोजी पोलादपूरातल्या पोलादपूरात अनंतरावांनी पत्रानेच उत्तर दिले होते.

अनंतरावांनी लिहिले होते, 'तू विनाकारण क्षुल्लक गोष्टीबद्दल मनाला त्रास करून घेऊ नकोस. तू माझ्याकडे येत नाहीस म्हणून मी तुझ्यावर कधीच रागावलो नाही. खोटा धर्म तो भिक्षुकशाहीचा. पोटार्थी, स्वार्थी, लबाड भटांचा धर्म! मी हा भटांचा धर्म पाळीत नाही. मी सर्वांभूती एक आत्मा पाहणाऱ्या साधुसंतांचा धर्म पाळतो. भटांचा धर्म पाळणारे मूर्ख लोक वरच्या जातीच्या लाथा खातात व खालच्या जातींना लाथा देतात. हा लाथा देण्याघेण्याचा गाढवपणाचा गोंधळ घालणारा धर्म मला नको. मी त्या धर्मातून बाहेर पडलो आहे. मी प्रत्येक माणूस, मग तो ब्राह्मण असो की महार असो, हिंदू असो की मुसलमान असो, सर्व देवाची रूपे आहेत असे मानतो. मला सर्व सारखे. हा धर्म मी उघडपणे पुण्याईचा धर्म म्हणून पाळीत आहे. परिस्थितीची सबब सर्वांनीच सांगितली, तर जगाला खऱ्या कल्याणाचा मार्ग कोणी दाखवावा? त्यासाठी एखादी रुढी मोडून, हालअपेष्टा, अपमान सोसून, स्वत:च्या संसारदुखाची होळी करण्याचे मी ठरवले आहे. स्वत:च्या कुटुंबापुरतेच पाहून चार माणसासारखे म्हणजे पशूसारखे 'आहार निद्रा भय मैथुनम्' ह्या चार गोष्टी करीत रहायचे यासाठी माझा जन्म नाही. जन्माला आल्यासारखे काही सुधारणेचे कार्य हातून घडले पाहिजे अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. ज्या मनुष्य जातीत जन्म घेतला त्या मनुष्यजातीला यथामति, यथाशक्ती चांगला कल्याणाचा मार्ग दाखवणे ह्यासाठी मी जन्म घेतला आहे.'

आतापर्यंत हजारो रुपये मिळवून माझ्याजवळ शिल्लक काहीच नाही. का?... माझा पैसा गेला कुठे? व्यसनात? दारूत? नाटक सिनेमात? नाही. माझा सर्व पैसा काहीसा कुटुंबासाठी व बहुतेक सर्व सार्वजनिक कामासाठी गरीब व नाडलेल्या शेतकरी, कामकरी अस्पृश्य बंधुभगिनींची सेवा करण्यात खर्च झाला. गेल्या वर्षी शेतकरी चळवळीसाठी पदरचे एक हजार रुपये खर्च झाले; पण त्यामुळे सरकारचे धाबे दणाणले. खोतसावकार, श्रीमंत, गरिबांना छळणारे फुकटखाऊ पांढरपेशे लोक भेदरून गेले. शेतकरी लोकात जागृती निर्माण झाली. एक हजार रुपयात मला जमीन घेता आली असती, घर बांधता आले असते. बायकोमुलांना कपडालत्ता, दागदागिना करता आला असता; पण त्यात काय विशेष घडले असते? माझ्या हातून लोककल्याण व्हावे म्हणून मी दरिद्री राहण्यास राजी आहे.'

'माझी जवळची आप्तइष्ट माणसे माझ्याशी संबंध ठेवीत नाहीत. माझी सख्खी बहीण शेजारच्या घरात दोन दिवस येऊन राहते; पण मी अंथरुणावर मरणाच्या दारी पडलेला असताना घरी येऊन ती माझी भेट घेऊ शकत नाही. अनाचारी भ्रष्ट भिक्षुक आपण ठिकठिकाणी पाहतो. दलितास शिक्षण मिळाले तर त्यांच्यातूनच डॉ. आंबेडकर निर्माण होतात. जगाला हलवून सोडण्याची योग्यता अन डॉ. बाबासाहेब आंबेडकर गृहस्थाच्या अंगी शिक्षणामुळे आली आहे. सुशिक्षित व स्वच्छ अस्पृश्यांचा मी विटाळ मानीत नाही. मला महारांना माझ्याप्रमाणे उच्च बनवायचे आहे.'

जिद्दीची माणसे डॉ. आंबेडकरांचे साथी होते. ही विचारधारा तशीच स्फोटक होती. अनंतराव चित्रे त्यातीलच एक होते. १९३२ मध्ये इंदिराबाईंनी हळदीकुंकू करण्याचे ठरवले. गावातल्या स्त्रियांना बोलवा असे तिने अनंतरावांना म्हटलेही. पण त्यांनी बजावले कुणीही येणार नाहीत. तयारी फुकट जाईल. गावातील आले नाहीत तर मी सर्व महारवाड्यातील बायकांना

घेऊन येईन. तसेच महाडच्याही काही बायकांना घेऊन येईन. तसेच झाले. महाडच्या दोन वहिन्याही आल्या. महारवाड्यातील बायका नटूनथटून आल्या व हळदीकुंकू पार पडले.

पण .. हा कार्यक्रम घर बहिष्कृत असतानाही उत्तम तऱ्हेने पार पडलेला पाहताच विरोधक आणखीच पेटून उठले आणि त्यांनी नवी नीती अनुसरली. घराशेजारच्या अंगणात गावचा प्रातर्विधी कार्यक्रम जोरदार सुरू झाला आणि दुर्गंधीची लाटच पसरली. घराच्या भिंतीवर शेणाचे गोळे पडू लागले. काटक्या व पालापाचोळ्याचे ढीग घरासमोर उभे राहिले. गावाचा कचरा घरापुढे दिमाखाने उभा केला. पण या नीतीलाही अनंतरावांचे घर डगमगले नाही.

इंदिराबाई, अनंतरावांची पत्नी नदीचा घाट चढून पाणी आणू लागली पण हे पाणी सहजपणे मिळणे कसे शक्य होते? नदीवर जाताच सगळ्या बायका विरोध करून उभ्या राहत व म्हणत, ''वहिनी इथे उतरू नका. खालच्या बाजूला उतरा.'' पण या खमक्या बाईने उत्तर दिले होते, ''मी काही कुठे खाली उतरायची नाही. तुम्हीच कुठे उतरायचे ते उतरा.''

इंदिराबाई गरोदर होत्या. गावात सुईण मिळणेही कठीण होते. पोलादपूरात बाळंतपण होणेच मुळी शक्य नसल्यानेच मुंबईला प्रयाण करणे भाग पडले. जेव्हा बाळंतपण संपवून इंदिराबाई पोलादपूरात परतल्या तेव्हा मोलकरीण बयो काळोखात भेटायला येऊ लागली, उरले सुरले जेवण घेऊ लागली. दिवाळीचा फराळही घेऊ लागली आणि कुंभारवाड्यातली माणसेही हाक मारू लागली. बहिष्कार विरघळू लागला. १९३२ च्या अखेरीस बहिष्कार जवळजवळ संपलाही. १९२९ साली सुरू झालेला बहिष्कार १९३२ साली संपला आणि माणसे माणसाजवळ आली. अस्पृश्यांना जवळ केले या कृतीची शिक्षा अनंतरावांनी आणि त्यांच्या संपूर्ण घराने चांगलीच भोगली होती. तरीही कुणी हरले नव्हते, तर उलट जिंकलेच होते.

**– डॉ. माधव रा. पोतदार**
स्वप्न–पराग, फ्लॅट नं. ३८, बाळकृष्ण सोसायटी, अक्षयनगर,
धनकवडी, पुणे ४११०४३

# सत्याग्रही
विचारधारा

मी भारतीय आहे याचा मला गर्व आहे आणि मी सत्याग्रही परिवाराचा सभासद आहे याचा मला अभिमान आहे. सच्चेपणाला माझा पाठिंबा असतो. लुच्चेपणाला माझा विरोध असतो.
प्रामाणिकपणाचे मी कौतुक करतो. ढोंगीपणाचा मी निषेध करतो.
कायद्याचा आदर करणे मला आवडते. भ्रष्टाचाराचे समर्थन मला शिसारी आणते.
राजकारणाविषयी जागरूक राहणे हे मी कर्तव्य मानतो. राजकारणाविषयी उदासीन राहणे मला घातक वाटते. आशावादी असणे आरोग्याचे लक्षण. निराशावाद हे आजारपण.
जातीयवाद समाजात फूट पाडतो. धर्मांधता देशाचे तुकडे करते.
विचारांच्या डबक्याला दुर्गंधी असते. उन्मुक्त विचारांचे झरे खळखळ वाहत राहिले म्हणजे मला प्रसन्न वाटते. दुसऱ्यांच्या वेदनेने मला पीडा होते. असा मी, असा मी ! म्हणूनच मी सत्याग्रही परिवाराचा सभासद आहे आणि त्याचा मला अभिमान आहे.
सत्याग्रही माझं व्यासपीठ आहे. सुसंस्कृतपणाचा अविष्कार आहे.
सत्याग्रही परिवार वाढवायचा आहे. सत्यामागे सामर्थ्य उभे करायचे आहे.
म्हणूनच आवाहन आहे आपल्याला, सत्याग्रही परिवाराचे सभासद बना.
इतरांनाही सभासद करून घ्या.

**परिघाबाहेर**

हैदराबाद

# विशुद्ध राष्ट्रवादाचे संचित


– श्रीपाल सबनीस

हैदराबाद येथील श्री. विवेक देशपांडे या माजी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने आपल्या गोड चिमुकल्या नातीस, देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या विरांना व आपल्या आई–वडिलांच्या स्मृतीस 'मागे वळून पहाताना' हे पुस्तक अर्पण केलंय. तीन पिढ्यांचा भावनीक अनुबंध आणि देशाला सुरक्षित ठेवणाऱ्या पोलिसांचे समर्पण या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेत अधोरेखित झालेय.

खरेतर लेखक देशपांडे यांच्या म्हणण्यानुसार एका गुप्तचर अधिकाऱ्याची डायरी म्हणजे हे पुस्तक असेलही ! पण डायरीचा रुक्षपणा इथे किंचितही दिसत नाही. त्यामुळे विवेक देशपांडे यांच्या आत्मरंगात भिजलेल्या क्षणांची व घटनांची ही सुंदर कलाकृती आहे. या कलात्मक लेखनाला निदान मी तरी 'डायरी' अशा रुक्ष संबोधनाने संबोधणार नाही. प्रसिद्ध समाजसेविका विद्या बाळ यांची अत्यंत समर्पक प्रस्तावना पुस्तकाला लाभलीय. त्यामुळे या लेखनाचे वैभव अधिकच वाढलेय.

पोलिस खात्यात भरती झाल्यानंतर प्रशिक्षणापासून पुढील सर्व प्रवास या पुस्तकात केंद्रस्थानी आलाय. विशेषत: गुप्तचर विभागात सेवा बजावताना श्री. देशपांडे यांचे अनुभवविश्व कमालीचे वैविध्यपूर्ण आहे. पाकिस्तानचा हेर जुनेदसह वलीमोहम्मद जाहीद, अहेसान हबीब सारख्या देशद्रोही अतिरेकी कारवायात सामील असणाऱ्या शत्रूंना पकडण्याच्या प्रयत्नातील नाट्य या लेखनाचे वेगळे परिणाम सिद्ध करते. आय.एस.आय. आणि पाकिस्तानचा उद्देश, त्यांची धोरणे व त्यांच्या कारस्थानांचा लेखक देशपांडे यांनी घेतलेला वेध सर्वार्थाने महत्त्वाचा आहे. अशा आंतरराष्ट्रीय गुंतागुंतीच्या वास्तवाचे विश्लेषण करताना विवेक देशपांडे यांनी स्टॅनली वोलपर्टचा दिलेला उतारा अत्यंत बोलका आहे.


गुप्तचर विभागाची जबाबदारी पार पाडताना अत्यंत दुर्गम भागात देशपांडे यांच्या आयुष्याची अनेक वर्षे खर्ची पडली. हालअपेष्टा झाल्या. पण निष्ठा पातळ झाल्या नाहीत. लेह–लडाखमधील लेखकाचे जिवनानुभ अत्यंत रोमहर्षक आहेत. पोलिसांना किती खडतर जीवन जगावे लागते, याची साक्ष म्हणजे विवेक देशपांडे यांचा जीवनप्रवास होय.




**मागे वळून पाहताना**
***– विवेक देशपांडे***
***प्रकाशक :*** *अद्विका प्रकाशन, जयश्री विवेक देशपांडे, हैदराबाद*
*पृष्ठे : १७२*
*मूल्य : रुपये १७५/–*

अर्थात या प्रवासात देशपांडे यांना अनेक सुखद क्षणांचा लाभ झालाय. इंदिरा गांधींच्या दौऱ्यातील राजकीय धुमाळी शब्दात टिपत असताना राष्ट्रीय नेत्याची ख्वाशियतही या पुस्तकात आत्मियतेने नोंदलीय. नांदेड परिसरातील दौऱ्याच्या वेळी चुकून मध्येच उतरलेले हेलीकॉप्टर आणि त्यात राहून गेलेले इंदिरा गांधींचे सर्व सामान या घटनेतील नाट्य श्री. विवेक समर्थपणे वर्णितात. विशेषत: नांदेडला आल्यावर इंदिरा गांधींनी अनेक भारी किमतीच्या साड्या बाजूला सारून फक्त हॅण्डलूमच्या साडीचा केलेला स्वीकार अत्यंत बोलका आहे. म. गांधीजींच्या विचारांची नाळ इंदिरा गांधींच्या या साध्या; पण महत्त्वाच्या कृतीशी सहजपणे जुळली जाते. सामान्य ऑफिसरचे आभार मानणाऱ्या इंदिरा गांधी, आणीबाणी, चौफेर आक्रमकता पेरणाऱ्या इंदिरा गांधी, निवडणुकांच्या दौऱ्यात गरजणाऱ्या इंदिरा गांधी, अशी कितीतरी इंदिरा रुपे विवेक यांनी या लेखनात साकार केलीत. विनोबा, इंदिरा, लेबनॉनचे अध्यक्ष अशा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नेत्यांच्या सेवेतील व सहवासातील सुगंध इथे दरवळत राहतो.

कळंब, यवतमाळ, नागपूर, तुमसर, हैद्राबाद पासून थेट लेहलडाख पर्यंतचा विवेक देशपांडे यांचा पोलिसी सेवेचा लेखा–जोखा, कर्तव्यनिष्ठेने ओतप्रोत आहे. उपाशी–तापाशी राहण्यापासून ४५ कप चहा नि १०–१२ प्लेट भजे खाऊन ॲसिडिटी भोगण्याचाही इथे अनुभव आहे. देशद्रोही कारवाया करणाऱ्याविरुद्ध धाडी घालणे, मोर्च्याचे वेळी बंदोबस्त ठेवणे, राष्ट्रीय नेत्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत काळजी घेणे, अशी अनेक कामे विवेक यांनी इमानदारीने केली. अतिरेक्यांच्या–गुंडांच्या क्रौर्याचा सामना करताना जीव धोक्यात घालावा लागला. नोकरीवर काही वेळा गंडांतर आले. जांबुवंतराव धोटेसारख्या विदर्भ वीराची दाढी पकडून ठेवण्याचा प्रसंगही श्री. देशपांडे यांच्यावर आला. कारण त्यांनी देशपांडे यांची कॉलर धरली होती. पोलिस अधिकाऱ्याच्या सरकारी ड्रेसची अप्रतिष्ठा विवेक देशपांडे यांसारखा



**श्री. विवेक देशपांडे**

- *पोलीस उपनिरीक्षक म्हणून १९६६ साली महाराष्ट्र पोलीस दलात दाखल.*
- *१९७६ साली गुप्तवार्ता विभागात प्रतिनियुक्ती.*
- *२००१ रोजी मुंबई येथून अतिरिक्त पोलीस उपायुक्त म्हणून सेवानिवृत्त.*
- *दहशतवाद, राष्ट्रीय सुरक्षा या विषयांवर अभ्यासपूर्ण लेखन आणि भाष्य.*
- *पोलीस दलातील सेवेत आलेले अनुभव 'मागे वळून पाहताना' या पुस्तकातून शब्दबद्ध केले आहेत.*
- *मराठी भाषा, साहित्य यांवरील प्रेमापोटी विविध नियतकालिकांतून ते लेखन करीत असतात.*
- *हैदराबाद येथे राहून मराठी साहित्यात ते भर घालीत आहेत. भाषिक प्रांताच्या परिघाबाहेरील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.*

कर्तव्यदक्ष अधिकारी सहन करणे कसे शक्य आहे.

स्वत:च्याच घरी पाहुणा म्हणून आलेल्या कल्याणीबुवा रामदासी यांनी यवतमाळच्या दत्त चौकातील त्यांच्या प्रवचनात 'मुसलमानाना आडवे-उभे कापून खांडोळी तर करा किंवा पाकिस्तानात तरी पाठवा' अशी चिथावणीखोर भाषा वापरल्यामुळे विवेक यांनी त्यांना अटक केली. अशा असंख्य प्रसंगातील नाट्य या डायरीचे वाङ्मयीन मूल्य वाढवते. नाटकवेडाचे सांस्कृतिक संदर्भ 'अपराध मीच केला' या नाट्यप्रयोगाच्या कथनातून पुढे येतात कलावंत अधिकाऱ्याच्या व्यक्तित्वाची सुंदर साक्ष प्रत्ययाला येते. पण इंदिरा गांधींचे भाषण व 'अपराध मीच केला' नाटकाच्या प्रयोगाचा नीट अनुबंध जुळत नाही.

हैदराबादच्या दंगलीतील क्रौर्य लेखक देशपांडे, त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून कसलेल्या अव्वल लेखकाप्रमाणे वर्णितात. तत्कालीन राजकीय-धार्मिक संदर्भाचा गुंता उकलतात. मानवी मूल्यांच्या कैवारातून लिहितात. विवेक देशपांडे यांचे हे लेखन ललित वाङ्मयाच्या कसोटीवर तर सहज उतरतेच; त्यामधील वैचारिकतेची चिंतनसूत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत. राष्ट्राच्या एकात्मतेला जपणारे व पुजणारे राष्ट्रीय वृत्तीचे लेखन म्हणून विवेक देशपांडे यांच्या या पुस्तकाचा गौरव अटळ आहे.

१९७८ ते १९४८ या काळात हैद्राबादला झालेल्या हिंदू-मुस्लिम दंगलीत, हिंदू-मुस्लिमांची किती माणसे मेली व कुणाचे किती नुकसान झाले, यासंबंधीची आकडेवारी या पुस्तकातील तक्त्यामध्ये देण्यात आलीय. सल्लाउद्दीन औवेसीच्या जातधर्मीय राजकीय नेतृत्वाचे पहिले यश आणि एमआयएम चा लोकसभेतला पहिला प्रवेश विवेक देशपांडे यांनी हैद्राबाद दंगलीच्या पार्श्वभूमीवर अधोरेखित केलाय. या लेखनातील श्री. देशपांडे यांचे भाष्य आणि विवेचन धार्मिक श्रद्धांनी बाधीत होत नाही. कारण त्यांच्या मनातील राष्ट्रीय भावना प्रांजळ आहे. धर्माच्या संबंधी त्यांची भूमिका डोळस व पुरेशी तटस्थ आहे. स्वत:च्या हिंदूधर्माच्या निष्ठा या लेखनात प्रबळ झाल्याचे दिसत नाही. अन्यथा कल्याणीबुवा रामदासीना त्यांनी अटकच केली नसती.

समाजाच्या सुरक्षिततेचे आणि राष्ट्राच्या एकात्म रुपाचे मूल्यभान सतत जागृत ठेऊनच या पुस्तकाचे लेखन श्री. देशपांडे यांनी केले आहे. 'मागे वळून पाहताना' -विवेक देशपांडे आपल्याच जीवनकथेकडे पुरेशा तटस्थतेने पाहतात. या लेखनात गुप्तचर विभागातील कारकिर्दीचेच नाट्यपूर्ण प्रसंग नोंदले गेलेत. अर्थात पोलिसांचे अनुबंध धार्मिक-सामाजिक-राजकीय वर्तुळाशी स्वाभाविकपणेच जुळतात. त्यामुळे त्यांच्या चिंतनाचा पसारा त्यांच्या विवेचनात सहजपणे अवतरला आहे. त्यांचा समाज व संस्कृतीचा अभ्यास आणि राजकीय पर्यावरणाचे आकलन सुंदर शैलीत अर्थपूर्ण झालेय. महाराष्ट्र, आंध्र ते लडाख असे प्रांतीय व राष्ट्रीय अनुबंध सुक्ष्म तपशीलासह इथे अधोरेखित झालेत. म्हणून ही कथा केवळ लेखकाची नसून भारताच्या राजकीय-धार्मिक ताणतणावाची प्रतिनिधिक राष्ट्रीय सत्यकथाच आहे.

या पुस्तकातील राजकीय नेत्यांचे फोटो, कौटुंबिक क्षणांचे फोटो, मोर्चे-धाडी प्रसंगाचे फोटो डायरीतील वास्तव नोंदीचा जिवंतपणा सिद्ध करतात. विवेक देशपांडे यांचे बहुआयामी व्यक्तित्व तर त्यातून आकारास येतेच; पण त्यांच्या कर्तृत्वाची साक्षही त्या फोटोंच्या मालिकेतून पुढे येते.

_ राष्ट्रीय नेतृत्व आणि सामान्य व असामान्य व्यक्तित्वाप्रती लेखक विवेक देशपांडे यांची संवेदनशीलता जागृत आहे. म्हणून तर इंदिरा गांधींच्या पावलाचा ठसा या पुस्तकात छापला गेलाय. माणसांची व राष्ट्राची स्पंदने जाणून त्यांचा सांस्कृतिक-सामाजिक अनुबंध अर्थपूर्ण करण्याच्या प्रयत्नात विवेक देशपांडे यशस्वी झालेत. एक राष्ट्रवादी माणूस, अधिकारी आणि लेखक म्हणून त्यांचे कर्तृत्व गौरवास्पद आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात असे लेखन दुर्मिळ असल्याने विवेक देशपांडे यांचे अभिनंदन करणे सांस्कृतिक कर्तव्य ठरते.

**- डॉ. श्रीपाल सबनीस**

गणराज 'ब' अपार्टमेंट, ५५९ नारायण पेठ, मोदी गणपतीजवळ, पुणे ४११०३० मो. ९४२२३ ६९५२०.